NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Licensed to post without prepayment No. NR/ATI/78/2001

YEAR : 32 ) 15th March 2007 ( No : 02

# DISBAND SAM PITRODA LED NATIONAL KNOWLEDGE COMMISSION.

## National Knowledge Commission Report to Nation, 2006

The Report has been submitted to the PM. The AIFUCTO Secretariat has prepared a detailed note which was submitted to the Chairman UGC on 8th February. **The Report is a burial ground for all social welfare steps enshrined in the Constitution :** strongly undermines equity, access, justice and has put the divisive agenda : to pit one set of institutions, level of education, subjects, teachers and students against the other, between universities and colleges, between UG & PG Education, between commercially viable subjects and traditional subjects, between national and provincial universities. It recommends to fix the fee at will. The publication of the Report has proved our doubts. The AIFUCTO has decided to strongly oppose this Report and to demand : **DISBAND SAM PITRODA LED NATIONAL KNOWLEDGE COMMISSION**.

- **DR.V.K.TEWARI** GENERAL SECRETARY.
**ALL INDIA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANIZATIONS**

## Nagpur University Teachers' Association

**MEETING NOTICE : 1**

**DATED : 15.03.2007**

From :
**Prof. Dr. E. H. KATHALE**
Secretary, NUTA N-162, Reshim Bag, Nagpur-444 009
To,
All the members of the Nagpur University Teachers' Association
Dear members,

I have the honour to inform you that General Body meeting of the Nagpur University Teachers' Association will be held at 12.00 noon, on the Day and the Date mentioned below.

2. If you propose to move any resolution for the consideration of the General Body, you are requested to send such resolution to me, with a copy to Prof. B.T.Deshmukh, President NUTA, No. 3, Subodh Colony, Near, Vidarbha Mahavidyalaya, Amravati 444604 within a period of 10 days from the date of the posting of this Bulletin.

3. It will not be possible to include in the agenda, resolutions received after the due date. So please make it convenient to send such resolutions, if any, within the stipulated time. The place of the meeting will be intimated to you alongwith the agenda.

Thanking you.

Yours faithfully
**Sd/- Dr.E. H. Kathale**, Secretary, NUTA.

***Time, Day and Date of the Meeting : 12.00 Noon on Sunday, the***

***20th May, 2007***

(४)

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळाच्या प्रतिनिधींनी त्यांच्या मागण्यांसाठी १२ डिसेंबरला काढलेला राज्यव्यापी मोर्चा.

*महाराष्ट्र विधानपरिषद : बुधवार, १८ डिसेंबर २००२ : तिसरे अधिवेशन २००२*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड १२९, क्रमांक ६, पृष्ठ ५५ ते ५८*

**सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे, बी.टी.देशमुख, प.म.पाटील, नानासाहेब बोरस्ते, व्ही.डी.खोटरे, गजेंद्र ऐनापुरे** यांनी दिलेली नियम ९३ अन्वये सूचना.

**प्रा.रामकृष्ण मोरे** (शालेय शिक्षण मंत्री) : अध्यक्ष महोदय, सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे, बी.टी.देशमुख, प.म.पाटील, नानासाहेब बोरस्ते, व्ही.डी.खोटरे, गजेंद्र ऐनापुरे यांनी "महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळाच्या प्रतिनिधींनी त्यांच्या मागण्यांसाठी १२ डिसेंबरला काढलेला राज्यव्यापी मोर्चा" या विषयावर नियम ९३ अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

"ज्याअर्थी, राज्यातील शालेय शिक्षण विभागातील शिक्षक कर्मचारी व विद्यार्थी, पालकवर्ग यांच्याशी निगडित असलेल्या मागण्या/समस्यांबाबत, महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळाच्या, प्रतिनिधींनी मा.शालेय शिक्षणमंत्री व सचिव यांच्याशी अनुक्रमे दि.९ जुलै व २६ नोव्हेंबर २००२ ला चर्चा केली आहे आणि

ज्याअर्थी, शिक्षक व शिक्षणविषयक मागण्या/समस्या सोडविण्याच्या दृष्टीने शासन पक्षपाती धोरण स्वीकारीत आहे : आणि

ज्याअर्थी, नवीन नवीन जाचक अटी व धोरण संबंधितांशी चर्चा न करता शिक्षक-कर्मचारी व विद्यार्थ्यांवर लादण्याचे विभागाने सुरु केलेले आहे आणि

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळाने दिनांक ११ डिसेंबरला बैठा सत्याग्रह व १२ डिसेंबर २००२ रोजी राज्यव्यापी मोर्चाचे आयोजन केले आहे; आणि

ज्याअर्थी, शिक्षण विभागाचे अडेल व अदूरदर्शी धोरणामुळे राज्यातील शिक्षण क्षेत्रात नैराश्याचे व असंतोषाचे वातावरण पसरलेले आहे;

त्याअर्थी, हे सभागृह तीव्र चिंता व्यक्त करीत आहे."

**मा.शालेय शिक्षणमंत्री यांचे निवेदन**

राज्यातील शालेय शिक्षण विभागातील शिक्षक कर्मचाऱ्यांच्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळ संघटनेच्या पदाधिकाऱ्यांबरोबर शासनाने दिनांक ९ जुलै २००२ व २६ नोव्हेंबर २००२ रोजी त्यांच्या मागण्यांसंदर्भात सविस्तर चर्चा केलेली आहे. या बैठकीला संघटनेचे सर्व पदाधिकारी तसेच शासनाचे अधिकारी उपस्थित होते. शिक्षक संघटनेच्या विविध मागण्यांबाबत या बैठकांमध्ये चर्चा करुन निर्णय घेण्यात आले. बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयाचे स्वरुप पुढीलप्रमाणे आहे:-

१) विभागीय संघटनांच्या सभा आयोजित करण्याबाबत विभागीय शिक्षण उपसंचालकांना दिनांक ३०.७.२००२ च्या पत्रान्वये शिक्षण संचालकांनी सूचना दिलेल्या आहेत.

२) वेतनविषयक थकित रकमांचा आढावा घेऊन आवश्यक तरतूद करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

३) वर्धा जिल्ह्यातील ११ शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांपैकी १० शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या पदांना मान्यता देण्यात आली असून एका पदावर जाती प्रमाणपत्र पडताळणीचा प्रश्न निर्माण झाल्यामुळे त्या पदास मान्यता देण्यात आलेली नाही.

४) कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांसाठी रुपये २२३६.९७ लक्षची तरतूद उपलब्ध झाली असून त्यांचे वितरण दिनांक २८.८.२००२ रोजी करण्यात आलेले आहे.

५) शाळा न्यायाधिकरणाकडे प्रलंबित प्रकरणांचा संचालकांमार्फत वेळोवेळी आढावा घेण्यात येतो.

६) फेब्रुवारी २००१ पासून २० टक्के अनुदानावर आलेल्या माध्यमिक शाळांना नियमित वेतन मंजूर करण्यात आले आहे.

२. शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांबाबत शासनाकडून अत्यंत सहानुभूतिपूर्वक विचार करण्यात आला असून त्यांचे वेळोवेळी निर्माण झालेले प्रश्न तातडीने सोडविण्याबाबत विशेष प्रयत्न केलेले आहेत. शासनाचे धोरण निःपक्षपाती व सहकार्याचे आहे तसेच विद्यार्थ्यांच्या हिताचे असून हे सर्व निर्णय चर्चा करुनच घेतले आहेत.

**(सुचनेवरील मा.शालेय शिक्षण मंत्र्यांच्या निवेदनानंतर....)**

**श्री.व्ही.यू.डायगव्हाणे :** अध्यक्ष महाराज, महाराष्ट्रातील हजारो शिक्षकांनी १२ डिसेंबरला नागपूरमध्ये मोर्चा काढला आणि त्या निमित्ताने आम्ही एक निवेदन देखील शासनाला आपल्यामार्फत सादर केले होते. आता त्या संबंधात जे उत्तर या निवेदनाच्या स्वरुपात शासनामार्फत आलेले आहे, त्यामध्ये गेल्या ५-६ महिन्यांमध्ये ज्या बाबी सुटलेल्या होत्या त्यांचाच केवळ उल्लेख केला आहे. खरे म्हणजे मोर्चा ज्या मागण्यांच्या संदर्भात काढला गेला होता त्यांचा उल्लेख या निवेदनात पाहिजे होता. त्यातील पहिली मागणी अशी होती...

**उपसभापती :** सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

**श्री.व्ही.यू.डायगव्हाणे :** अध्यक्ष महाराज, प्रश्न विचारण्यापूर्वी मी त्याबाबतची पार्श्वभूमी सांगत होतो, एक ग्राऊंड तयार करीत होतो. पण आता आपण प्रश्न विचारण्यास सांगत आहात म्हणून माझा पहिला प्रश्न असा आहे की, विनाअनुदानित शाळांना अनुदान देणे, दोन वर्षापूर्वी येथे आपण यासंबंधात ७५३ शाळांची यादी तयार केली होती. परंतु या वर्षी मात्र अजूनही तशी यादी आपण जाहीर केलेली नाही. त्यासंबंधात जे आपण निकष ठरविले आहे त्यामध्ये म्हटले आहे की, १०० पैकी ९० गुण मिळविणाऱ्या शाळाच अनुदानपात्र होण्यास निकषपात्र ठरतील. याचा अर्थ कोणतीही शाळा निकषामध्ये येणार नाही असेच धोरण आपण ठरविले. तेव्हा निकषपात्र शाळांची यादी आता अधिवेशनाचे २-३ दिवस असले तरी मार्च पूर्वी तरी जाहीर होईल काय? तसेच सी.एल.संबंधातील जी मागणी आहे त्यामुळे कोणताही आर्थिक बोजा आपणावर येत नाही. पहिल्यांदा १५ रजा होत्या त्या आता ८ झालेल्या आहेत. तेव्हा वेतनविषयक मागण्या आपण मंजूर केल्या पण ज्या किरकोळ मागण्या आहेत त्या मात्र मंजूर झालेल्या

(१)

## वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी विनाअनुदानित शाळांतील सेवाकाळ ग्राह्य धरण्याबाबत

*तिसरे अधिवेशन २००१ : : महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही*
*बुधवार, १२ डिसेंबर २००१*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड १२६, क्रमांक ८, पृष्ठ १८ - १९*

**(७) * १९१२० सर्वश्री दिपक सावंत, व्हि.यू.डायगव्हाणे, बी.टी.देशमुख, सुरेश पाटील, प.म.पाटील, नानासाहेब बोरस्ते :** सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय–

(१) बिना अनुदानित माध्यमिक शाळातील शिक्षक/मुख्याध्यापकांचा सेवाकाळ बढती, निवृत्ती वेतन या मुख्य प्रयोजनासाठी अनुज्ञेय धरल्या जातो परंतु वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी ग्राह्य धरल्या जात नाही. याबाबत मा.मंत्री, शालेय शिक्षण यांचेशी शिक्षक महामंडळाची दिनांक ७ ऑगस्ट, २००१ रोजी चर्चा झाली, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, चर्चेत या मागणीबाबत वित्त मंत्र्याकडे पाठपुरावा करण्यात येईल व या मुद्याबाबत पुढील कार्यवाही त्वरीत करावी असे निर्देश मा.मंत्री, शालेय शिक्षण यांनी शिक्षण विभागाला दिले आहेत, हेही खरे आहे काय;

(३) असल्यास, याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे;

(४) अद्याप निर्णय घेतला नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा.रामकृष्ण मोरे :**(१) होय.

(२) होय.

(३) अद्याप निर्णय झालेला नाही.

(४) प्रस्ताव मा.वित्त मंत्र्यांकडे सादर करण्यात आलेला आहे.

******

नाहीत. दुसरे असे की, तिकडे आहे तसेच ते येथेही द्या अशी आमची मागणी आहे. याबाबत ९ मार्चला जी चर्चा झाली त्यात किरकोळ रजेच्या बाबतीतील मागणी ही तात्विक दृष्ट्या बरोबर आहे, तेव्हा याबाबत मुख्य सचिवांबरोबर चर्चा करण्यात येईल असे आपण म्हटले होते. पण अद्याप त्याबाबत काहीही निर्णय आम्हाला कळलेला नाही. तेव्हा विनाअनुदानित शाळांपैकी अनुदानपात्र शाळांची यादी मार्च पूर्वी जाहीर करणार काय आणि सी.एल.च्या बाबतीत निर्णय घेऊन पहिल्याप्रमाणे १५ सी.एल. देण्यात येतील काय? असे माझे दोन प्रश्न आहेत त्यांची उत्तरे मिळावीत.

**प्रा.रामकृष्ण मोरे :** अध्यक्ष महाराज, विनाअनुदानित शाळा टप्प्यावर अनुदानास पात्र होतील त्या संदर्भातील यादी मागील वर्षी आपण ७५१ अशी जाहीर केली होती... सब्जेक्ट टू करेक्शन ... आणि ज्या ज्या टप्प्यावर शाळा अनुदानास पात्र होतील त्याप्रमाणे त्यांची यादी जाहीर केली जाते.. आता अशा प्रकारे पात्र होणाऱ्या शाळांची यादी केव्हा जाहीर करणार? असा प्रश्न सन्माननीय सदस्यांचा आहे. अध्यक्ष महाराज, एक गोष्ट मान्य करावयास पाहिजे की, विविध शिक्षक संघटनांशी झालेल्या चर्चेमध्ये अनुदानास पात्र होण्यासाठी ९० गुण हे फारच स्ट्रिक्ट होतात त्यामध्ये कमी गुण करण्याची शासनाचीही इच्छा आहे, जेणेकरुन जास्तीत जास्त शाळा त्या नियमात, निकषात बसू शकतील. तेव्हा या दृष्टीने या ९० गुणांच्या बाबतीत शासन फेरविचार करणार आहे. दुसरा प्रश्न हा सी.एल. च्या बाबतीतील आहे. याबाबत सुध्दा विविध शिक्षक संघटनांशी चर्चा केली आहे आणि आपली ही जी मागणी आहे ती तत्वतः व्यक्तीशः मला मान्य आहे. पण विविध संघटनांचे याबाबतचे प्रस्ताव वेगवेगळे आहेत. म्हणजे प्रत्यक्ष कामाच्या दिवसातील दिवस कमी करावयाचे की, सुटीच्या दिवसातील कमी करावयाचे. तर याबाबतीत संचालकांना सविस्तर अशी एक टिप्पणी सादर करण्यास आपण सांगितले होते आणि त्यांनी ती टिप्पणी सादर केलेली देखील आहे. तेव्हा याही संदर्भात सगळ्या संघटनाच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा करुन... ज्याप्रमाणे अनुदानप्राप्त शाळांची यादी मार्च पर्यंत जाहीर केली जाईल त्याप्रमाणे हाही निर्णय साधारणतः फेब्रुवारी मध्ये सर्वांशी विचारविनिमय करुन जाहीर केला जाईल.

अध्यक्ष महाराज, त्यानंतर एक गोष्ट मला आवर्जून येथे सांगावयाची आहे की, नियम ९३ अन्वये सूचना देताना सन्माननीय सदस्यांनी ती कोणत्या शब्दात द्यावी हा सगळा सदस्यांचा अधिकार आहे. पण शासनाची भूमिका प्रश्न समजावून घेऊन अधिकाधिक सहकार्याची आहे, कर्तव्याची आहे. परंतु या सुचनेमध्ये मात्र जे शब्द वापरले आहेत... यात म्हटले आहे की, xx अध्यक्ष महाराज, आपण केव्हाही xx धोरण ठेवलेले नाही...

सभापती महोदय, शासनाने या ठिकाणी कोणतेही अडेल धोरण ठेवले नाही किंवा असहकाराचे धोरण देखील ठेवले नाही. चर्चेच्या माध्यमातून प्रश्न सोडविण्याची भूमिका शासनाची आहे. त्यामुळे या ठिकाणी हा जो शब्द वापरण्यात आलेला आहे. त्यामुळे मला दुःख होत आहे, हे मला या ठिकाणी नमुद करावेसे वाटते.

**श्री.व्ही.यू.डायगव्हाणे :** xxx हे शब्द मी मागे घेतो.

**प्रा.रामकृष्ण मोरे :** मी आपला आभारी आहे.

**श्री.नानासाहेब बोरस्ते :** सभापती महोदय, शिक्षक कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यासाठी मा.मंत्रिमहोदय तसेच संबंधित शासकीय अधिकाऱ्यांबरोबर चर्चा झाली आहे. त्याप्रमाणे शासनाने काही निर्णय घेतले आहेत. मंत्रिमहोदयांनी त्यांना तत्वतः मान्यता दिली आहे. **विना अनुदानित शाळेतील सेवा ही अनुदानित शाळेत आल्यानंतर गृहीत धरावी, त्याप्रमाणे त्या शिक्षकांना वरिष्ठ श्रेणी मिळावी. याबाबत हायकोर्टाने निर्णय दिला आहे.** सिडको येथील माध्यमिक शाळेच्या बाबतीत हायकोर्टाने निर्णय दिला आहे. त्याची प्रत आम्ही मा. मंत्रिमहोदयांना आणि सर्व संबंधित अधिकाऱ्यांना चर्चेच्या वेळी सादर केली आहे. त्या चर्चेत ही बाब तत्वतः मान्य करण्यात आलेली आहे. आता याबाबतची अंमलबजावणी एक महिन्यात होणार आहे काय?

**प्रा.रामकृष्ण मोरे :** एक महिन्यात याबाबतची अंमलबजावणी केली जाणार नाही. परंतु याबाबतची सविस्तर माहिती घेऊन आणि सर्व संबंधितांशी चर्चा घेऊन याबाबतचा निर्णय देखील मार्चपूर्वी करण्यात येईल.

**श्री.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, विना अनुदानातील सेवा धरण्याबाबत आता हायकोर्टानेच निर्णय दिला आहे. एखादा शिक्षक विना अनुदानीत शाळेत काम करतो म्हणजे काही गुन्हा करीत नाही. ती सेवादेखील धरण्यात आली पाहिजे. त्या सेवेचा विचार करण्यात यावा व ती धरण्यात यावी** असा हायकोर्टाने निर्णय दिला आहे. त्याप्रमाणे विना अनुदानीत काळात केलेली सेवा ही निवडश्रेणी देताना धरण्यात यावी, अशी आम्ही मागणी करीत होतो, परंतु त्याबाबत अनेक वेळा माननीय मंत्रिमहोदयांनी सहमती व्यक्त केली आहे., पण निर्णय होत नव्हता. त्यामुळे काहींना हायकोर्टात जावे लागले. आता याबाबत हायकोर्टानेच निर्णय दिला आहे. ज्यावेळी याबाबतची चर्चा झाली होती, तेव्हा या निर्णयाची प्रत माननीय मंत्रिमहोदयांना देण्यात आली. म्हणून याबाबतचा निर्णय आता शासन एक महिन्याच्या कालावधीत घेईल काय? तसे आदेश शासन निर्गमित करील काय?

**प्रा.रामकृष्ण मोरे :** शिक्षण सेवकाची सेवा ही पेन्शनला गृहीत धरण्यात आली आहे. सभापती महोदय, आता माननीय सदस्य जी मागणी करीत आहेत, त्याबाबत मला सर्व संबंधीतांशी चर्चा करावी लागेल. कारण चर्चा केली नाही तर तसा आरोप करण्यात येतो. **आता माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांच्याबरोबर बसून याबाबत चर्चा करण्यात येईल आणि याबाबतचा निर्णय एक महिन्याच्या कालावधीत घेण्यात येईल.**

******

## (२)
## वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी विनाअनुदानित शाळांतील सेवाकाळ ग्राह्य धरणे.

*पहिले अधिवेशन २००२ : : महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही*
*शनिवार, १६ मार्च २००२*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड १२७, क्रमांक ४, पृष्ठ ३३*

(३९) * २२३१९ **सर्वश्री व्हि.यू.डायगव्हाणे,बी.टी.देशमुख,सुरेश पाटील,प.म.पाटील,नानासाहेब बोरस्ते,दिपक सावंत** : तारांकित प्रश्न क्रमांक १९१२० ला दिनांक १२ डिसेंबर २००१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विना अनुदानित माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळातील शिक्षकांचा सेवाकाळ, वरिष्ठ व निवडश्रेणी साठी ग्राह्य धरला जावा याबाबतच्या विचाराधीन प्रश्नावरील शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) अद्याप निर्णय झालेला नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.रामकृष्ण मोरे** : (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

******

## (३)
## वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी विनाअनुदानित शाळांतील सेवाकाळ ग्राह्य धरणे.

*तिसरे अधिवेशन २००२ : : महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही*
*बुधवार, १८ डिसेंबर २००२*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड १२९, क्रमांक ६, पृष्ठ १८६*

(१) २४९५८ (७-८-२००२) **श्रीमती संजीवनी रायकर, श्री.सुरेश भालेराव, श्री.विनोद तावडे, श्री.विजय गिरकर, डॉ.अशोक मोडक, श्री.प.म.पाटील, प्रा. बी.टी.देशमुख, श्री.व्ही.यु.डायगव्हाणे, श्री.नानासाहेब बोरस्ते, श्री.वसंतराव खोटरे, श्री.जी.एल.ऐनापूरे** : सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय–

(१) विनाअनुदानित माध्यमिक शाळांतील शिक्षक/मुख्याध्यापकांचा सेवाकाळ, बढती, निवृत्ती वेतन या मुख्य प्रयोजनासाठी अनुज्ञेय धरला जातो, परंतु वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी ग्राह्य धरला जात नाही हा भेदभाव दूर करण्याच्या विचाराधीन प्रश्नावरील शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे काय;

(२) असल्यास, याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे;

(३) उक्त प्रकरणी अद्याप निर्णय घेतला नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा.रामकृष्ण मोरे** (११-१०-२००२) : (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

******

(५)

# माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षक कर्मचाऱ्यांच्या नैमित्तिक रजेबाबत निर्णय घेणे

*महाराष्ट्र विधानपरिषद : मंगळवार, दिनांक ८ एप्रिल २००३ : दुसरे अधिवेशन, २००३*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड १३१, क्रमांक १८, पृष्ठ ११६ ते १२३*

माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षक कर्मचाऱ्यांच्या नैमित्तिक रजेबाबत निर्णय घेण्यासंबंधी **सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे, बी.टी.देशमुख, व्ही.डी.खोटरे, प.म.पाटील, नानासाहेब बोरस्ते, गजेंद्र ऐनापुरे** यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

**श्री. व्ही.यू.डायगव्हाणे** (नागपूर विभाग शिक्षक) : अध्यक्ष महोदय, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळातील शिक्षक-कर्मचाऱ्यांना १५ नैमित्तिक रजेबाबतचा निर्णय फेब्रुवारी २००३ पर्यंत घेण्याबाबत सभागृहात दिनांक १८ डिसेंबर २००२ ला दिलेले आश्वासन, निकषपात्र विना अनुदानित शाळांची यादी मार्चपूर्वी जाहीर करणे, विना अनुदानित शाळेतील सेवा वरिष्ठ श्रेणीसाठी ग्राह्य धरणे, याबाबतचा निर्णय एक महिन्याच्या कालावधीत घेण्याचे दिनांक १८ डिसेंबर २००२ ला मान्य करणे, या व इतर मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळाने दिनांक १२ डिसेंबर २००२ ला नागपूर विधिमंडळावर आयोजित केलेले मोर्चा आंदोलन, दिनांक १८ फेब्रुवारी २००३ रोजी राज्यातील सर्व शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर दिनांक ३०/१/२००३ च्या निवेदनातील मागण्या/समस्यांसाठी केलेले आंदोलन, सभागृहातील आश्वासनांचा झालेला भंग, शिक्षक-कर्मचाऱ्यात निर्माण झालेले असंतोषाचे व नैराश्याचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कारवाई."

**श्री. अमरीशभाई पटेल (शालेय शिक्षण मंत्री)** : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षक कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांवर दिनांक १८ डिसेंबर,२००२ रोजी सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेनुसार लवकरात लवकर निर्णय घेण्याचे शासनाने मान्य केले होते. तसेच हा निर्णय घेताना सर्व सन्माननीय सदस्यांना विश्वासात घेऊन, त्यांच्यांशी चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल असे नमूद केले होते.

माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळातील शिक्षक कर्मचाऱ्यांच्या प्रमुख मागण्यांमधील १) नैमित्तिक रजा १५ पर्यंत वाढविणे, २) विनाअनुदानित शाळेतील सेवा वरिष्ठ श्रेणीसाठी ग्राह्य धरणे, याबाबत दिनांक १९ मार्च, २००३ रोजी सर्व संबंधित सदस्यांशी प्राथमिक चर्चा पूर्ण झालेली असून याबाबत अंतिम निर्णय लवकरात लवकर घेण्यात येत आहे. शिक्षकांची विनाअनुदानित माध्यमिक शाळेतील सेवा वरिष्ठ व निवड श्रेणीसाठी ग्राह्य धरतांना अशाप्रकारे किती कर्मचारी यासाठी पात्र ठरतील, त्यांना किती निधीची आवश्यकता भासेल इत्यादी माहिती क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून उपलब्ध करुन घेण्यात येत आहे. क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर याबाबत वित्त विभागाच्या सल्ल्याने उचित निर्णय घेण्यात येईल.

निकषपात्र विनाअनुदानित शाळांची यादी जाहीर करण्याबाबत असे नमूद करण्यात येते की, दिनांक ११ ऑक्टोबर, २००० च्या शासन निर्णयाव्दारे विहित करण्यात आलेल्या निकषामध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. यावाबत धोरणात्मक निर्णय घेण्याची कार्यवाही सुरू असून सुधारित केलेले निकष हे उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने असल्यामुळे धोरणात्मक निर्णय घेतल्यानंतर त्यास उच्च न्यायालयाची संमती घ्यावी लागेल, प्रचलित निकषानुसार अनुदानास पात्र ठरणाऱ्या विना अनुदानित माध्यमिक शाळांची यादी दिनांक ४ एप्रिल,२००३ रोजी जाहीर करण्यात आली आहे.

**श्री.व्ही.यू.डायगव्हाणे** : अध्यक्ष महोदय, या लक्षवेधी सूचनेमध्ये प्रामुख्याने मी तीन मुद्यांचा उल्लेख केला आहे. या तीनही मुद्यांच्या संदर्भात दिनांक १८ डिसेंबर २००२ रोजी माननीय मंत्री महोदयांनी सभागृहामध्ये आश्वासन दिले होते. विना अनुदानित शाळांना अनुदान देण्यासंबंधी आपण केव्हा निर्णय घेणार असे मी विचारले होते त्यावेळी मार्चपर्यंत आपण या विना अनुदानित शाळा अनुदानावर आणणार असे सांगितले होते.त्यानंतर माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षक कर्मचाऱ्यांच्या नैमित्तिक रजा पूर्वी १५ होत्या त्या जशाच्या तशा लागू करणार काय असे मी त्यावेळी विचारले होते आणि यासंदर्भात फेब्रुवारी २००३ पूर्वी निर्णय घेऊ असे सांगितले होते. पण आता या लक्षवेधी सूचनेवर जे निवेदन करण्यात आले आहे त्यामध्ये वेगळे उत्तर दिले आहे. आता लवकरात लवकर करू असे सांगितले आहे. एक मार्च पर्यंत निकषपात्र शाळांची यादी जाहीर करू असे सांगितले होते. ४८ शाळा निकषपात्र आहेत असे सांगितले आहे. अध्यक्ष महोदय, मला माझ्या विभागामध्ये संदेश घेऊन जायचे आहे. विदर्भामध्ये एक आणि कोकणामध्ये एक शाळा अनुदानावर आली आहे. सन्माननीय शिक्षण राज्यमंत्री विदर्भातील आहेत. शिक्षण सचिव आणि उप सचिवसुद्धा विदर्भातील आहेत.१० वर्षापासून विना अनुदानावर असलेल्या शाळांचा प्रश्न आहे. दिनांक १८ डिसेंबर २००२ रोजी सभागृहामध्ये मंत्री महोदयांनी स्पेसिफिक उत्तर दिले होते. त्या उत्तराला आता बगल दिली आहे. तरी ४८ शाळांची यादी शासनाने जाहीर केली आहे त्या शाळांना कधी पासून अनुदान देणार आणि या शाळा कोणत्या टप्प्यावर आहेत ? आपण जे निकष सांगितले आहेत त्यानुसार आपण या शाळांची यादी एक महिन्यात जाहीर करून त्यांचे टप्पे आणि अनुदानाची तारीख या ठिकाणी मंत्री महोदय जाहीर करतील काय ? तसेच नैमित्तिक रजेचा प्रश्न एक महिन्याच्या आत सोडविण्यात येईल काय?

**श्री.अमरीश पटेल** : सभापती महोदय, दिनांक १८ डिसेंबर २००२ रोजी माननीय सदस्यांनी जी नियम ९३ ची सूचना दिली होती त्यावर निवेदन करीत असतांना अनुदानित शाळांची किंवा अनुदानावर येणाऱ्या शाळांची यादी फेब्रुवारी महिन्यात जाहीर करण्यात येईल असे सांगितले होते. त्याप्रमाणे ९० गुणांच्या निकषात ज्या शाळा बसत होत्या त्या ४९ शाळांची यादी काल जाहीर केली होती.सन्माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, यामध्ये विदर्भातील एकही शाळा नाही. मराठवाड्यातील २१ शाळा आहेत. आपली जी अवस्था आहे तीच अवस्था आमचीसुद्धा आहे.उत्तर महाराष्ट्रातील ज्या जिल्ह्यातून मी आलो आहे त्या जिल्ह्यातील सुद्धा एकही शाळा या निकषामध्ये बसली नाही.जळगाव जिल्ह्यातील एक शाळा बसली आणि नाशिक जिल्ह्याची एकही शाळा बसली नाही.त्यामुळे आपण निकष बदलत आहोत. ही प्रक्रिया काही एक दिवसात पूर्ण होणारी नाही. या बाबतीत मी कालच सांगितले होते की, नवीन धोरण आपण आखत आहोत. हे धोरण काही मी एकटाच मंजूर करणार नाही. वित्त विभागाकडून कॅबिनेटसमोर ते पाठवावे लागेल त्यानंतर न्यायालयाकडे माहितीसाठीसुद्धा ते पाठवावे लागणार आहे. ज्या काही गोष्टी न्यायालयाच्या आहेत त्या न्यायालयीनच राहणार आहेत. त्यामध्ये बदल करणे ही बाब काही माझ्या हातात नाही. सन्माननीय सदस्यांना मी सांगतो की एवढा चांगला निर्णय घेतला तरी आपण समाधानी राहत नाही ही गोष्ट बरोबर नाही.

**श्री.व्ही.यु.डायगव्हाणे** : आपण स्पेसिफिक उत्तर द्या.

**श्री.अमरीश पटेल** : मी स्पेसिफिक उत्तर दिलेले आहे.

**श्री.व्ही.यु.डायगव्हाणे** : एक महिन्यात यादी जाहीर करू आणि सी.एल.च्या बाबतीत फेब्रुवारीत निर्णय घेऊ आणि विना अनुदानित सेवा ही वरिष्ठ श्रेणीसाठी घेण्याचा निर्णय एक महिन्यात घेऊ असे मागच्या शिक्षण मंत्र्यांनी सांगितले होते. आता मात्र लवकरात लवकर निर्णय घेऊ. असे उत्तर देण्यात येत आहे.चार महिने होऊन गेल्यानंतर सुद्धा लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल असे आपण सांगत आहात.तेव्हा स्पेसिफिक तारीख आपण सांगा.

**श्री.अमरीश पटेल** : सगळ्या प्रश्नाला स्पेसिफिक उत्तर देता येणार नाही.

काम करण्याची जी पद्धत ठरलेली असते त्याच पद्धतीने शासनाला काम करावे लागते. एक महिन्यात किंवा दहा दिवसात निर्णय होईल असे उत्तर आपल्याला हवे असेल तर तसे उत्तर देता येणार नाही. काल अत्यंत चांगली योजना आम्ही जाहीर केली होती. सन्माननीय सदस्य श्री.डायगव्हाणे यांनी सांगितले की नियम ९३ खाली निवेदन करण्यात आले होते आणि त्यात सांगितले होते की शाळांची यादी मार्च महिन्यापर्यन्त जाहीर करण्यात येईल.आम्ही ४ दिवस अगोदर ही यादी जाहीर केलेली आहे .त्यामध्ये १५-२० दिवसांचा उशीर झालेला आहे. ज्या शाळा ९० गुणांच्या निकषात बसत नाही त्याला आम्ही तरी काय करणार ? जे निकष ठरविण्यात आले होते त्यामध्ये माझ्या संस्थेची शाळासुद्धा बसली नाही.तेव्हा अशा गोष्टीस आपण काही करू शकत नाही. शाळांची यादी आपण जाहीर केलेली आहे. आता काल निवेदन करीत असतांना एक नवीन योजना जाहीर केलेली आहे. माननीय वित्त मंत्र्यांच्या मार्फत ती योजना मी कॅबिनेटसमोर घेऊन जाईन तेथे मंजुरी मिळविण्याचा मी प्रयत्न करील. या बाबतीत मी स्पेसिफिक असे उत्तर देऊ शकत नाही.

**श्री.व्ही.यु.डायगव्हाणे :** ४८ शाळांची यादी जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये विदर्भातील फक्त एक शाळा आहे बलाढ्य शाळांना शासनाने अनुदान दिले आहे.ज्या शाळांची यादी जाहीर करण्यात आली आहे त्यांचा टप्पा कोणता आहे हे दिलेले नाही. त्यांना केव्हापासून अनुदान देण्यात येणार आहे याचा उल्लेख केलेला नाही.यापूर्वी असे कधीही झालेले नाही. मागच्या वर्षी ७५३ शाळा अनुदानावर आल्या होत्या त्यांना फेब्रुवारीपासून अनुदान देण्याचे स्पष्टपणे जाहीर करण्यात आले होते आजही प्रोव्हीजन झालेली आहे. तेव्हा एक महिन्यात करू असे सांगण्यामध्ये आपल्याला काय अडचण आहे. आपण निकष बदलून ९० गुणांऐवजी ७५ गुण ठेवा. परंतु हे प्रकरण कोर्टात घालू नका. सर्व शिक्षण क्षेत्र कोर्टात गेलेले आहे.कोर्टात जाण्याची काहीही गरज नाही. कोर्टात जाण्याचा काहीही निर्णय नाही. म्हणून माझा स्पेसिफिक असा प्रश्न आहे की अनुदानासहित ही यादी एक महिन्याच्या आत जाहीर करणार आहात काय तसेच सी.एल.च्या बाबतीत आम्ही जास्त काही मागत नाही. आता ८ सी.एल. करण्यात आलेल्या आहेत त्या पंधरा करण्यात याव्यात असे सर्व शिक्षकांचे म्हणणे आहे.आम्ही जास्त सुट्या द्या असे मागत नाही तर उन्हाळ्याच्या आणि दिवाळीच्या सुट्या कमी करा परंतु ८ ऐवजी १५ सी.एल करा अशी मागणी करण्यात येत आहे.; याकरता एक पैशाचासुद्धा शासनाला खर्च येणार नाही परंतु तो निर्णय घेण्याकरतासुद्धा जर वेळ लागत असेल तर ती बाब बरोबर नाही.तेव्हा दोन्ही निर्णय एक महिन्याच्या आत घेणार आहात काय ? याबाबतीत स्पष्टपणे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावे आणि त्याची कारवाईसुद्धा काटेकोरपणे करावी.

**श्री. अमरिश पटेल :** अध्यक्ष महाराज, मी यापूर्वीच सांगितले आहे की, काल जे निकष मी येथे सांगितले आहेत ते अजून अंतिम झालेले नाहीत. त्यासाठी ते वित्त विभागाकडे जाऊन नंतर कॅबिनेटपुढे जाणार असून कॅबिनेट त्याबाबत अंतिम निर्णय घेणार आहे आणि त्यानंतरच मी ते निर्णय जाहीर करीन.

**श्री. व्ही.यू.डायगव्हाणे :** अध्यक्ष महाराज, पण कोणत्या टप्प्यावर या शाळा अनुदानावर आपण आणणार आहात ते सांगितलेले नाही. केवळ कोरा चेक आहे हा. यासाठी किती निधी दिला आहे याचीही माहिती सांगितलेली नाही... अध्यक्ष महाराज, ज्युनिअर कॉलेजसंबंधात ३ जून २००० ला दिलेला निर्णय आहे पण दोन वर्षे त्याची अंमलबजावणी झालेली नाही. केवळ तो कोरा चेकच राहिला. आजही तसेच आपण करणार आहात काय ? यासाठी बजेटमध्ये आपण किती तरतूद केली आहे ? केंव्हा करणार आहे वगैरे काही तरी सांगा.

**श्री. अमरिश पटेल :** अध्यक्ष महाराज, सदर शाळांना ज्या वर्षापासून परवानगी दिलेली आहे, जे अनुदान मंजूर करतो ज्या वर्षाच्या टप्प्यावर त्या असतील त्याच टप्प्यावर त्यांना अनुदान देण्यात येईल.

**श्री. बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, या ठिकाणी आपण निवेदनामध्ये म्हटले आहे की, "विना अनुदान शाळांतील सेवा वरिष्ठ श्रेणीसाठी ग्राह्य धरण्याचा अंतिम निर्णय लवकरात लवकर घेतला जाईल." माझे याबाबत म्हणणे असे आहे की, याचा आणि वित्त विभागाचा कोठेही संबंध नाही. या संदर्भातील आपला जो २.९.१९८९ चा शासन निर्णय आहे त्याच्या परिच्छेद ९ मध्ये आपण ही बढतीची योजना दिलेली आहे. त्यात विना अनुदानाची सेवा धरू नये असे कोठे म्हटले आहे ? तो शासन निर्णय आपण वित्त विभागाच्या संमतीनेच काढलेला आहे. तेव्हा शासन निर्णयानुसार काम करण्यास आपण आपल्या अधिकाऱ्यांना सांगितले पाहिजे. पण तसे न करता शासन निर्णयाच्या विरुद्ध जाऊन काहीही परिपत्रक काढले जाते त्याबद्दल खरे तर आपण त्यांचेवर कारवाई केली पाहिजे. तेव्हा माझा नेमका प्रश्न असा आहे की, २ सप्टेंबर १९८९ चा जो आपला शासन निर्णय आहे त्यात विना अनुदानाची सेवा धरू नका असा उल्लेख नाही हे खरे आहे काय ?

**श्री. अमरिश पटेल :** अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्य जे विचारीत आहेत त्याची मला माहिती नाही. पण सर्व अनुदानित आणि विनाअनुदानित शाळांतील शिक्षकांना त्यांची १२ वर्षाची सेवा निवड श्रेणीसाठी मात्र ... याबाबत कोर्टाची ऑर्डर आहे त्यामुळे एक एक शाळा आपणास तपासावयाची आहे. ...

**श्री. बी.टी. देशमुख :** अध्यक्ष महाराज, मी ते विचारलेच नाही. आपण जरूर ते तपासा. पण आपल्या २.९.१९८९ चा जो जी.आर. आहे त्यामध्येच विनाअनुदानित काळातील सेवा धरू नका असे म्हटलेले नाही हे खरे आहे काय ?

**श्री. अमरिश पटेल :** अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला तो यामध्ये नव्हता त्यामुळे ....

**श्री. बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, या नोटिशीमध्येच सेवा धरण्याचा मुद्दा आहे. म्हणूनच मी आपल्याला विचारले की, आपल्या २.९.१९८९ च्या जी.आर.मध्ये विना अनुदानाची सेवा धरू नका असे म्हटलेले नाही हे खरे आहे काय ?

**श्री. अमरिश पटेल :** अध्यक्ष महाराज, ही माहिती आज माझ्याकडे नाही, वाटल्यास ती मी पटलावर ठेवतो.

**श्री. बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, आम्ही या मुद्याची नोटीस दिली आहे. माननीय मंत्री महोदयांकडे ही माहिती नाही, असे ते म्हणतात तर मी त्यांना ती देण्यास तयार आहे. मी काही माझ्याकडचे काही सांगत नाही. तर हायकोर्टाचे सांगत आहे. हायकोर्टाने या संदर्भात काय म्हटले आहे ? मी आपणास वाचूनच दाखवितो. हायकोर्टाने म्हटले आहे की, "We may examine the scheme under clause 9 of the Government Resolution dated 2.9.1989", It is in regard to Writ Petition No.4346 of 2000, "High Court of Judicature at Bombay." 14.9.2000 ला झालेला हा निर्णय आहे. ते काय म्हणतात ? 'It may be mentioned at this stage that the Government Resolution dated 2.9.1989 nowhere mentions that the qualified service of 12 years should be from the school which is brought on grant basis. It is required to be noted that the qualification prescribed for the aided school are the same in the unaided school and there are no separate rules for unaided school which is receiving grant and school which is not receiving grant. Under any circumstance it is not correct to assume that the 12 years service should be from aided school only." म्हणजे आपल्या जी.आर. मध्ये हे नाही. हायकोर्टाच्या निर्णयाची प्रत मी आपणाला दिली आहे. सभापती महोदय, आम्ही काय करावयाचे ? मागील वेळी आम्ही असा प्रश्न

## (६)

## वरिष्ठ व निवड श्रेणीसाठी विनाअनुदानित शाळांतील सेवाकाळ ग्राह्य धरण्याबाबत

*महाराष्ट्र विधानपरिषद : : तिसरे अधिवेशन, २००३*
*गुरुवार, दिनांक २४ जुलै २००३*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड १३२, क्रमांक ९, पृष्ठ १४६*

(२) ३०२४९ (९-४-२००३). **श्री.नानासाहेब बोरस्ते, प्रा.बी.टी.देशमुख, श्री.व्ही.यु.डायगव्हाणे, श्री.वसंतराव खोटरे, श्री.प.म.पाटील, श्री.जी.एल.ऐनापूरे :** दिनांक १८ डिसेंबर २००२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या आठव्या यादीतील प्रश्न क्रमांक २४९५८ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय शालेय शिक्षणमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील कायः-

(१) विनाअनुदानित माध्यमिक शाळांतील शिक्षक/मुख्याध्यापकांचा सेवाकाळ, बढती, निवृत्तीवेतन या मुख्य प्रयोजनासाठी अनुज्ञेय धरल्या जातो परंतु वरिष्ठ व निवड श्रेणीसाठी ग्राह्य धरल्या जात नाही हा भेदभाव दूर करण्याच्या विचाराधीन प्रश्नावरील शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे काय;

(२) असल्यास, याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरूप काय आहेत;

(३) अद्याप निर्णय घेतला नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.अमरीशभाई पटेल** (२४-६-२००३) : (१), (२) व (३) विनाअनुदानित माध्यमिक शाळांतील शिक्षकांची सेवा वरिष्ठ/निवडश्रेणीसाठी ग्राह्य धरण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

******

विचारला होता की, 'याबाबतचा निर्णय शासन एक महिन्याच्या कालावधीत घेईल काय ? तसा निर्णय शासन निर्गमित करील काय?' माननीय मंत्रिमहोदयांनी १८ डिसेंबर २००२ रोजी ता.प्र.क्र. २७२७७ वरील अनुपूरक चर्चेत असे उत्तर दिले होते की , ' शिक्षण सेवकांची सेवा ही पेन्शनला गृहीत धरण्यात आली आहे. आता माननीय सदस्य मागणी करीत आहे. याबाबत मला सर्व संबंधीतांशी चर्चा करावी लागेल. कारण चर्चा केली नाही तर तसा आरोप करण्यात येतो. माननीय सदस्य श्री. बी. टी. देशमुख यांच्याबरोबर याबाबतची चर्चा करण्यात येईल आणि या बाबतचा निर्णय एक महिन्याच्या कालावधीत घेण्यात येईल." सभापती महोदय, ही कन्टीन्युयस प्रोसेस आहे. मा.मंत्रिमहोदयांच्या निदर्शनास आम्ही या सगळ्या बाबी आणून दिल्या होत्या. सभागृहात आम्ही या विषयावर चर्चा केल्यानंतर दि. ७ जानेवारी २००३ ला एक परिपत्रक काढले आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की, " मा. उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल केलेल्या याचिका क्र. ४३४६/२००० मध्ये उच्च न्यायालयाने विना अनुदानीत शाळेत केलेल्या १२ वर्षांच्या सेवेनंतर सुधारित वेतनश्रेणी देण्यास काही शिक्षकांना पात्र ठरविण्यात आले आहे. शासनाच्या १५ जानेवारी १९९० च्या निवडश्रेणीत पात्रतेच्या अटीमध्ये सुधारणा करण्याचे शासनाने मान्य केले असून यानुसार सर्व अनुदानीत व विना अनुदानीत शिक्षकांना त्यांची १२ वर्षे सेवा निवडश्रेणीसाठी पात्र ठरविण्याचे शासनाने निश्चित केले आहे. " आता या ठिकाणी हायकोर्टाची थट्टा, मूळ २-९-१९८९ च्या शासन निर्णयाची थट्टा चालविली आहे. आता जे शासन निर्णयामध्ये नाही, त्याबाबत परिपत्रक काढून अशा प्रकारे काही तरी लादण्याचा खालच्या अधिकाऱ्याला अधिकार नाही. सभापती महोदय, आता याबाबत वित्त विभागाकडे जाण्याची गरज नाही, कारण हा हायकोर्टाचा निर्णय आहे. आता मागे याबाबत एक महिन्यात कार्यवाही करतो असे सांगितले होते. त्याला आता तीन महिने झाले तरी काहीच झाले नाही. म्हणून याबाबत हायकोर्टाचा निर्णय, आपला मूळ शासन निर्णय याचा आदर झाला पाहिजे, असे माझे मत आहे. आता आम्ही हायकोर्टाचे जजमेंट देवूनही याबाबतची कार्यवाही होत नाही, ही दुर्देवाची गोष्ट आहे. म्हणून आज, उद्या किंवा परवा याबाबतचे आदेश निर्गमित होतील काय ?

**श्री. अमरिश पटेल :** सभापती महोदय, याबाबतचे निर्णय निर्गमित केल्यानंतर यामध्ये किती शिक्षक अंतर्भूत होणार आहेत..

( गोंधळ )

**श्री. व्ही. यु. डायगव्हाणे :** सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी आपल्या आश्वासनाचा भंग केला आहे. आम्ही या ठिकाणी एवढे धडपडत आहोत, त्याला काय अर्थ आहे ?

( गोंधळ )

**श्री. बी. टी. देशमुख :** सभापती महोदय, हायकोर्टाने दिलेल्या निर्णयाप्रमाणे हे शासन वागत नाही. शासनाच्या निर्णयामध्ये विनाअनुदानाची सेवा धरू नका अशी अट नाही. असे हायकोर्टाने म्हटले आहे, त्याची कॉपी आम्ही आपणाला दिली आहे...

( गोंधळ )

सभापती महोदय, याचा वाईट मेसेज हा शिक्षण क्षेत्रात जात आहे. शासन निर्णयाच्या विरुद्ध काही अधिकाऱ्यांनी परिपत्रक काढले आहे. सभापती महोदय, शासन निर्णयामध्ये ती सेवा धरू नका ही बाब नाही. आता खालच्या अधिकाऱ्याने कोणी तशा प्रकारचे परिपत्रक काढले असेल तर त्याचा खुलासा आपण घ्या. आता त्या अधिकाऱ्याला शासन निर्णयाच्या विरुद्ध परिपत्रक काढण्याचा अधिकार नाही. म्हणून दोन दिवसात, चार दिवसात याबाबतचे आदेश निर्गमित होतील काय?

**श्री. अमरीश पटेल :** आपण जे सांगत आहात त्याबाबत मी पूर्वी सांगितले आहे. जानेवारी २००३ मध्ये परिपत्रक काढले आहे त्यामध्ये लिहिले आहे.

**श्री. बी. टी. देशमुख :** परिपत्रक नाही, हायकोर्टाने सांगितले...

**श्री. अमरीश पटेल :** मी सांगतो ते आपण ऐकून घ्या....

**श्री. बी. टी. देशमुख :** तुम्ही शासन निर्णयाप्रमाणे असे म्हटले आहे....

**श्री. अमरीश पटेल :** माझे आपण पहिल्यांदा ऐकून तरी घ्या. मी दोन शब्द सांगितले की, आपण उभे रहाता. ठीक आहे, मग मी संध्याकाळी ६ वाजेपर्यंत इथे बसून रहातो....

**श्री. बी. टी. देशमुख :** आपण परिपत्रकाचे कौतुक करू नका. मी हायकोर्टाच्या निर्णयाची माहिती दिली.

**श्री. अमरीश पटेल :** हायकोर्टामध्ये जो निर्णय झाला त्यानंतर हे परिपत्रक डिक्लेअर झाले. ज्यांची १२ वर्षे सेवा झाली आहे, त्यांना सुधारित वेतनश्रेणी देण्याच्या बाबतीत काही शिक्षकांना पात्र ठरविले आहे. त्या धर्तीवर शासनाने १५ जानेवारी १९९० ची निवड श्रेणीची पात्रता आहे. त्यामध्ये सुधारणा करण्याचे शासनाने मान्य केले असून सर्व अनुदानित आणि विना अनुदानित शाळांतील शिक्षकांना त्यांची १२ वर्षांची सेवा निवडश्रेणी पात्र ठरविण्याचे शासनाने निश्चित केले आहे.

**श्री. बी. टी. देशमुख :** माझे असे म्हणणे आहे की, आपण म्हणता शासनाने निर्णय घेतला आहे. तर मग हा प्रश्न सुटला आहे. मला फक्त एकच माहिती पाहिजे की, शासनाचा निर्णय निर्गमित झाला असेल तर त्याची तारीख काय आहे? आणि निर्गमित झाला नसेल तर दोन तीन दिवसात तो निर्गमित होईल काय?

**श्री. अमरीश पटेल :** सभापती महोदय, जानेवारी २००३ मध्ये डिक्लेअर केला आहे त्याची प्रत माझ्याकडे आहे.

**श्री.बी.टी.देशमुख :** म्हणजे ती सेवा धरली जाईल काय?

**श्री. अमरीश पटेल :** तसे परिपत्रकात लिहिले आहे.

**श्री. व्ही. यु. डायगव्हाणे :** किरकोळ रजेच्या संदर्भात आपण काही सांगितले नाही. किरकोळ रजेच्या संदर्भात निकष ठरविले आहेत. सभापती महोदय, मला आपले संरक्षण पाहिजे...

**उपसभापती :** मी आपल्याला खूप संरक्षण दिले आहे...

**श्री. व्ही. यू. डायगव्हाणे :** प्रश्न असा आहे की, उर्वरित शाळांची यादी एक महिन्यात जाहीर होईल काय?

**श्री. अमरीश पटेल :** मी यापूर्वीच सांगितले आहे की, ही यादी इतक्या लवकर जाहीर होणार नाही. त्याकरिता वेळ लागेल. त्याकरिता जितका वेळ आवश्यक असेल तितका द्यावा लागेल. मी सांगितले आहे की, ५ दिवसाच्या आत त्यावर सही करुन तो प्रस्ताव वित्त मंत्रालयाकडे जाईल, त्यानंतर तो कॅबिनेटपुढे जाईल, तो प्रस्ताव कॅबिनेटमध्ये मंजूर करण्याचा मी प्रयत्न करीन. त्यानंतर न्यायालयात जाईल आणि त्यानंतर यादी डिक्लेअर होईल.

**श्री. बी. टी. देशमुख :** बरोबर आहे, माझा एकच प्रश्न असा आहे की, निवड श्रेणीसाठी विना अनुदानित शाळातील सेवा धरली जाईल याबद्दल शासन निर्णय जानेवारी २००३ मध्ये जाहीर झाला आहे काय?

**श्री. अमरीश पटेल :** होय, असा निर्णय झाला आहे हे मी आपल्याला सांगितले आहे.

**श्री. व्ही. यू. डायगव्हाणे :** सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले नाही..

**उपसभापती :** लक्षवेधी सूचनेवर चर्चा बरीच झाली आहे, आता आपण पुढे जावू...

**श्री. व्ही. यू. डायगव्हाणे :** सभापती महोदय, मंत्रिमहोदयांकडून समाधानकारक उत्तर मिळत नाही याचा निषेध करुन आम्ही सभात्याग करीत आहोत.

(काही सन्माननीय सदस्य सभात्याग करतात.)

*****

## (८)
## वरिष्ठ व निवड श्रेणीसाठी विनाअनुदानित शाळांतील सेवाकाळ ग्राह्य धरण्याबाबत

*महाराष्ट्र विधानपरिषद : : चौथे अधिवेशन २००३*
*बुधवार, दिनांक १० डिसेंबर, २००३*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड १३३, क्रमांक ३, पृष्ठ*

**(४६) * ३७२२४ श्री. व्हि. यू. डायगव्हाणे, प्रा. बी. टी. देशमुख, श्री. वसंतराव खोटरे, श्री. प.म. पाटील , श्री. नानासाहेब बोरस्ते , श्री. जी. एल. ऐनापूरे :** दिनांक २५ जुलै, २००३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या, तिसऱ्या यादीतील प्रश्न क्रमांक ३०२४९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विना अनुदानित माध्यमिक शाळांतील शिक्षकांची सेवा वरिष्ठ/निवडश्रेणीसाठी ग्राहय धरण्याबाबतच्या विचाराधीन प्रस्तावावरील शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे हे खरे आहे काय ;

(२) दिनांक २५ जुलै, २००३ रोजी सभागृहात दिलेल्या याबाबतचा शासन निर्णय एक महिन्याच्या आत निश्चितपणे काढण्यात येईल, या आश्वासनाची सद्य:स्थिती काय आहे ;

(३) असल्यास, याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहेत ;

(४) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमरीशभाई पटेल :** (१) नाही.

(२), (३), व (४) सदर प्रकरणी वित्त विभागाने उपस्थित केलेल्या मुद्यांच्या पुर्ततेसह संबंधित नस्ती वित्त विभागाकडे पाठविण्यात येत आहे.

******

(७)

# राज्यातील शिक्षक/शिक्षणविषयक प्रलंबित मागण्या

*महाराष्ट्र विधानपरिषद : शुक्रवार, २५ जुलै २००३ : तिसरे अधिवेशन २००३*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड १३२, क्रमांक १०, पृष्ठ १०६ ते १०९*

राज्यातील शिक्षक/शिक्षणविषयक प्रलंबित मागण्यांबाबत **सर्वश्री व्हि.यू.डायगव्हाणे, बी.टी.देशमुख, प.म.पाटील, नानासाहेब बोरस्ते, व्ही.डी.खोटरे व गजेंद्र अैनापुरे** यांनी दिलेली नियम ९३ अन्वये सूचना.

**श्री.राजेंद्र शिंगणे (शालेय शिक्षण राज्यमंत्री) :** अध्यक्ष महोदय, सर्वश्री व्हि.यू.डायगव्हाणे, बी.टी.देशमुख,प.म.पाटील,नानासाहेब बोरस्ते, व्ही.डी.खोटरे व गजेंद्र अैनापुरे यांनी "राज्यातील शिक्षक/शिक्षणविषयक प्रलंबित मागण्या" या विषयावर नियम९३ अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**मा.शालेय शिक्षण मंत्री यांचे निवेदन**

राज्यातील शिक्षक व शिक्षण विषयक प्रलंबित मागण्या संदर्भात मा.शालेय शिक्षण मंत्री यांनी वेळोवेळी दिलेल्या आश्वासनांच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार वेतन मंजूर करताना राज्यातील सर्व शासकीय कर्मचाऱ्यांना ८ नैमित्तिक रजा मंजूर करण्यात आल्या आहेत व अशासकीय शाळेतील कर्मचाऱ्यांना सुद्धा ८ नैमित्तिक रजा मंजूर केलेल्या आहेत. शिक्षक कर्मचाऱ्यांना असलेल्या दीर्घकालीन सुट्टीतील काही सुट्ट्या कमी करुन अशासकीय शाळेतील कर्मचाऱ्यांना १५ नैमित्तिक रजा मंजूर करता येतील किंवा कसे, या दृष्टिकोनातून प्रस्तावावर फेरविचार करण्यात येत आहे.

२. **विनाअनुदानित शाळेमध्ये केलेली सेवा शिक्षकांना वरिष्ठश्रेणी व निवडश्रेणीसाठी ग्राह्य धरण्याचा प्रस्तावही शासनाच्या विचाराधीन आहे.**

३. मान्यताप्राप्त खाजगी माध्यमिक शाळा अनुदानावर आणण्याबाबत जे ९० गुणांचे निकष निर्धारीत करण्यात आले आहेत. ते निकष शिथिल करण्या संदर्भातील मागणी विचारात घेऊन त्यामध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून, तो विचाराधीन आहे.

४. सुधारित अनुदान सूत्रानुसार इयत्ता ५ वी ते ७ वी च्या निकषानुसार पात्र असलेल्या विनाअनुदानित ४११ अतिरिक्त तुकड्यांना सन २००२-२००३ या आर्थिक वर्षात अनुदान सुरु करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील सन १९९७-१९९८ पूर्वीच्या विनाअनुदानित ५३३ वर्ग/तुकड्यांना बयाच्या टप्प्यानुसार नोव्हेंबर २००२ पासून अनुदान सुरु करण्यात आले आहे.

५. सन १९९८-९९ पर्यंत थकीत राहिलेले रु.२१.४२ कोटी एवढे अनुदान दि.३१ मार्च, २००३ पूर्वी व रु. ६.४१ कोटी एवढे अनुदान दि.३१ मार्च, २००३ रोजी असे एकूण रु.२७.८३ कोटी एवढे अनुदान अदा करण्यात आलेले आहे.

गेल्या काही वर्षात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेळेवर व नियमित वेतन होत नव्हते व त्यासंबंधी संबंधित लोकप्रतिनिधी व संघटनांकडून हा प्रश्न वारंवार उपस्थित केला जात होता. या प्रश्नाचे गांभीर्य अनुलक्षून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नियमित वेतन अदा करता यावे म्हणून खाजगी, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना व तुकड्यांना अनुदान देण्याची मंजूरी जिल्हास्तरीय योजनेस सन २००२-२००३ पासून राज्यस्तरीय योजनेमध्ये रुपांतर करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनाची पुरेशी तरतूद उपलब्ध व्हावी यास शासनाने प्रथम प्राधान्य दिलेले आहे. त्यामुळे मागील काही वर्षात वेतनेतर अनुदानासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध होऊ शकली नाही. वेतनेतर अनुदान अदा करण्यासाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन घेण्याच्या दृष्टीने शासन प्रयत्नशील आहे.

६. जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षकांना निवडश्रेणी लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

अशासकीय माध्यमिक शाळेतील व अध्यापक विद्यालयातील शिक्षकांना २४ वर्षांच्या सलग सेवेनंतर निवडश्रेणीचा फायदा इतर अटींच्या अधीन राहून दिनांक १ जानेवारी, १९८६ पासून लागू करण्याचा निर्णय, शासन निर्णय दिनांक ८ डिसेंबर, १९९५ अन्वये घेण्यात आला आहे. तथापि, यातील प्रत्यक्ष आर्थिक लाभ दिनांक १ जानेवारी, १९९५ पासून देण्यात आला आहे. हीच सवलत राज्यातील सर्वच प्राथमिक शिक्षकांना लागू करण्यासंदर्भातील प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

**सभापती :** केवळ एक-दोनच प्रश्न विचारण्यात यावेत.

**श्री.व्हि.यू.डायगव्हाणे :** सभापती महोदय, आपण आता जे निर्देश दिले आहेत त्यांचे तंतोतंत पालन करण्याचा आम्ही निश्चित प्रयत्न करतो. ही नियम ९३ ची सूचना आहे ही १५ जुलैला आम्ही पाच शिक्षक आमदार गेटजवळ बसलो होतो त्यावेळी आपण मंजूर केली. त्यावेळी आपण असे म्हटले होते की, यावर आज किंवा उद्या निवेदन करावे.ते निवेदन शेवटच्या दिवशी आले आहे. म्हणून आपण आम्हाला संरक्षण द्यावे.पाच-सात मुद्दे आहेत आणि दोन मंत्र्यांच्या संदर्भात हा प्रश्न आहे. म्हणून मी प्रत्येक मंत्र्यांना एक-एक प्रश्न विचारण्याचा प्रयत्न करतो. माझा पहिला प्रश्न असा आहे की, वरिष्ठ आणि निवड श्रेणीच्या संदर्भात **८ एप्रिल २००३ ला माननीय शिक्षण मंत्र्यांनी या ठिकाणी असे उत्तर दिले होते की, जी.आर.काढलेला आहे.जानेवारीमध्ये जी.आर.काढला असे सांगितले. पण आजपर्यंत जी.आर.काढलेला नाही.** म्हणून माझे म्हणणे असे आहे की, त्यावेळी जे काही सांगितले असेल ते ठीक आहे. पण आता तरी एक महिन्यांच्या आत वरिष्ठ आणि निवड श्रेणीच्या संदर्भात विना अनुदानित सेवा ग्राह्य धरण्यात येऊन त्यांना निवड आणि वरिष्ठ श्रेणी दिली जाईल काय आणि त्यासंबंधीचा जी.आर.एक महिन्यांच्या आत काढण्यात येईल काय ? सभापती महोदय, हे निवेदन आपण पहिल्या किंवा दुसऱ्या दिवशी करावयास सांगितले होते पण जाणीवपूर्वक ते केले नाही. यामध्ये सात-आठ मुद्दे आहेत आणि दोन मंत्र्यांचा संबंध आहे म्हणून एका मंत्र्यांना दोन प्रश्न असे दोन मंत्र्यांना चार प्रश्न मी विचारणार आहे.

**श्री.राजेंद्र शिंगणे :** सभापती महोदय, निवेदन करण्यास थोडा उशीर झाला ही गोष्ट मी मान्य करतो. **परंतु सन्माननीय सदस्यांनी विचारल्या प्रमाणे अशा पध्दतीचा जी.आर.एक महिन्याच्या आत निश्चितपणे काढण्यात येईल.**

**श्री.व्हि.यू.डायगव्हाणे :** एक महिन्याच्या आत जी.आर.काढण्याचे मंत्री महोदयांनी मान्य केले याबद्दल धन्यवाद. आता माझा दुसरा प्रश्न असा आहे की, नागपूर येथील डेप्युटी डायरेक्टरच्या कार्यालयासमोर ११वी आणि १२वीचे प्राध्यापक हे उपोषणाला गेल्या सात-आठ दिवसांपासून बसले आहेत त्यातील काहींना मार्च महिन्यापासून पेमेंट नाही. त्यांना रेग्युलर सॅलरी सुरू झाली पण मध्येच त्यांना अडकवून ठेवले आणि मार्चपासून सॅलरी बंद केली. तरी त्यांचे वेतन आपण दोन दिवसांमध्ये रिलीज कराल काय ? दुसरे असे की, तुकड्या अनुदानावर आणण्याच्या संदर्भात आपण जो जी.आर.काढला आहे तो १४ जुलै २०००ला काढला आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी १८ डिसेंबर २००२ रोजी सभागृहात असे आश्वासन दिले की, या जी.आर.चे मार्चपूर्वी तंतोतंत पालन केले जाईल. आपण १४ जुलै २००० ला जी.आर.काढला त्याचे आपण तंतोतंत पालन करून या तुकड्यांवरील शिक्षकांना आपण वेतन देणार काय ?

**श्री.राजेंद्र शिंगणे :** सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे ही बाब मी तपासून पहातो. कारण त्याची माहिती माझ्याजवळ आता नाही. परंतु माझ्या माहिती प्रमाणे ज्या तुकड्यांना मान्यता दिली गेली होती त्या तुकड्यांवरील अनुदान त्या काळामध्ये देय नव्हते. म्हणून कदाचित त्या शिक्षकांचा पगार राहिला असेल. परंतु याही पुढे जाऊन ती बाब आम्ही तपासून घेऊ आणि त्या शिक्षकांचा पगार विनाकारण त्या ठिकाणी राहिला असेल तर तो निश्चितपणे दोन महिन्यांच्या आत दिला जाईल.

**श्री.व्हि.यू.डायगव्हाणे :** सभापती महोदय, ग्रामीण विकासाच्या संदर्भात मला एक प्रश्न विचारावयाचा आहे.

**सभापती :** आज एकूण निवेदनांची संख्या लक्षात घेता लिखीत स्वरुपात जे निवेदन दिले आहे त्यावर आपण समाधान माना. एखादा प्रश्नच विचारा.

**श्री.प.म.पाटील :** सभापती महोदय, कनिष्ठ महाविद्यालयातील ४० हजार प्राध्यापकांना वेतन दिलेले आहे. पण जिल्हा परिषदेच्या सेवेत असलेल्या प्राध्यापकांना मात्र आपण वेतन दिलेले नाही. तरी ते आपण देणार आहात काय ?

**श्री.व्ही.यू.डायगव्हाणे :** ४२ दिवसाच्या संपकालीन कालावधीच्या वेतनासबंधीचा हा प्रश्न आहे शालेय शिक्षण विभागाने त्यांच्या ४२ हजार शिक्षकांना हे वेतन दिलेले आहे. ग्राम विकास विभागाकडील ४५० कर्मचाऱ्यांना हे वेतन देण्याचे राहिले आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये दोन आठवडयात हे प्रश्न निकाली काढू असे सांगितले होते त्याला आता आठ आठवडे झालेले आहेत तेव्हा पुढच्या एक महिन्यात तरी हा प्रश्न निकाली काढतो असे मंत्रिमहोदयांनी सांगावे.

**श्री.आर.आर.पाटील :** या प्रश्नाबाबत पूर्वी चर्चा झाली होती हे मला आठवते. माझ्या विभागाने आश्वासन दिले होते तेव्हा १५ दिवसाच्या आत वित्त विभागाकडे प्रस्ताव पाठविण्यात येईल आणि त्यांनी मागणी मान्य केल्यानंतर या शिक्षकांना वेतन दिले जाईल तसेच वित्त विभागाकडेसुध्दा मागणी मान्य करण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातील.

*******

(१०)

# माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षक कर्मचाऱ्यांची विना अनुदानित शाळेतील सेवा वरिष्ठ श्रेणीसाठी ग्राह्य धरणे

*महाराष्ट्र विधानपरिषद : बुधवार, १७ मार्च, २००४ : पहिले अधिवेशन २००४*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड १३४, क्रमांक ३, पृष्ठ १९*

(७) * ३९९४९ **श्रीमती संजीवनी रायकर , श्री. सुरेश भालेराव, श्री. प्रतापराव सोनवणे, डॉ. अशोक मोडक, श्री. विजय गिरकर दिनांक** १६-१२-२००३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या १७ व्या यादीतील प्रश्न क्रमांक ३३५८७ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकांची विना अनुदानित शाळेत केलेली सेवा वरिष्ठ श्रेणीसाठी ग्राह्य धरली पाहिजे या मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे हे खरे आहे काय ;

(२) असल्यास, त्यावर शासनाने निर्णय घेतला आहे काय ;

(३) असल्यास, निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे ;

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमरिशभाई पटेल** : (१) होय.

(२) नाही.

(३) प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

**श्रीमती संजीवनी रायकर :** अध्यक्ष महोदय, हा प्रश्न माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांच्या बाबतीत मर्यादित नसून एम.सी.व्ही.सी. वगैरेनाही लागू आहे. वास्तविक विनाअनुदानित शाळेतील सेवा वरिष्ठ श्रेणीसाठी धरावी यासाठी गेली पाच वर्षे आम्ही वेगवेगळी आयुधे वापरून हा प्रश्न उपस्थित केलेला आहे. माननीय शिक्षण मंत्र्यांबरोबर यासंदर्भात चर्चा झाली आहे. शिक्षण विभागाच्या सचिवांबरोबर चर्चा झाली आहे. तरीसुध्दा हा प्रश्न अजून विचाराधीन आहे.इतकेच नव्हे तर कोर्टाचा निर्णय लागून आणि त्या निर्णयाची प्रत जोडूनसुध्दा शासन हा प्रश्न अजून विचाराधीन ठेवीत आहे. एक तर अनुदानाचे निकष सतत बदलत असतात. शाळांना १०-१० वर्षे अनुदान मिळत नाही. तरी १२ वर्षानंतर या ठिकाणी काम करीत असलेल्या शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणी मिळाली पाहिजे पण त्यापासून शिक्षक वंचित आहेत. अजूनही हा प्रश्न शासनाने विचाराधीन ठेवला आहे.सेवाशर्ती नियमावलीमध्ये या शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणी देऊ नये असे कोठेही म्हटलेले नाही. तरी यासंदर्भातील निर्णय आपण किती दिवसांमध्ये घेणार आहात ?

**श्री.अमरिशभाई पटेल :** विना अनुदानित आणि अनुदानित शाळांमध्ये १२ वर्षे सेवा झाली असेल तर त्यासंदर्भात निर्णय घेण्यासाठी आम्ही वित्त विभागाकडे प्रस्ताव पाठविला होता. पण त्यांचे असे म्हणणे आहे की, सरसकट न देता अनुदानित शाळांना आपण १२ वर्षे ग्राह्य धरू.

**श्री.विनोद तावडे :** उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाप्रमाणे आपण विचार केलेला नाही.

**सभापती :** उच्च न्यायालयाचा किंवा कोणत्याही न्यायालयाचा जो काही निर्णय असेल तो राज्य सरकारवर बंधनकारक आहे. तरी हा निर्णय बंधनकारक आहे या सूचनेसह वित्त विभागाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे काय ?

**श्री.अमरिशभाई पटेल :** सभापती महोदय, माझे उत्तर सन्माननीय सदस्य पूर्ण होऊ देत नाहीत.

**सभापती :** ठीक आहे. आपण आपले उत्तर पूर्ण करा.

**श्री.अमरिशभाई पटेल :** मी आपल्याला सांगू इच्छितो की, उच्च न्यायालयाचा निर्णय झाला त्याप्रमाणे प्रकरण वित्त विभागाकडे पाठविले होते. त्यांनी असे सांगितले की, विना अनुदानित आणि अनुदानित याच्यामध्ये विनाअनुदानितच्या संदर्भात निर्णय घ्यावयाचा असेल तर कॅबिनेटसमोर हा विषय आणला पाहिजे. त्यामुळे हा विषय आपण कॅबिनेटसमोर घेऊन जाणार आहोत. प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे असे मी उत्तरामध्ये लिहिलेले आहे.

**सभापती :** म्हणजे यासंबंधीचा निर्णय कॅबिनेटने घ्यावयाचा असून मंत्री महोदय हा विषय कॅबिनेटसमोर ठेवणार आहेत.

**श्री. व्ही.यू.डायगव्हाणे :** अध्यक्ष महोदय, मी आपल्याला सांगू इच्छितो की, सन २००३ च्या पावसाळी अधिवेशनामध्ये यासंदर्भात राज्यमंत्र्यांनी असे उत्तर दिले होते की, **एक महिन्यात शासन निर्णय निर्गमित करतो. एवढेच नव्हे तर ११ डिसेंबर २००३ रोजी हिवाळी अधिवेशनातसुध्दा असे उत्तर सन्माननीय शिक्षण राज्यमंत्र्यांनी दिले होते की, "मी त्यांना सांगू इच्छितो की, याबाबतीत एक महिन्याच्या आत निर्णय घेतला जाईल." सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी पुन्हा प्रश्न विचारला की, "या बाबतीत एक महिन्याच्या आत निर्णय घेण्यात येईल काय?" त्या प्रश्नाला श्री.राजेंद्र शिंगणे, शालेय शिक्षण राज्यमंत्री यांनी असे उत्तर दिले की, एक महिन्याच्या आत निश्चितपणे निर्णय घेण्यात येईल. हायकोर्टाच्या निर्णयाला अनुसरून पॉझिटीव्ह निर्णय घेतला जाईल.** एवढे उत्तर सभागृहात दिल्यानंतर तसेच औरंगाबाद हायकोर्टाच्या खंडपीठाने या बाबतीत निर्णय दिल्यानंतर माननीय मंत्रीमहोदय पुन्हा अनुदानित आणि विनाअनुदानित शाळांच्या संदर्भात उत्तर देत आहेत. दिशाभूल होऊ नये म्हणून या बाबतीत मला निश्चितपणे सांगितले पाहिजे.की, विना अनुदानित शाळेतील कर्मचा-यांच्या सेवा प्रमोशनसाठी ग्राहय धरल्या जातात तसेच पेन्शनकरतासुध्दा ग्राहय धरल्या जातात. अशा प्रकारे या सेवा सगळया प्रयोजनासाठी ग्राहय धरल्या जातात फक्त वरिष्ठ श्रेणी देण्यासाठी ग्राहय धरल्या जात नाहीत.एवढाच त्या बाबतीतील मुद्दा आहे. बढतीकरता आणि पेन्शनकरिता त्यांच्या सेवा ग्राहय धरल्या जातात आणि वरिष्ठ श्रेणी देण्याकरता त्यांच्या सेवा ग्राहय धरल्या जात नाहीत. तेव्हा यामध्ये फायनान्स विभागाचा काय संबंध येतो.? बढतीसाठी आणि पेन्शनसाठी त्यांच्या सेवा ग्राह्य धरण्यात येतात. संबंधित अधिका-यांनी त्या जी.आर.मध्ये अशी मेख मारली आहे, त्या जी.आर.मध्ये असे वाक्य टाकले आहे की वरिष्ठ श्रेणी साठी या सेवा ग्राह्य धरु नका. तेव्हा त्या अधिका-यांच्या तब्येती आणि तो जी.आर. पुन्हा तपासून पाहण्यात यावा.बाकीच्या सगळया प्रयोजनाकरता या सेवा ग्राहय धरल्या जातात आणि केवळ वरिष्ठ श्रेणी आणि निवड श्रेणीकरता त्यांना वंचित ठेवले जात असेल तर ते बरोबर नाही.या बाबतीत **या पूर्वी सभागृहात माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे की, एक महिन्यात हा निर्णय घेऊ. त्यांनी असे आश्वासन दिल्यानंतर तुम्ही त्यांची फजिती करीत आहात काय?** त्यांनी एक महिन्यात निर्णय करु असे म्हटल्यानंतर आठ दिवसात निर्णय करु असे आपण म्हणावयास पाहिजे होते. परंतु तसे न म्हणता उलट अगोदरच्या उत्तरापासून आपण मागे जात आहात.या संबंधीचा निर्णय आठ दिवसात झाला पाहिजे.तेव्हा आठ दिवसात निर्णय घेण्यात येईल असे उत्तर देऊन आपण ती कृती करुन दाखवावी असे मला वाटते.

**सभापती** : माननीय मंत्रिमहोदयांना मी सांगू इच्छितो की, याबाबतीत न्यायालयाला जो निर्णय योग्य वाटला तो निर्णय न्यायालयाने दिलेला आहे. त्या निर्णयाची अंमलबजावणी शासनाने करावयास पाहिजे. त्याचबरोबर या सभागृहात दोन वेळा माननीय राज्यमंत्र्यांनी असे सांगितले आहे की,या संबंधी एक महिन्यात निर्णय घेऊ. असे असतांना याबाबतचा निर्णय घेण्यास विलंब लागण्याचे कोणतेही कारण नाही. या सभागृहात राज्यमंत्र्यांनी दोन वेळा दिलेले आश्वासन तसेच या आश्वासनाचा संबंध सुध्दा हायकोर्टाने दिलेला निर्णय हा आहे हे लक्षात घेता या संबंधीचा निर्णय घेण्यास दोन महिन्यांचा विलंब लागण्याचे कारण काय आहे? तेव्हा आता आपण अशा प्रकारची घोषणा करावी की, ती घोषणा कोठल्याही प्रकारे मागच्या आश्वासनाशी विसंगत राहणार नाही. तेव्हा आता आपण निश्चित स्वरुपाची घोषणा करावी आणि त्या प्रमाणे कार्यवाही करावी.

**श्री.अमरिशभाई पटेल** : सभापती महोदय, त्याबाबतीत मी मघाशीच सांगितले आहे की वित्त विभाग त्यासंबंधी काही ऑब्जेक्शन घेणार नाही. असे त्यावेळेस वाटले होते. परंतु त्यांनी असे सांगितले की, मंत्रिमंडळासमोर हा विषय आणावा. तेव्हा आम्ही मंत्रिमंडळासमोर हा विषय आणणार आहोत. एक दोन कॅबिनेटच्या बैठकीनंतर हा विषय आम्ही कॅबिनेटसमोर आणतो आणि आता आचारसंहिता असल्यामुळे मंत्रिमंडळाचा जो निर्णय होईल तो निर्णय २५ मे नंतर जाहीर करतो.

**श्री.व्ही.यू.डायगव्हाणे :** सभापती महोदय, आपल्या सभागृहाची काही गरिमा

(११)

# वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी विना अनुदानित शाळांतील सेवाकाळ ग्राह्य धरण्याबाबत

*महाराष्ट्र विधानपरिषद : बुधवार, २ जुन, २००४ : दुसरे अधिवेशन २००४*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड १३५, क्रमांक ९, पृष्ठ*

(३) * ४१७५३ **श्री. प.म. पाटील , प्रा. बी. टी. देशमुख, श्री.व्हि. यू. डायगव्हाणे, श्री. वसंतराव खोटरे, श्री. नानासाहेब बोरस्ते , श्री. जी. एल. अैनापूरे, श्रीमती संजीवनी रायकर, श्री. सुरेश भालेराव, डॉ. अशोक मोडक, श्री. प्रतापराव सोनवणे :** तारांकित प्रश्न क्रमांक ३९९४९ ला दिनांक १७ मार्च,२००४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरिष्ठ श्रेणी व निवडश्रेणीसाठी विनाअनुदानित शाळेतील सेवाकाळ अनुज्ञेय न धरण्याची कृति ही नियमबाह्य आहे असा जो धोरणात्मक निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिनांक १४ सप्टेंबर २००० रोजी एका याचिकेमध्ये ( सन २००० ची याचिका क्रमांक ४३४६ ) दिला त्याची धोरणात्मक अंमलबजावणी करण्याच्या प्रश्नाची सद्यःस्थिती काय आहे ;

(२) विनाअनुदानित माध्यमिक शाळातील शिक्षकांची सेवा वरिष्ठ श्रेणीसाठी ग्राह्य धरण्याबाबतच्या विषयावरील मंत्रिमंडळाचे सभेत चर्चा करुन निर्णय दिनांक २५ मे २००४ पूर्वी जाहीर करण्याबाबतच्या कारवाईची सद्यःस्थिती काय आहे ;

(३) विनाअनुदानित माध्यमिक शाळातील शिक्षक / मुख्याध्यापकांचा सेवाकाळ, बढती, निवृत्तीवेतन या मुख्य प्रयोजनासाठी अनुज्ञेय धरल्या जातो परंतु वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी ग्राह्य धरल्या जात नाही हा भेदभाव दूर करण्याबाबत शासनाने काय कारवाई केलेली आहे ;

(४) अद्याप कारवाई केलेली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमरिशभाई पटेल** : (१), (२) व (३) याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाच्या सूचनेनुसार मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

**श्री.प.म.पाटील :** सभापती महोदय, वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी विना अनुदानित शाळांतील सेवाकाळ ग्राह्य धरण्यासंबंधीचा हा विषय आहे. नागपूर अधिवेशनामध्ये १० डिसेंबरला हा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. त्यावेळेस शासनाने उत्तर दिले की, सदर प्रकरणी वित्त विभागाने उपस्थित केलेल्या मुद्याच्या पूर्ततेसह संबंधित नस्ती वित्त विभागाकडे पाठविण्यात येत आहे. आजच्या या प्रश्नामधील प्रश्न क्रमांक १,२ व ३ ला वित्त विभागाच्या सूचनेनुसार प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात येत आहे अशाप्रकारचे उत्तर दिलेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, हा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या समोर १ महिन्याच्या आत नेऊन त्याला मान्यता घेणार आहे काय ?

**श्री.अमरिशभाई पटेल :** सभापती महोदय, वित्त मंत्रालयाने सुचविले आहे त्याप्रमाणे आम्ही हा प्रस्ताव कॅबिनेटकडे १ महिन्याच्या आत घेऊन जाणार आहोत.

**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, ही बाब वित्त मंत्रालयासमोर नेण्याची अजिबात गरज नाही. हा हायकोर्टाचा निर्णय आहे. माझे म्हणणे आहे की, **न वाचता, न पाहता प्रश्नाची उत्तरे द्यावयाची हे योग्य नाही.** माझे म्हणणे असे आहे की, दि.२/९/१९८९ च्या शासन निर्णयाप्रमाणे या वेतनश्रेणी दिल्या जातात. त्या शासन निर्णयामध्ये कोठेही विना अनुदानाची सेवा धरु नये असे नाही. तो शासन निर्णय वित्त विभागाच्या दिनांक २/९/१९८९ च्या अनौपचारिक मान्यतेनंतर निर्गमित झालेला आहे. आम्ही म्हणतो की, ती सर्व सेवा अनुदानितच पाहिजे, विना अनुदानित नको असे त्या शासन निर्णयात कोठेही म्हटलेले नाही. एका अधिका-याने हे पत्रक काढलेले आहे. हे प्रकरण हायकोर्टात गेले होते आणि त्या बाबतीत हायकोर्टाने निर्णय दिला. **सन. २००० ची याचिका क्रमांक ४३४६ च्या बाबतीत हाय कोर्टाने असा निर्णय दिला होता की,**

"It may be mentioned at this stage that the G.R. dated 2-8-89 nowhere mentions that the qualified service of the teachers of schools should be from school which are brought on grant. It is required to be noted that the qualification prescribed for the aided schools are the same as for the unaided schools and there are no separate rules for unaided school."

हे प्रकरण जेव्हा हायकोर्टात गेले तेव्हा हायकोर्टाने याबाबतीत जज्जमेन्ट दिले होते की ,तुमच्या शासननिर्णयाप्रमाणे याची काही आवश्यकता नाही. **असे असतांनासुध्दा अजूनही वित्त विभागाचे कौतूक सुरुच आहे.** या बाबतीत माझे असे म्हणणे आहे की, वित्त विभागाच्या सहमतीने तुम्ही १९८९ चा शासन निर्णय काढला होता. त्याविषयी एका खालच्या अधिकाऱ्याने सांगितले की, असे नाही तर असे असे पाहिजे. त्यानंतर हायकोर्टाने कसे पाहिजे ते सुध्दा आहे किंवा नाही ? माननीय मंत्रिमहोदयांनी दिलेल्या आश्वासनाला काही महत्व आहे किंवा नाही? दिलेले आश्वासन पाळण्याच्या बाबतीत काही बंधन आहे की नाही? जर बंधन नसेल तर "नाही" असे म्हणा. आश्वासन देऊ परंतु ते पाळण्याचे बंधन नाही असे आपण सांगा.आम्ही आपल्याला यातून मुक्त करतो आणि आम्ही एकही प्रश्न विचारणार नाही.परंतु यापूर्वी माननीय राज्यमंत्र्यांनी सभागृहात जे आश्वासन दिले होते ते मी येथे आताच वाचून दाखविले आहे.एक महिन्यात निर्णय करतो असे त्यांनी सांगितले होते. तसेच या बाबतीत हायकोर्टाने निर्णय सुध्दा दिलेला आहे.या शिक्षकांनी विना अनुदानित शाळेत केलेली सेवा वरिष्ठ श्रेणीसाठी ग्राहय धरली जात नाही. बढतीसाठी तसेच पेन्शनसाठी ती सेवा ग्राहय धरली जाते. पे स्केल आणि फिक्सेशन करता ही सेवा ग्राहय धरली जाते. त्यांना त्याप्रमाणे आर्थिक लाभ मिळतो. केवळ वरिष्ठ श्रेणी साठी ही सेवा ग्राह्य न धरण्याच्या बाबतीत त्या जी.आर. मध्ये संबंधित अधिकाऱ्याने अशी खुंटी मारली आहे. त्यावेळी त्या अधिका-याची तब्येत बरोबर नव्हती. ती काढणे एवढेच फक्त काम शिल्लक आहे.ते काम सुध्दा लवकरत होत नसेल तर त्याला काही अर्थ नाही. मी पुन्हा माननीय मंत्रिमहोदयांना अशी विनंती करतो की, अधिवेशनाचा आजचा शेवटचा दिवस आहे तेव्हा आज तरी एखादे पॉझिटीव्ह व चांगले उत्तर द्यावे आणि एक आठवडयात हा निर्णय करु असे सांगावे.

**श्री.अमरिशभाई पटेल :** मी आपल्याला सांगितले आहे की , २५ मे पर्यन्त कॅबिनेटसमोर हा विषय आणतो.तेव्हा तेथपर्यन्त आपण वाट पहावयास पाहिजे.

**श्री.व्ही.यू.डायगव्हाणे :** २५ मे ला जी.आर. काढणार काय ?

**श्री.अमरिशभाई पटेल** : कॅबिनेट समोर २५ मे पूर्वी हा विषय आणतो आणि जो निर्णय होईल तो २५ मे पूर्वी जाहीर करतो.

******

(९)

## माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षक कर्मचाऱ्यांची विनाअनुदानित शाळेतील सेवा वरिष्ठ श्रेणीसाठी ग्राह्य धरणे

*महाराष्ट्र विधानपरिषद : : चौथे अधिवेशन २००३*
*मंगळवार, दिनांक १६ डिसेंबर, २००३*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड १३३, क्रमांक ७, पृष्ठ २९१*

(२) ३३५८७ (१२.८.२००३) **श्री. नानासाहेब बोरस्ते, प्रा. बी. टी. देशमुख, श्री. व्हि. यू. डायगव्हाणे, श्री. वसंतराव खोटरे, श्री. प.म. पाटील, श्री. जी. एल. अैनापूरे, डॉ.एन.पी.हिराणी :** सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षकाने विनाअनुदानित शाळेत केलेली सेवा वरिष्ठ श्रेणीसाठी ग्राह्य धरली पाहिजे असा निर्णय मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिनांक १४ सप्टेंबर २००० रोजी याचिका क्रमांक ४३४६ ऑफ २००० या प्रकरणात दिला, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, मा. उच्च न्यायालयाच्या या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने काढलेले आदेश कोणत्या तारखेपासून लागू केलेले आहेत;

**श्री. अमरीशभाई पटेल** (७.११.२००३) : (१) होय

(२) प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

******

सांगितले आहे. **हाय कोर्टाने निर्णय दिलेला आहे व तो धोरणात्मक निर्णय आहे. हे आपण वित्त विभागाला सांगा.** तेव्हा या बाबतीत वित्त विभागाचे कौतूक न करता ताबडतोबीने अंमलबजावणी करण्यात येईल काय ?

**श्री.अमरिशभाई पटेल :** सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे वित्त विभागाला पुन्हा कळविण्यात येईल.

**श्री.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, ७ जानेवारी २००३ रोजी महाराष्ट्र शासनाच्या अवर सचिवांनी, श्री. मोहन पांढरकामे यांनी एक पत्र दिले होते आणि त्या पत्रात असे म्हटलेले आहे की, "माननीय उच्च न्यायालय,मुंबई येथे दाखल केलेल्या याचिका क्रमांक ४३४६/ २०००मध्ये माननीय उच्च न्यायालयाने विना अनुदानित शाळेत गेलेल्या १२ वर्षांच्या सेवेनंतर सुधारित वेतनश्रेणी देण्यास काही शिक्षकांना पात्र ठरविण्यात आलेले आहे.याच धर्तीवर शासनाच्या दिनाक १५ जानेवारी १९९०च्या निवडश्रेणीस पात्र ठरणा-या अटीत सुधारणा करण्याचे शासनाने मान्य केलेले असून यानुसार सर्व अनुदानित व विना अनुदानित शाळेतील शिक्षकांना त्यांची १२ वर्षाची सेवा निवड श्रेणीसाठी पात्र ठरविण्याचे शासनाने निश्चित केलेले आहे." सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी ही गोष्ट ऐकून हायकोर्टाच्या निर्णयाचा सन्मान करावा..या संदर्भात आणखी काय विचारावे ? हे आम्हाला काही कळत नाही.या उत्तरामुळे संपूर्ण राज्यात काय मेसेज जातो.? देशाच्या घटनेप्रमाणे, हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतर त्याची अंमलबजावणी करणे हे बंधनकारक आहे. एवढेच आपण त्यांना सांगा आणि एवढे सांगून आठ दिवसात यासंबंधीचा आदेश आपण काढणार आहात काय ?

**श्री.अमरिशभाई पटेल :** सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी या ठिकाणी ज्या व्यथा मांडल्या आहेत त्या व्यथांबाबत आम्ही त्यांना कळविलेले आहे की, **उच्च न्यायालयाने एका विषयाच्या बाबतीत व एका शिक्षकाच्या बाबतीत निर्णय दिला आहे व तो निर्णय सर्वांना लागू करावयास पाहिजे.**

**श्री.बी.टी.देशमुख : एका शिक्षकाच्या बाबतीत निर्णय दिलेला नाही तर २० शिक्षकांच्या बाबतीत निर्णय दिला आहे आणि तो सर्वांना लागू होणारा पॉलिसी डिसीजन आहे.**

( उत्तर दिले नाही )

**श्रीमती संजीवनी रायकर** :सभापती महोदय, या संदर्भात हायकोर्टाने निर्णय दिला आहे हे मान्य आहे. परतु माननीय शिक्षण मंत्र्यानी कबूल केलेले आहे. की २५ तारखेला आचारसंहिता संपते तेव्हा आचारसंहिता संपल्यानंतर ताबडतोब निर्णय घेऊ..२५ तारखेला आचारसंहिता न संपता ती अगोदरच म्हणजे १३ तारखेला संपली होती. तेव्हा मध्यंतरीच्या काळात आपण कॅबिनेटसमोर हा प्रस्ताव का ठेवला नाही ? कॅबिनेटसमोर जाण्यासाठी इतके दिवस का लागले? २५ तारखेच्या बाबतीत जो शब्द देण्यात आला होता तो का पाळण्यात आला नाही. ?

**श्री.अमरिशभाई पटेल :** सन्माननीय सदस्यांचे म्हणणे बरोबर आहे की, २५ मे पर्यन्त निर्णय घेऊ असे मी सांगितले होते व ती फाईलसुध्दा मुव्ह केली होती. परंतु २५ मे पर्यन्त आचारसंहिता असल्यामुळे तो निर्णय करु शकलो नाही. त्यानंतर वित्त विभागाने असे सांगितले की, हा प्रस्ताव कॅबिनेटसमोर आणावा. **आता आम्ही हा प्रस्ताव कॅबिनेटसमोर घेऊन जात आहोत. त्यासंबंधीची फाईल मुव्ह झालेली आहे.या संबंधी जो काही निर्णय घ्यावयाचा असेल तो निर्णय एक महिन्याच्या आत घेण्यात येईल.**

**श्री.व्ही.यू.डायगव्हाणे :** विनाअनुदानित शाळातील सेवा सर्वच प्रयोजनासाठी गृहित धरलेली आहे. ही सेवा कोण कोणत्या प्रयोजनासाठी गृहित धरलेली आहे हे मी आपल्याला सांगतो. वेतनवाढीसाठी ,बढतीसाठी ......

**सभापती :** त्याच्या तपशीलामध्ये जाण्याची आवश्यकता नाही.या संदर्भात हायकोर्टाने निर्णय दिलेला आहे तेव्हा त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. वित्त विभागाकडून या संदर्भात केव्हा परवानगी घेणार आहात ? असे आपण माननीय मंत्रिमहोदयांना विचारावे.

**श्री.व्ही.यू.डायगव्हाणे :** या बाबतीत हायकोर्टाने निर्णय दिला आहे त्याचप्रमाणे सभागृहात तीन वेळा आश्वासने दिलेली आहेत. माननीय राज्यमंत्र्यांनी असे सांगितले होते की, या बाबतीत २५ मे पूर्वी निर्णय घेतो. **त्याचबरोबर १० डिसेंबर २००३ मध्ये असे सांगितले होते की, एक महिन्यात पॉझीटीव्ह निर्णय घेतो.** आता १७ मार्च २००४ ला पुन्हा या संबंधीचा प्रश्न विचारण्यात आला

## (१२)
## वरिष्ठ व निवडश्रेणी विना अनुदानित शाळांतील सेवाकाळ ग्राह्य धरण्याबाबत

*महाराष्ट्र विधानपरिषद : : दुसरे अधिवेशन २००४*
*बुधवार, २ जुन, २००४*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड १३५, क्रमांक ९, पृष्ठ*

**(३) * ४१७५३ श्री. नानासाहेब बोरस्ते , प्रा. बी. टी. देशमुख, श्री.व्हि. यू. डायगव्हाणे, श्री. वसंतराव खोटरे, श्री. प.म. पाटील , श्री. जी. एल. अैनापूरे, डॉ.एन.पी.हिराणी :** दिनांक २४ जुलै २००३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या तिसऱ्या यादीतील प्रश्न क्रमांक ३०२४९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरिष्ठ श्रेणी व निवडश्रेणीसाठी विनाअनुदानित शाळेतील सेवाकाळ अनुज्ञेय न धरण्याची कृति ही नियमबाह्य आहे असा धोरणात्मक निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिनांक १४ सप्टेंबर २००० रोजी एका याचिकेमध्ये ( सन २००० ची याचिका क्रमांक ४३४६ ) दिला हे खरे आहे काय;

(२) असल्यास, विनाअनुदानित माध्यमिक शाळातील शिक्षक मुख्याध्यापकांचा सेवाकाळ, बढती, निवृत्ती वेतन या मुख्य प्रयोजनासाठी अनुज्ञेय धरला जातो, परंतु वरिष्ठ श्रेणी व निवडश्रेणीसाठी ग्राह्य धरल्या जात नाही. हा भेदभाव दूर करण्याबाबत शासनाने काय कारवाई केलेली आहे;

(३) अद्याप कारवाई केलेली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमरिशभाई पटेल** (६.४.२००४) : (१) होय

(२) प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

******

## (१३)
## वरिष्ठ व निवडश्रेणी विनाअनुदानित शाळांतील सेवाकाल ग्राह्य धरण्याबाबत

*महाराष्ट्र विधानपरिषद : : दुसरे अधिवेशन, २००४*
*शुक्रवार, दिनांक ११ जुन, २००४*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड १३५, क्रमांक १५, पृष्ठ*

(२) ३६७३९ (९-१-२००४). **श्री.नानासाहेब बोरस्ते, प्रा.बी.टी.देशमुख, श्री.व्ही.यू.डायगव्हाणे, श्री.वसंतराव खोटरे, श्री.प.म.पाटील, श्री.जी.एल.अैनापूरे, डॉ.एम.पी.हिराणी :** दिनांक २४ जुलै २००३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या तिसऱ्या यादितील प्रश्न क्रमांक ३०२४९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरिष्ठ श्रेणी वा निवडश्रेणीसाठी विना अनुदानित शाळेतील सेवाकाळ अनुज्ञेय न धरण्याची कृती ही नियमबाह्य आहे असा धोरणात्मक निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिनांक १४ सप्टेंबर २००० रोजी एका याचिकेमध्ये (सन २००० ची याचिका क्रमांक ४३४६ ) दिला. हे खरे आहे काय;

(२) असल्यास, विना अनुदानित माध्यमिक शाळांतील शिक्षक मुख्याध्यापकांचा सेवाकाळ बढती,निवृत्ती वेतन या मुख्य प्रयोजनासाठी अनुज्ञेय धरला जातो. परंतु वरिष्ठ श्रेणी व निवडश्रेणीसाठी ग्राह्य धरल्या जात नाही. हा भेदभाव दूर करण्याबाबत शासनाने काय कारवाई केलेली आहे;

(३) अद्याप कारवाई केलेली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.अमरिशभाई पटेल** (६-४-२००४) : (१) होय.

(२) प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

******

होता तेव्हाही असे सांगण्यात आले होते की, "एक महिन्यात, २५ मे पूर्वी निर्णय घेतो." परंतु अजूनही निर्णय घेण्यात आलेला नाही.याचा अर्थ राज्यमंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करावयाची नाही असे वित्त विभागाने ठरविलेले आहे काय? राज्यमंत्र्यांना फेल करण्याचे ठरविले आहे काय ? म्हणून माझा येथे प्रश्न असा आहे की, माननीय राज्यमंत्र्यांनी जे आश्वासन दिलेले आहे या संबंधात, त्यालाही आता दीड दोन महिने उलटून गेलेले आहेत. तेव्हा आता सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी म्हटल्यानंतर याबाबतीत ८ दिवसात आपण निर्णय काढाल काय ?

**श्री. अमरिशभाई पटेल :** अध्यक्ष महाराज, हे वचन काही मी देऊ शकत नाही. कारण मी यापूर्वीही याबाबत एक महिन्याच्या आत काढतो असे सांगितले होते. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी थोडा धीर धरला पाहिजे ...

**श्री. बी.टी.देशमुख : मग आपण एक महिन्याच्या आत तरी निर्णय काढाल का ?**

**श्री. अमरिशभाई पटेल : अध्यक्ष महाराज, एक महिन्याच्या आत मंत्रिमंडळापुढे ठेवतो असे मी सांगितलेच आहे. ..**

**श्री. सुरेश भालेराव :** अध्यक्ष महाराज, मला आता आपल्यालाच विनंती करावयाची आहे की, याबाबत आपण काही सुस्पष्ट असे आदेश माननीय मंत्री महोदयांना द्यावेत. ती वेळ आता आलेली आहे. कारण शिक्षण क्षेत्रातील अनेक बाबतीत कोर्टात जाऊन निर्णय होतात आणि तरीही शिक्षण विभाग त्याबाबत काही कारवाई करीत नाही. खरे तर शिक्षण विभाग म्हणजे शासनाचाच एक भाग आहे आणि या ठिकाणी कोर्टामध्ये तर पार्टी गवर्नमेंटच असते. असे असताना कोर्टाचा निर्णय न मानता किंवा कोर्टाचा निर्णय झाल्यानंतरही त्यानुसार कारवाई न करणे म्हणजे कोर्टाचा अवमान करण्यासारखेच आहे. तेव्हा कोर्टाचा निकाल लागल्यानंतर असे कोठेही होता कामा नये, कोर्टाच्या निर्णयाची अंमलबजावणी झाली पाहिजे. सर्वच केसेसच्या बाबतीत अध्यक्ष महाराज, आपण असा निर्णय द्यावा. आता या विषयामध्ये वित्त विभागाचा तसा संबंधच काय आहे? तेव्हा याबाबतीत खात्याकडे न जाता आठ दिवसात आपण हा निर्णय जाहीर कराल काय ?

**श्री. बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, कोर्टाने निवाडा दिल्यानंतर जो खर्च आहे तो नॉन व्होटेबल एक्स्पेंडिचर आहे. हे या देशाच्या घटनेमध्येच दिलेले आहे. तेव्हा वाटल्यास आपण घटना वाचावी आणि आपल्या अधिकाऱ्यांना देखील वाचण्यास सांगावी. म्हणून माझे म्हणणे असे आहे की, ८ दिवसात याबाबतचा निर्णय आपण जाहीर कराल काय ? ... अध्यक्ष महाराज, ८ दिवसात निर्णय काढा असा आग्रह जरूर आमचा आहे, पण किमान एक महिन्याच्या आत तरी आपण हा निर्णय काढणार का ?

**श्री. अमरिशभाई पटेल : अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन एक महिन्याच्या आत निर्णय करतो. ...**

**श्री. बी.टी.देशमुख :** नुसते निर्णय करू नका, तर त्याप्रमाणे आदेश काढायला पाहिजे. तेव्हा तसे आदेश काढले जातील काय एक महिन्याच्या आत ?

**श्री. व्ही.यू.डायगव्हाणे :** अध्यक्ष महाराज, तीन तीन वेळा हा प्रश्न येथे चर्चेला आलेला आहे आणि त्या प्रत्येक वेळी असेच आश्वासन मंत्र्यांनी दिलेले होते.... तेव्हा निश्चित उत्तर पाहिजे ...

**सभापती : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, शेवटी कोर्टाने जो निर्णय दिलेला आहे तो शासनावर बंधनकारक आहे. तेव्हा ...**

**श्री. बी.टी.देशमुख : पण तसे ते मानत नाहीत ...**

**श्री. अमरिशभाई पटेल :** अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्यांना मी **आपल्यामार्फत सांगू इच्छितो की, उच्च न्यायालयाने निर्णय दिलेला आहे आणि त्याचा सन्मान आपल्याला करावाच लागतो.** परंतु अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्य माझे म्हणणेच ऐकून घ्यायला तयार नाहीत ...

**सभापती :** सन्माननीय सदस्यांनी हे लक्षात घ्यावे की, सन्माननीय मंत्री महोदय असे सांगत आहेत की, न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून एक महिन्यामध्ये कॅबिनेटपुढे जाऊन निर्णय करतो. ...

**श्री. अमरिशभाई पटेल :** अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्य माझे म्हणणेच ऐकून घ्यायला तयार नाहीत. मी त्यांना हेच सांगण्याचा प्रयत्न करीत आहे ...

**श्री. बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, ते प्रयत्न करतो असे म्हणत आहेत. तेव्हा आता आपण सांगितल्यानंतर तरी त्यांनी माननीय सभापतींनी सांगितल्याप्रमाणे कारवाई करू असे सांगितले पाहिजे, पण ते तसे सांगतच नाहीत.

**श्री. अमरिशभाई पटेल : सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे माझे म्हणणे ऐकून घ्यावे. ...**

**श्री. बी.टी.देशमुख : ते आम्ही दोन वर्षे ऐकतो आहोत ...**

**श्री.अमरिशभाई पटेल : अध्यक्ष महाराज, उच्च न्यायालयाने जो निर्णय दिलेला आहे .. तो अर्थातच कायदेशीर आहे. तेव्हा त्याबाबतीत प्रश्नच काही उद्भवत नाही. याबाबत वित्त विभागाने सांगितले आहे ...**

**श्री. बी.टी.देशमुख : मग त्यांना आपण घटना दाखवावी...**

**श्री. अमरिशभाई पटेल :** घटनेची त्यांनाही माहिती आहे म्हणून ...

**श्री. बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, माननीय मंत्री महोदय मागील **कथाच पुन्हा पुन्हा येथे सांगत आहेत. मूळ मुद्याचे मात्र काहीच बोलत नाहीत.** ...

**श्री. अमरिशभाई पटेल : अध्यक्ष महाराज, मी माननीय बी.टी.देशमुख यांना सांगू इच्छितो की, भाऊ, मी आपला आदर करतो, इज्जत करतो. मी आपणास सांगतो की, या देशाची घटना जी आहे तिचा सन्मान आपण करायलाच पाहिजे आणि तो आम्ही करतोच आहोत. आता याबाबतीत कॅबिनेटमध्ये निर्णय होणारच आहे आणि कॅबिनेट काही उच्च न्यायालयाच्या निर्णयाचा सन्मान करणार नाही असे होणार नाही. तेव्हा माझे म्हणणे असे आहे की, एक महिन्यामध्ये कॅबिनेटपुढे जाऊन त्याचा निर्णय करणार आहोत. ...**

**श्री. बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, पुन्हा तेच ते सांगत आहेत ...

**श्री.व्ही.यू.डायगव्हाणे :** अध्यक्ष महाराज, डिसेंबर २००३ पासून कॅबिनेटची बैठक झालेलीच नाही काय ? ......

( गोंधळ )

**सभापती :** कॅबिनेटसमोर ही बाब नेऊन एक महिन्याच्या आत निर्णय करु, असे उत्तर मा.मंत्रिमहोदयांनी दिलेले आहे.

( गोंधळ )

**श्री. बी. टी. देशमुख :** सभापती महोदय, निर्णय करणे आणि आदेश काढणे यामध्ये फरक आहे.

( गोंधळ )

**सभापती :** मी म्हणतो तसेच उत्तर द्या असे मी मा. मंत्रिमहोदयांना सांगत नाही. माननीय मंत्रिमहोदयांच्या मनात जसे उत्तर द्यावयाचे असेल तसे त्यांनी द्यावे. **मा. न्यायालयाने या संदर्भात जो निर्णय दिलेला आहे, तो निर्णय कॅबिनेटसमोर नेऊन एक महिन्याच्या आत त्यासंबंधी निर्णय करु, असे उत्तर माननीय मंत्रिमहोदयांना द्यावयाचे आहे काय ?**

**श्री. अमरिशभाई पटेल : मा. सभापती महोदय, आपण जी सजेशन दिली आहे, ती मला मान्य आहे.**

******

## (१४)
## वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी विना अनुदानित शाळांतील सेवाकाळ ग्राह्य धरण्याबाबत

*महाराष्ट्र विधानपरिषद : : पहिले अधिवेशन, २००५*
*गुरुवार, दिनांक १७ मार्च, २००५*

(९) * १७६१ **श्री. रामनाथ मोते , श्रीमती संजीवनी रायकर, डॉ. अशोक मोडक, श्री. जी. एल. अैनापूरे, श्री. व्हि. यू. डायगव्हाणे, प्रा. बी. टी. देशमुख, श्री. वसंतराव खोटरे, श्री. नानासाहेब बोरस्ते, प्रा. शरद पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ४१७५३ ला दिनांक २ जून, २००४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरिष्ठ श्रेणी व निवडश्रेणीसाठी विना अनुदानित शाळेतील सेवाकाळ अनुज्ञेय न धरण्याची कृति ही नियमबाह्य आहे असा जो धोरणात्मक निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिनांक १४ सप्टेंबर २००० रोजी एका याचिकेमध्ये (सन २००० ची याचिका क्रमांक ४३४६) दिला त्याची धोरणात्मक अंमलबजावणी करण्याबाबत कॅबिनेट समोर नेऊन एक महिन्याच्या आत त्यासंबंधी निर्णय करु याबाबतच्या प्रश्नाची सद्य:स्थिती काय आहे,

(२) निर्णय झाला असल्यास, केव्हा? व आदेशाचे स्वरुप काय आहे,

(३) अद्याप निर्णय झाला नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.वसंत पुरके :** (१), (२) व (३) याबाबतचा प्रस्ताव अद्यापही शासनाच्या विचाराधीन आहे.

******

(१७)

# वरिष्ठ श्रेणी व निवडश्रेणीसाठी विनाअनुदानित शाळेतील सेवाकाळ अनुज्ञेय न धरण्याची कृति ही नियमबाह्य असणे

*महाराष्ट्र विधानपरिषद : शुक्रवार, दिनांक १५ एप्रिल, २००५ : पहिले अधिवेशन, २००५*

वरिष्ठ श्रेणी व निवडश्रेणीसाठी विनाअनुदानित शाळेतील सेवाकाळ अनुज्ञेय न धरण्याची कृति ही नियमबाह्य असणे याबाबत माननीय सदस्य श्री **व्ही. यू. डायगव्हाणे, प्रा. बी. टी. देशमुख, सर्वश्री वसंतराव खोटरे, गजेन्द्र ऐनापुरे यांनी दिलेली नियम ९३ अन्वये सूचना.**

**प्रा. वसंत पुरके ( शालेय शिक्षण मंत्री ) :** अध्यक्ष महोदय, श्री व्ही. यू. डायगव्हाणे, प्रा. बी. टी. देशमुख, सर्वश्री वसंतराव खोटरे,गजेन्द्र ऐनापुरे यांनी वरिष्ठ श्रेणी व निवडश्रेणीसाठी विनाअनुदानित शाळेतील सेवाकाळ अनुज्ञेय न धरण्याची कृति ही नियमबाह्य असणे या विषयावर नियम ९३ अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण आदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**प्रा.वसंत पुरके, शालेय शिक्षण क्रीडा व युवककल्याण मंत्री यांचे निवेदन**

शासन निर्णय, दिनांक १५ जानेवारी, १९९० अन्वये वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी पात्रतेच्या अटी विहित केलेल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने ज्या शिक्षकांची विविध मान्यताप्राप्त शाळांत एकाच वेतनश्रेणीत सलग १२ वर्षे सेवा झालेली आहे असे शिक्षक वरिष्ठ वेतनश्रेणीस पात्र आहेत. मात्र ज्या शिक्षकांची विनाअनुदानित शाळेत सेवा झालेली आहे, ती सेवा वरिष्ठश्रेणीसाठी ग्राह्य धरण्यात आलेली नाही. या अनुषंगाने सुरुवातीस वित्त विभागाकडे प्रस्ताव सादर करताना सरसकट सर्वांनाच म्हणजेच अनुदानित व विनाअनुदानित शाळांत कार्यरत असलेल्या शिक्षकांना वरिष्ठश्रेणी लागू करण्याचे प्रस्तावित करण्यात आले होते. तथापि, वित्त विभागाने या प्रस्तावास मान्यता दिली नाही. दरम्यानच्या काळात मुंबई उच्च न्यायालयात याचिका क्र.४३४६/२००० दाखल करण्यात आली. सदर याचिकेमध्ये मा.उच्च न्यायालयाने निर्णय देताना ज्या शिक्षकांची विविध शाळांत सलग १२ वर्षाची अखंड सेवा झालेली आहे अशा शिक्षकांची विनाअनुदानित शाळांतील सेवा वरिष्ठश्रेणी देण्यात पात्र ठरविली. **मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे याचिकाकर्त्यापुरता हा निर्णय मान्य करणे आवश्यक आहे.** मात्र अशाच प्रकारच्या इतर शिक्षकांबाबत धोरणात्मक निर्णय शालेय शिक्षण विभागाने घ्यावा असे वित्त विभागाने या प्रकरणी सुचविले होते.

२. राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित शाळेतील कर्मचाऱ्यांची सेवा निवृत्तीवेतनासाठी ग्राह्य धरली जाते. त्यामुळे विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांची सेवा वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी ग्राह्य धरली जावी अशी मागणी शिक्षक संघटना व लोकप्रतिनिधींकडून वारंवार करण्यात येत आहे. तसेच याबाबत विधानमंडळात सतत तारांकित प्रश्न व लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात येत आहेत. **या प्रकरणी सन २००३ च्या पावसाळी अधिवेशनात नियम ९३ अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या सूचनेवर मा.राज्यमंत्री, शालेय शिक्षण यांनी याबाबतचा शासन आदेश एक महिन्यात निर्गमित करण्यात येईल असे आश्वासन दिले आहे.**

३. वरील बाबींच्या अनुषंगाने राज्यातील माध्यमिक/उच्चमाध्यमिक शाळांतील शिक्षक कर्मचाऱ्यांची विनाअनुदानित शाळेतील सेवा वरिष्ठश्रेणीसाठी ग्राह्य धरण्याबाबत व त्यासाठी येणाऱ्या आर्थिक भारासाठी रु.४.६० कोटीचा प्रस्ताव वित्त विभागाकडे वारंवार पाठविण्यात आला होता. सदर प्रस्तावासंदर्भात वित्त विभागाने वेळोवेळी उपस्थित केलेल्या मुद्यांबाबतच्या अभिप्रायाची पूर्तता करून या विभागाने याबाबतच्या प्रस्तावाचा सतत पाठपुरावा वित्त विभागाकडे केला. अंततः वित्त विभागाने प्रस्तुत प्रस्तावास मंत्रिमंडळाची मान्यता घेण्यात यावी असे सूचित केले आहे. त्यानुसार याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

**श्री. व्ही. यू. डायगव्हाणे :** सभापती महोदय, हा विषय या सदनात चार ते पाच वेळा आला आहे. मा. उच्च न्यायालयाने निर्णय देताना ज्या शिक्षकांची विविध शाळांत सलग १२ वर्षाची अखंड सेवा झालेली आहे, अशा शिक्षकांची विनाअनुदानित शाळांतील सेवा वरिष्ठश्रेणी देण्यास पात्र ठरविली. या बाबत धोरणात्मक निर्णय शालेय शिक्षण विभागाने घ्यावा असे वित्त विभागाने सूचविले आहे. दि. २ जून २००४ रोजी माननीय मंत्रिमहोदयांनी असे सांगितले होते की, याबाबतचा निर्णय एक महिन्यात घेतो. परंतु याबाबतचा निर्णय झालेला नाही. आता पुन्हा माननीय मंत्रिमहोदय असे सांगत आहे की, या बाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. तेव्हा उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार विनाअनुदानित शाळांतील सेवा वरिष्ठ आणि निवड श्रेणीसाठी पात्र ठरविण्याबाबतचा निर्णय एक महिन्यात केला जाईल काय ?

**प्रा. वसंत पुरके :** सभापती महोदय, या बाबत दोनतीन वेळा आश्वासन दिले आहे, हे मला मान्य आहे. **परंतु आता हा शब्द असेल,** याची ग्वाही मी देतो.

**श्री. बी. टी. देशमुख :** सभापती महोदय, ही दुर्देवाची गोष्ट आहे. हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतरही याबाबतचा निर्णय घेण्यास शासनाला बराच वेळ लागत आहे. "हायकोर्टाने याबाबत धोरणात्मक निर्णय दिला आहे काय?" असा प्रश्न आम्ही विचारला असता माननीय मंत्रिमहोदयांनी 'होय' असे म्हटले होते. हायकोर्टाने दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यास तीन वर्षाचा कालावधी गेला आहे. हे बरोबर नाही. माननीय मंत्रिमहोदयांनी आश्वासन न देता एकदा नाही म्हणून टाकावे. तसे केले तर आम्ही या लोकांची बैठक घेऊन त्यांना सांगू की "आपण कोर्टात जा." माझा या ठिकाणी पॉईन्टेड प्रश्न आहे. हायकोर्टाने शासनाने काढलेला जी.आर. बरोबर आहे म्हटले आहे. त्याप्रमाणे ही सेवा धरण्यात आली आहे. म्हणून या बाबतचा आदेश शासन आठ दिवसात निर्गमित करील काय ?

**प्रा. वसंत पुरके :** सभापती महोदय, **माननीय न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार कार्यवाही केली जाईल. या बाबतचा निर्णय एक महिन्यात हमखास घेऊ.**

**श्री. व्ही. यू. डायगव्हाणे :** यापूर्वी असे आश्वासन दिले होते. परंतु त्याची पूर्तता झाली नाही. आता पुन्हा तसेच आश्वासन दिले जात आहे. तेव्हा निश्चितपणे एक महिन्यात या बाबतचा निर्णय घेतला जाईल काय ?

**प्रा. वसंत पुरके :** सभापती महोदय, **पूर्वीचे आश्वासन होते. आताचा हा माझा शब्द आहे. एक महिन्यात या बाबतची कार्यवाही पूर्ण करु.**

**श्री. बी. टी. देशमुख :** एक महिन्यात याबाबतचा निर्णय निर्गमित केला जाईल काय ?

**प्रा. वसंत पुरके :** सभापती महोदय, या संदर्भात मंत्रिमंडळाची मान्यता घेणे क्रमप्राप्त आहे. अहवाल पूर्णपणे सादर केला आहे, तो विषय कॅबिनेटमध्ये येईल.

**प्रा. बी. टी. देशमुख :** कॅबिनेटमध्ये निर्णय कसा होईल? माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळाले नाही तर आम्ही आपला निषेध करुन बाहेर जाऊ....

**सभापती :** मंत्रिमहोदयांनी एक महिन्याच्या आत निर्णय घेतो असे सांगितले आहे...

**प्रा. बी. टी. देशमुख :** सभापती महोदय, या संबंधी पॉझिटीव्ह निर्णय घेतला जाईल काय? असा माझा प्रश्न आहे.

**प्रा. वसंत पुरके :** सभापती महोदय, १०० टक्के प्रक्रिया पूर्ण केली आहे. फक्त कॅबिनेटची मान्यता मिळणे क्रमप्राप्त आहे. ती मान्यता मिळाल्यानंतर निर्णय घेऊ.

**प्रा. बी. टी. देशमुख :** सभापती महोदय, या बाबतीत सभागृहामध्ये वेळ कमी आहे याचा गैरफायदा मंत्रिमहोदयांनी घेता कामा नये. आणि माझी आपणाला विनंती आहे की, आपण तो घेऊ देऊ नये. जो धोरणात्मक निर्णय आहे त्याबाबतच्या हायकोर्टाच्या निर्णयाची प्रत माझ्याजवळ आहे. दुसरी गोष्ट अशी की, आपण वित्त विभागाचे कौतुक काय करता? हायकोर्टाच्या निर्णयामध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, तुमचा शासन निर्णय बरोबर आहे. त्याची तुम्ही अंमलबजावणी करा. तरी पण आपले कौतुक आणि आरत्या चालू आहेत, आपण या ठिकाणी गोलगोल उत्तर देऊ नका.

**प्रा. वसंत पुरके :** सभापती महोदय, मी कोणतीही दिशाभूल केली नाही. **१०० टक्के कारवाई केली जाईल अशाप्रकारची ग्वाही देतो.**

**प्रा. बी. टी. देशमुख :** एक महिन्यामध्ये आपला पॉझिटीव्ह निर्णय घोषित होईल काय? आपण जर या बाबतीत सभागृहाची दिशाभूल करणार असाल तर आम्ही आपला निषेध करतो...

**सभापती :** माननीय सदस्यांनी प्रथम खाली बसावे. मंत्रिमहोदय, हायकोर्टाने जो निर्णय घेतला आहे त्याला आपण उत्तर द्यावे असे मी सांगणे बरोबर नाही.परंतु हायकोर्टाच्या निर्णयाच्या बाबतीत वित्तीय मंजूरी घेणे किंवा मंत्रिमंडळाची मंजूरी घेणे या बाबी पूर्ण करुन एक महिन्याच्या आत पॉझिटीव्ह निर्णय आपण घेणार काय? असा माननीय सदस्यांचा प्रश्न आहे.

**प्रा. वसंत पुरके :** सभापती महोदय, **न्यायालयाचा आदर राखून एक महिन्याच्या आत निर्णय घेतला जाईल.**

**श्री.नितीन गडकरी :** सभापती महोदय, माझी एकच विनंती आहे की, . . . .

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी साहेब, जे सांगत आहेत, ती काही वस्तुस्थिती नाही. **हायकोर्टाने समजा एकदा निर्णय दिला तर त्या निर्णयाच्या अगेन्स्ट जोपर्यंत अपिलामध्ये जाण्याची सोय उपलब्ध आहे.**

**श्री.नितीन गडकरी(खाली बसून) :** तुम्हाला स्टे मिळाला आहे का ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** सभापती महोदय, माझे ऐकून घ्यावे. आता तुम्ही ऐकून घ्यावे. **जोपर्यंत अपिलामध्ये जाण्याची सुविधा उपलब्ध आहे, तोपर्यंत हायकोर्टाने दिलेला एखादा निर्णय हा राज्य सरकारवर बंधनकारक आहे असे मानता येणार नाही.** राज्य सरकार ही लॉ मेकींग बॉडी आहे. राज्य सरकार निर्णय घेणारी बॉडी आहे. प्रोसीजरमध्ये लागणारा वेळ, राज्य सरकारला निर्णय घेण्यासाठी कॅबिनेटसमोर जावे लागेल, आर्थिक तरतुदींसाठी वित्त विभागाकडे जावेच लागेल आणि त्यामध्ये सुध्दा समजा हायकोर्टाने एखादा निर्णय दिला आणि सरकारला तो मान्य करावयाचा नसला तर ॲक्टमध्ये सुध्दा किंवा रुल्समध्ये सुध्दा बदल करण्याचा अधिकार जोपर्यंत सरकारकडे आहे,तोपर्यंत हायकोर्टाने दिलेला प्रत्येक निर्णय हा जरी कायदा म्हणून राज्य सरकारने स्विकारणे अभिप्रेत असले किंवा बंधनकारक असले तरी सुध्दा या संदर्भात राज्य सरकारला विचार-विनिमय करण्यासाठी मंत्रिमंडळासमोर जाऊच नये असे म्हणणे चुकीचे आहे.

**श्री.दिवाकर रावते :** सभापती महोदय, सन्माननीय मंत्री श्री.दिलीप वळसे-पाटील यांनी जे निवेदन केले. . . .

**श्री.दिलीप वळसे-पाटील(खाली बसून) :** निवेदन नाही, पॉईंट ऑफ प्रोसीजर.

**श्री. दिवाकर रावते :** सभापती महोदय, त्यांनी जे सांगितले ते अयोग्य आहे असे मी म्हणणार नाही.परंतु सोयीनुसार एखादी गोष्ट करण्याची राज्य शासनाची जी प्रवृत्ती आहे, त्यासंदर्भात मी उभा आहे. आपण बरोबर म्हणालात की, कोर्टाने सरकार चालवू नये या मताचा मी आहे. बंधनकारक असलेच पाहिजे तर आपण अपिलामध्ये जाऊ शकतो हे बरोबर आहे. त्याकरता आपण अपिलामध्ये जावयाचे की ते मानावयाचे याकरता मंत्रिमंडळासमोर जाण्याची तुम्हाला मुभा आहे याबद्दलही दुमत नाही. पण हाच प्रश्न जेव्हा हेल्मेटच्या प्रकरणात आला तर हेल्मेटच्या बाबतीत हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतर, केंद्राच्या कायद्यात असे म्हटलेले आहे की, कायदा लागू करा, पण हा कसा लागू करावयाचा याचा पूर्ण अधिकार सरकारचा आहे. म्हणून त्यावेळेला युती शासनाने महानगरामध्ये हेल्मेट वापरु नये, इतर ठिकाणी हेल्मेटच्या कायद्याचा वापर करावा अशा प्रकारे त्या कायद्याचे इंटरपिटेशन करुन तो कायदा येथे लावला. पुन्हा हायकोर्टाने जेव्हा आपल्याला तंबी देण्याचा प्रयत्न केला आणि घटनेच्या कलम १२९ नुसार सरकारचा जो अधिकार आहे, त्यावर गदा आणण्याचा प्रयत्न केला तर यासंदर्भात हा अधिकार सरकारचा आहे, कोर्ट आपल्याला या अधिकारापासून वंचित करु शकत नाही आणि आमच्यावर जबरदस्तीने अमुक ठिकाणी कराच म्हणजे गल्लीबोळामध्ये हेल्मेट घालून लोकांना फिरावसयास लावा हा सरकारने घेतलेला लोकांच्या हिताचा निर्णय आहे म्हणून मग तुम्ही त्यासंदर्भात सुप्रीम कोर्टामध्ये अपील का केले नाही? म्हणून सोयीप्रमाणे अपिलाची भाषा करणे, शिक्षकांच्या बाबतीत आपण अपिलाने हा अडथळा . . . .मला ते म्हणावयाचे नाही. पण हेल्मेटच्या बाबतीतही सरकारने अशा प्रकारे का निर्णय घेतला नाही आणि सुप्रीम कोर्टामध्ये अपिल का केले नाही आणि हा आमचा अधिकार आहे आणि त्यावर गदा येत आहे असे का सांगितले नाही. हा येथे विषय आहे.

**श्री.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय . . . .

**श्री.छगन भुजबळ :** सभापती महोदय,माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**श्री.बी.टी.देशमुख :** नाही. मला बोलण्यासाठी परवानगी दिलेली आहे.

# राजीव गांधी महाविद्यालय सडक अर्जूनी या महाविद्यालयातील शिक्षकांनी सुरु केलेले उपोषण आंदोलन

*महाराष्ट्र विधानपरिषद : : तिसरे अधिवेशन, २००६*
*शुक्रवार, दिनांक १५ डिसेंबर, २००६*
*रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या लक्षवेधी सूचनेवरील निवेदन*

**प्रा. बी.टी.देशमुख, श्री. व्हि. यु. डायगव्हाणे, श्री. वसंतराव खोटरे वि.प.स.** यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अनुसार दिलेली सूचना (लक्षवेधी सूचना) पुढीलप्रमाणे आहे. :-

"राजीव गांधी महाविद्यालय सडक अर्जूनी या महाविद्यालयातील शिक्षकांनी दिनांक ११ नोव्हेंबर, २००६ रोजी व २५ नोव्हेंबर, २००६ रोजी शासनाकडे (मा. उच्च शिक्षणमंत्री, शिक्षण संचालक पुणे) व मा. कुलगुरू राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांना निवेदने पाठवून ४ डिसेंबर, २००६ पासून विधानभवनासमोर आमरण उपोषणाला बसण्याचा निर्णय कळविणे, त्याअगोदर सुद्धा शासनाकडे अनेकदा तक्रार निवेदने सादर करणे, वेतन खात्यातील रक्कम व्यवस्थापकांनी अन्यत्र वळविणे, यासारखे अनेक गैरकारभार व्यवस्थापकांकडून होत असल्याने प्रशासक नेमण्याची केलेली मागणी, विद्यापीठाने याबाबतीत गांभीर्याने दखल घेऊन नुकतीच एक समिती नेमली असली तरी गंभीर स्वरुपाच्या अनेक आरोपाबाबत शासनस्तरावरुन चौकशी समिती लावून प्रशासक नेमण्याबाबत शासनाकडून होत असलेले दुर्लक्ष व त्यामुळे त्या कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया"

**मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे निवेदन**

वैनगंगा, बहुउद्देशीय विकास संस्था, नागपूर द्वारा संचालित राजीव गांधी महाविद्यालय, सडक अर्जूनी सन १९९३-९४ पासून सुरू झाले आहे. या महाविद्यालयातील ५ अधिव्याख्यात्यांनी शिक्षण संचालक, उच्च शिक्षण यांना दिनांक ११.१२.२००६ व दि. २५.११.२००६ रोजी त्यांच्या मागण्याबाबत निवेदन दिले आहे व त्या निवेदनाच्या प्रती मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण, मा. कुलगुरू, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ, नागपूर व अन्य यांना दिल्या आहेत. त्यांनी सदर निवेदनात दिनांक ४.१२.२००६ पासून विधानभवन परिसर, नागपूर येथे आमरण उपोषण सुरू करीत आहोत असे म्हटले आहे.

वैनगंगा बहुउद्देशीय विकास संस्था, नागपूर या महाविद्यालयाचे व्यवस्थापन व शिक्षक यांच्या परस्पर विरोधात तक्रारी आहेत. दिनांक ७ मार्च २००३ रोजी सर्व शिक्षकांनी व्यवस्थापनाचे विरुद्ध आर्थिक गैरव्यवहार व मानसिक त्रास देण्याविषयाबाबत तक्रार विद्यापीठाला केली होती. विद्यापीठाने याबाबत व्यवस्थापनाकडून मागविलेल्या खुलाशात शिक्षकांनी केलेल्या तक्रारी बाबत आरोप फोटाळले आहेत. सदर महाविद्यालयात पाच शिक्षक कार्यरत असून सद्यस्थितीत महाविद्यालयांमध्ये प्राचार्याचे पद रिक्त असल्यामुळे व या शिक्षकांपैकी कार्यकारी प्राचार्यांची जबाबदारी घेण्यास कोणीही तयार नसल्यामुळे शिक्षकांच्या वेतनाचा प्रश्न निर्माण झाला आहे. वैनगंगा बहुउद्देशीय विकास संस्था, **नागपूर या संस्थेच्या व्यवस्थापनाने दिनांक ७.१२.२००६ रोजी कार्यकारी प्राचार्य नेमण्याचे पत्र दिले असून विद्यापीठामार्फत महाविद्यालयाचे थकीत माहे सप्टेंबर, ऑक्टोबर व नोव्हेंबर, २००६ चे वेतनही मंजूर करण्यात आले.**

वैनगंगा बहुउद्देशीय विकास संस्था, नागपूर संचालित राजीव गांधी महाविद्यालय, सडक अर्जूनी, जिल्हा गोंदिया या महाविद्यालयातील शिक्षकांच्या वारंवार प्राप्त होणाऱ्या तक्रारी तसेच सर्व शिक्षकांनी महाविद्यालयावर प्रशासक नियुक्त करण्याबाबत विद्यापीठाकडे केलेल्या तक्रारीची दखल घेऊन विद्यापीठाने सत्यशोधन समिती गठीत केली असून सदर समिती उपरोक्त प्रकरणी प्रत्यक्ष चौकशी करणार असल्याने विद्यापीठाने या महाविद्यालयातील अधिव्याख्यात्यांनी नियोजित सामुहिक आमरण उपोषणाचा निर्णय मागे घेण्याची विनंती केली आहे. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य पुणे व सहसंचालक उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर यांनी उपोषणास बसलेल्या अधिव्याख्यात्यांची भेट घेऊन विद्यापीठाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर उचित कार्यवाही करण्यात येईल असे त्यांना सांगितले आहे.

वरील वस्तुस्थिती लक्षात घेता सद्यःस्थितीत महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ चे कलम ५(४६) च्या तरतुदीनुसार विद्यापीठाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (व्यवस्थापन) अधिनियम, १९७६ च्या तरतुदीनुसार शासनाकडून आवश्यक उपाययोजना करण्यात येईल.

******

**श्री.छगन भुजबळ :** सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**श्री.नितीन गडकरी :** सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांच्या उभे राहण्यावर माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**श्री.छगन भुजबळ :** सभापती महोदय, मला हरकतीचा मुद्दा येथे कोणत्याही क्षणी उपस्थित करता येतो.

**श्री.नितीन गडकरी :** सभापती महोदय, एका हरकतीच्या मुद्याचा निर्णय होईपर्यंत दुसरा कोणताही हरकतीचा मुद्दा मांडता येत नाही. सबब माननीय श्री. भुजबळसाहेबांना उभे राहून दुसरा कोणताही हरकतीचा मुद्दा मांडण्याचा अधिकार नाही.

**श्री.छगन भुजबळ :** सभापती महोदय, त्यांचा हरकतीचा मुद्दा नव्हता.

**सभापती :** मी आपल्यालाही परवानगी दिली होती.आता हरकतीच्या मुद्याद्वारे त्यांचेही म्हणणे मी ऐकतो.

**श्री.नितीन गडकरी :** सभापती महोदय, त्यांना माझ्या हरकतीच्या मुद्याबाबत बोलण्याचा अधिकार आहे. पण त्यांना दुसरा हरकतीचा मुद्दा काढता येत नाही. हे सभागृह नियमाने चालले पाहिजे. त्यांना माझ्या हरकतीच्या मुद्यावर बोलण्याचा अधिकार आहे.

**श्री.छगन भुजबळ :** तुमच्या हरकतीच्या मुद्यावर माननीय सभापतींनी निर्णय राखून ठेवलेला आहे. त्यामुळे तो हरकतीचा मुद्दा संपला. आता माझा नवीन हरकतीचा मुद्दा आहे.

**श्री.नितीन गडकरी :**सभापती महोदय, यांच्या नवीन हरकतीच्या मुद्यावर माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**श्री.छगन भुजबळ :** सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा ऐकल्याशिवाय ते कसा हरकतीचा मुद्दा मांडणार.

**श्री.नितीन गडकरी :** सभापती महोदय, माझा यांच्या बोलण्यावर आणि उभे राहण्यावर हरकतीचा मुद्दा आहे.

**सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी, आपण खाली बसा. प्लीज खाली बसा.

**श्री.नितीन गडकरी :** सभापती महोदय, मला अधिकार आहे. आपण मला संधी दिली पाहिजे. यांनी माझ्या हरकतीच्या मुद्यावर . . . .

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात)

**श्री.छगन भुजबळ :** सभापती महोदय. . . . . .

**सभापती :** प्लीज, सीट डाऊन.

**श्री.छगन भुजबळ :** या प्रश्नावर कायदेशीर सल्ला घेऊन मी निर्णय देतो असे आपण सांगितलेले आहे.

**सभापती :** सन्माननीय मंत्री श्री.भुजबळ साहेब आपण कृपया खाली बसा. मला असे वाटते की, या निवेदनावर आपण किती चर्चा करावी, याला देखील मर्यादा आहेत.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी उभे राहून बोलत असतात.)..

...(अडथळा)...

**सभापती :** मला असे वाटते की,...

**श्री.नितीन गडकरी :** आपण आम्हाला न्याय देणार नसाल तर आम्ही सभात्याग करून बाहेर निघून जाऊ.

...(अडथळा)...

**सभापती :** मला असे वाटते की, या निवेदनाच्या अनुषंगाने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री महोदयांनी....

**प्रा.बी.टी. देशमुख :** मला आपण बोलण्याची परवानगी दिली होती. परंतु सन्माननीय मंत्री श्री.भुजबळ साहेब बोलले...

**सभापती :** कृपया आपण शांतता राखावी. माझे बोलून पूर्ण होऊ द्यावे. सन्माननीय मंत्री श्री.भुजबळ साहेबांना मी बोलण्याची परवानगी दिली नाही, त्यांना मी थांबविलेले आहे.

**प्रा.बी.टी.देशमुख :** शालेय शिक्षण मंत्री महोदयांच्याबाबत आमचे काही म्हणणे नाही, आपण जो निर्णय दिला त्याबद्दलही आमचे काही म्हणणे नाही. आपण निर्णय दिल्यानंतर सन्माननीय श्री.दिलीप वळसे-पाटील साहेबांनी निवेदन केले. त्यांनी त्यामध्ये तीन मुद्दे मांडलेले आहेत, ते चुकीचे आहेत. ती चुकीची माहिती रेकॉर्डवर राहील, त्याबाबत मला माहिती द्यावयाची आहे.

**सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख साहेब, मला असे वाटते की, निवेदनाच्या अनुषंगाने...

**प्रा.बी.टी.देशमुख :** आता सगळे संपलेले आहे. वैधानिक मत दिलेले आहे....

**सभापती :** मी आपल्या हरकतीला उत्तर दिलेले आहे, मी ते रुलिंग राखून ठेवलेले आहे. आता यानंतर ९३ चे पुढील निवेदन चर्चेला घेण्यात येईल.

**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, सन्माननीय मंत्री श्री.दिलीप वळसे-पाटील यांनी निवेदन केलेले आहे त्या संदर्भात मला बोलण्यासाठी आपण परवानगी दिली होती.

**श्री.नितीन गडकरी :** आपण दिलेल्या निर्णयाचा निषेध करतो आणि सभात्याग करतो.

(सन्माननीय सदस्य नितीन गडकरी आणि इतर सन्माननीय सदस्य सभात्याग करतात.)

...(अडथळा)....

**प्रा. बी. टी. देशमुख :**सभापती महोदय, आपण मला परवानगी दिल्या नंतर..

**श्री. नितीन गडकरी :** सभापती महोदय, सभागृह नियमाप्रमाणे चालले पाहिजे...

**प्रा. बी. टी. देशमुख :**सभापती महोदय, आपण मला बोलण्यासाठी परवानगी दिली. त्यानंतर श्री. छगन भुजबळ हे उभे राहिले म्हणून आपण माझी परवानगी काढून घेतली... मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी तीन मुद्दे चुकीचे सांगितलेले आहेत.

( काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात )

**सभापती :**प्रा. बी. टी. देशमुख साहेब, मी मंत्रिमहोदय, श्री. छगन भुजबळ साहेबांना बसावयास सांगितले, त्याप्रमाणे ते खाली बसले. ते बसले नसते तर तो भाग वेगळा होता. मी तुम्हाला आठ-नऊ वेळा प्रश्न विचारण्याची संधी दिल्या नंतर सुध्दा तुमचे समाधान होत नसेल तर I am very sorry.

**श्री. पांडुरंग फुंडकर :** सभापती महोदय, माननीय श्री. नितीन गडकरी यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्याबाबतीत मी कायदेशीर सल्ला घेतो असे म्हटल्यानंतरही आपण सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. दिलीप वळसे-पाटील यांना बोलायला परवानगी दिली. त्यानंतर प्रा. बी.टीं.च्या बाबतीत ते झाले नाही. असे होत असेल तर आम्ही कामकाजात भाग घ्यावयाचा की नाही?हा प्रश्न आहे. यावर निर्णय झाला पाहिजे. जोपर्यंत ही दुरुस्ती करण्यात येत नाही तापर्यंत आम्हाला सभागृहाच्या कामकाजात भाग घेता येणार नाही आणि म्हणून पुन्हा एकदा आम्ही या विषयावर सभात्याग करीत आहोत.

(विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य सभागृहा बाहेर जातात)

**श्री. छगन भुजबळ :** सभापती महोदय, या सगळ्या प्रकरणावर विरोधी पक्ष नेत्यांनी आपले मत मांडले. माझे म्हणणे असे आहे की, या बाबतीत सन्माननीय श्री. नितीन गडकरी यांनी पॉईंट ऑफ ऑर्डर काढला. त्यावर आपण आपला निर्णय राखून ठेवला.त्यामुळे तो पॉईंट ऑफ ऑर्डर डिस्पोजऑफ झालेला आहे. त्यानंतर श्री. दिलीप वळसे-पाटील यांनी आपले म्हणणे मांडल्यानंतर तिकडच्या सन्माननीय सदस्यांनी सुध्दा आपले म्हणणे मांडलेले आहे. ही सगळी चर्चा सुरु असतांना मी नवीन पॉईंट ऑफ ऑर्डर काढू इच्छित होतो. तो नवीन पॉईंट ऑफ ऑर्डर काढण्याची परवानगी मी मागितली. तो माझा अधिकार आहे.एक पॉईंट ऑफ ऑर्डर डिस्पोजऑफ झाल्यानंतर

**सभापती :** नियम ९३ अन्वये असलेल्या तेराव्या निवेदनावर आपण आलो होतो. यानंतर चौदावे निवेदन सन्माननीय सदस्य श्री. कन्हैयालाल गिडवाणी, डॉ. दीपक सावंत, सर्वश्री अरविंद सावंत, अनंत तरे, विलास अवचट व अनिल परब यांनी नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेच्या संदर्भातील आहे. सभागृहाची बैठक १५ मिनिटांकरिता स्थगित करु या.

**प्रा. जोगेंद्र कवाडे :** सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**सभापती :** आपला हरकतीचा मुद्दा नंतर मांडावा. आता मी सभागृहाची बैठक १५ मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक १२.४५ ते १.०० वाजेपर्यन्त स्थगित झाली )

**श्री.विलास अवचट :** सभापती महोदय, आमचा बहिष्कार आहे.

**उप सभापती :** बहिष्कार असेल तर आपण सभागृहामध्ये कसे काय?

**श्री.विलास अवचट :** सभापती महोदय, निर्णय येईपर्यंत आपण १५ मिनिटांकरिता सभागृहाची बैठक तहकूब करावी.

**डॉ.दीपक सावंत :** सभापती महोदय, १५ मिनिटांकरिता सभागृहाची बैठक स्थगित करावी.

**उप सभापती :** ठीक आहे, मी मा.सदस्यांच्या विनंतीला मान देतो, परंतु सभागृहाचे पुढील कामकाज करण्याकरिता मा.सदस्यांनी मला सहकार्य करावे. सभागृहाची बैठक मी १५ मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी १.०१ ते १.१५ पर्यंत स्थगित झाली.)

**मा.सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यांनी उपस्थित केलेल्या मुद्यासंबंधी**

**सभापती :** मा.सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी जे काही मुद्दे या ठिकाणी प्रश्नाच्या माध्यमातून उपस्थित केलेले आहेत त्यानुषंगाने मी एवढेच सांगेन की, **२००० सालामध्ये उच्च न्यायालयाने जो निर्णय दिला त्यावर त्यानंतरच्या काळात अपील झालेले नाही. त्यामुळे अपिलाची मुदत संपलेली आहे. हायकोर्टाने जो निर्णय दिलेला आहे तो धोरणात्मक पध्दतीने शासनाने जो जी.आर.काढलेला आहे त्यानुषंगाने आणि त्याची जी अंमलबजावणी आहे** त्याबाबतीत माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांनी एक महिन्याच्या आत तो निर्णय राबविण्याच्यादृष्टीने या ठिकाणी सभागृहाला आश्वासन दिलेले आहे. मा.सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी जो हरकतीचा मुद्दा उपस्थित केला होता त्यासंदर्भातील उत्तर मी राखून ठेवलेले आहे. त्यानंतरचे या सभागृहातील कामकाज काढून टाकण्यात येईल. आता मी पुढील कामकाजाकडे वळतो.

******

(१६)

# वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी विना अनुदानित शाळांतील सेवाकाळ ग्राह्य धरण्याबाबत

*महाराष्ट्र विधानपरिषद : मंगळवार, दिनांक १२ जुलै, २००५ : दुसरे अधिवेशन, २००५*

(१) * ५५८४ **श्री. रामनाथ मोते, श्रीमती संजीवनी रायकर, डॉ. अशोक मोडक, श्री. व्हि. यू. डायगव्हाणे प्रा. बी. टी. देशमुख, श्री. वसंतराव खोटरे, श्री. नानासाहेब बोरस्ते, श्री. जी. एल. अैनापूरे, श्री. वसंतराव चव्हाण, श्रीमती मंदा म्हात्रे, श्री. जगन्नाथ शेवाळे, प्रा. फौजीया खान, प्रा. जोगेंद्र कवाडे, श्री. संजय दत्त, मेजर सुधीर सावंत, श्री. नतिकोदीन खतिब : तारांकित प्रश्न क्रमांक १७६१ ला दिनांक १७ मार्च, २००५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरिष्ठ श्रेणी व निवडश्रेणीसाठी विना अनुदानित शाळेतील सेवाकाळ अनुज्ञेय न धरण्याची कृति ही नियमबाहय आहे असा जो धोरणात्मक निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिनांक १४ सप्टेंबर, २००० रोजी एका याचिकेमध्ये (सन २००० ची याचिका क्रमांक ४३४६) दिला त्याची धोरणात्मक अंमलबजावणी करण्याबाबत कॅबिनेट समोर नेऊन एक महिन्याच्या आत त्या संबंधी निर्णय घेण्याबाबतच्या विचाराधीन प्रश्नावरील शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय,

(२) असल्यास, शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) अद्यापही विचार पूर्ण झालेला नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा. वसंत पुरके** : (१) होय.

(२) शाळा अनुदानावर आलेल्या वर्षापासून पुढील सेवा वरिष्ठश्रेणीसाठी ग्राह्य धरण्याबाबतचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

**श्री. बी. टी. देशमुख** : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. नॉर्मली प्रश्नोत्तराच्या तासात आपण हरकतीचा मुद्दा उपस्थित करीत नाही. परंतु या ठिकाणी वस्तुस्थिती वेगळी असल्यामुळे मला हरकतीचा मुद्दा उपस्थित करावयाचा आहे. आता माझ्या हरकतीच्या मुद्यावर माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर द्यावे, अशी माझी अपेक्षा नाही. उच्च तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर तसेच तेथील कामकाजावर आपणाला सभागृहात चर्चा करता येत नाही. मुंबई उच्च न्यायालयाने दि. १४.९.२००० रोजी या बाबतचा धोरणात्मक निर्णय दिला आहे. त्या निर्णयाबाबत या प्रश्नामध्ये माननीय सदस्यांनी तसा उल्लेख केला आहे. म्हणून आम्हाला याची माहिती नाही, असे माननीय मंत्रिमहोदय म्हणू शकत नाही. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या परिच्छेद ६ मध्ये असे म्हटले आहे की, :-

"It may be mentioned at this stage that the government resolution dated 2-9-89 nowhere mentions that the qualified service of 12 years should be from the school which is brought on grant basis. It is required to be noted that the qualification prescribed for the aided school are same as in the unaided school and there are no separate rules for aided school which is receiving grant and school which is not receiving grant. Under the circumstances it is not correct to assume that 12 years service should be from aided school only." यानंतर सभागृहामध्ये या प्रश्नाला शासनाने उत्तर दिले की, हा निर्णय धोरणात्मक आहे. मी मुद्दाम आपल्या लक्षात आणतो की, शुक्रवार दिनांक ११ जून २००४ ला प्रश्न क्र. ३६७३९ ला दिलेले उत्तर समोर आहे. प्रश्न असा होता की, "वरिष्ठ श्रेणी वा निवड श्रेणीसाठी विना अनुदानित शाळेतील सेवाकाळ अनुज्ञेय न धरण्याची कृती ही नियमबाहय आहे असा धोरणात्मक निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिनांक १४ सप्टेंबर २००० रोजी एका याचिकेमध्ये (सन २००० ची याचिका क्रमांक ४६४३) दिला आहे हे खरे आहे काय?" त्याला उत्तर 'होय' दिले आहे. आता हायकोर्टाने निर्णय दिला. तो निर्णय काय आहे? तो निर्णय असा आहे की, असा भेदभाव करणे बरोबर नाही. आणि दुर्देवाने त्यानंतर त्यांनी १५ एप्रिल २००५ ला सभागृहामध्ये एक वाक्य लक्षवेधीमध्ये वापरले होते की, या उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे याचिकाकर्त्यापुरता हा निर्णय मान्य करणे आवश्यक आहे. आता याठिकाणी विरोधातच निर्णय मांडलेला आहे. मुद्दा असा आहे की, जोपर्यंत तुम्ही एखादी गोष्ट मान्य करीत नाही तोपर्यंत ते इंटरप्रिटेशन म्हणता येऊ शकते. परंतु तुम्ही सभागृहामध्ये एकदा ही गोष्ट मान्य केली की, हा धोरणात्मक निर्णय असल्यामुळे भेदभाव करता येत नाही. **सर्वात महत्वाची गोष्ट मला या ठिकाणी सांगावयाची आहे ती अशी की, मागच्या वेळी एक मंत्रिमहोदय म्हणाले की, हायकोर्टाने दिलेला निर्णय हा फायनल थोडाच आहे. आपण सुप्रिम कोर्टामध्ये जाऊ.** सभापती महोदय, आपण सभागृह तहकूब करुन हायकोर्टाच्या त्या निर्णयाची प्रत पाहून सभागृहामध्ये असे सांगितले की, "मी एवढेच सांगेन की, २००० सालामध्ये उच्च न्यायालयाने जो निर्णय दिला त्यावर त्या नंतरच्या काळात अपिल झालेले नाही. त्यामुळे अपिलाची मुदत संपलेली आहे." सभापती महोदय, आता हायकोर्टाने दिलेल्या निर्णयाच्या विरुध्द एवढे ओंगळ उत्तर समोर येणे म्हणजे हायकोर्टाच्या न्यायाधिशांनी दिलेल्या निर्णयाच्या विरुध्द तर सोडा, न्यायाधिशांच्या वर्तनाविरुध्द बोललो तर ते This is not fair. देशाच्या घटनेप्रमाणे जी गोष्ट बंधनकारक आहे. अपिल करायला आम्ही कुणी नाही म्हणत नाही. त्यांनी अपिल करायला पाहिजे होते. त्यांनी अपिल केले नाही. **सभागृहामध्ये आता परवा एक महिन्याच्या आत या बाबतीत पॉझिटीव्ह निर्णय घेऊ हा माझा शब्द आहे** असे सांगितले. म्हणून माझा सरळ हरकतीचा मुद्दा असा की, हायकोर्टाने निर्णय दिल्या नंतर आणि सभागृहामध्ये हा धोरणात्मक

---

***महाराष्ट्र शासन***

क्र. एसएसएन १०९९/(३०८/०२)माशि-२

*शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२*

**दिनांक ७ जानेवारी २००३**

प्रति,
शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक),
महाराष्ट्र राज्य पूणे.

**विषय** :- माध्यमिक शिक्षकांची वरिष्ठ/निवडश्रेणीसाठी विनाअनुदानित शाळेतील सेवा ग्राह्य धरण्याबाबत.

**मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या याचिका क्र. ४३४६/२००० मध्ये मा. उच्च न्यायालयाने विनाअनुदानित शाळेत केलेल्या १२ वर्षाच्या सेवेनंतर सुधारित वेतनश्रेणी देण्यास काही शिक्षकांना पात्र ठरविण्यात आले आहे. याच धर्तीवर शासनाच्या दि. १५ जानेवारी १९९० च्या निवडश्रेणीत पात्रतेच्या अटींमध्ये सुधारणा करण्याचे शासनाने मान्य केले असून यानुसार सर्व अनुदानित व विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांना त्यांची १२ वर्षाची सेवा निवडश्रेणीसाठी पात्र ठरविण्याचे शासनाने निश्चित केले आहे.** त्याअनुषंगाने अशाप्रकारचा निर्णय निर्गमित केल्यानंतर एकूण किती शिक्षक यासाठी अंतर्भूत असु शकतील, अशा शिक्षकांना वरिष्ठश्रेणी व निवडश्रेणी दिल्यामुळे शासनावर किती आर्थिक भार पडणार आहे, त्याचप्रमाणे या शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी किती कालावधी लागण्याची शक्यता आहे इ. माहिती अंतर्भूत करुन सविस्तर प्रस्ताव शासनास एक महिन्याच्या आत सादर करावा, ही विनंती. **प्रस्तुत प्रकरणी मा. मंत्रिमहोदयांनी विधीमंडळाच्या पुढील अधिवेशनापूर्वी निर्णय घेण्याच्या सूचना दिल्या असल्यामुळे हे प्रकरण तातडीचे समजावे.**

(मोहन पांढरकामे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

******

निर्णय आहे हे मान्य केल्यानंतर अशाप्रकारची उत्तरे मंत्रिमहोदयांना देता येतात काय? हा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**श्री. मधु चव्हाण :** सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे...

**सभापती :** प्रश्नोत्तराच्या तासामध्ये हरकतीचा मुद्दा उपस्थित करावयाचा नाही असे ठरले आहे. तरीसुध्दा अपवादात्मक परिस्थितीमध्ये माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांना मी हरकतीचा मुद्दा उपस्थित करण्यास परवानगी दिली. याचा अर्थ अन्य माननीय सदस्यांना परवानगी आहे असा होत नाही. प्रा. बी. टी. देशमुख सरांनी याठिकाणी कायदेशीर मुद्यांच्या अनुषंगाने विषय उपस्थित झाल्यामुळे हरकतीचा मुद्दा उपस्थित केला. न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या विरोधात अपिल करण्यासाठी शासन वरिष्ठ कोर्टामध्ये गेले नसेल तर न्यायालयाने दिलेला निर्णय अपिलाची मुदत संपल्यानंतर शासनावर बंधनकारक असतो. अशी जर वस्तुस्थिती असेल तर त्या अनुषंगाने शासनाकडून उत्तर येणे गरजेचे आहे. सन्माननीय राज्यमंत्र्यांनी या ठिकाणी उत्तर देतांना त्याची नोंद घ्यावी आणि उत्तर द्यावे.

**श्री.हसन मुश्रीफ :** सभापती महोदय, हे खरे आहे की, २० याचिकाकर्ते हायकोर्टामध्ये गेले आणि त्यांच्या बाबतीत निवडश्रेणी आणि वरिष्ठ श्रेणी बाबतचा निर्णय झाला. १९८६ मध्ये या शिक्षकांच्याबद्दल त्रिस्तरीय वेतनश्रेणी निश्चित केली. याचे कारण असे की, या शिक्षकांना पदोन्नती नाही. १९८९ साली विना अनुदान, कायम अनुदान असे तत्व तयार केले . . . .

**श्री.व्ही.यू.डायगव्हाणे(खाली बसून)** : माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे . . . .

**श्री.हसन मुश्रीफ :** सभापती महोदय, मी पार्श्वभूमी सांगत आहे.

**श्री.व्ही.यू.डायगव्हाणे :** सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांना स्पेसीफीक उत्तर देण्यास सांगावे. हा सभागृहाचा अवमान आहे.

**श्री.हसन मुश्रीफ :** सभापती महोदय, मी सर्व प्रश्नांची उत्तरे देणार आहे. १९८९ मध्ये आपण १९८६ च्या . . . .

**श्री.मधुकर चव्हाण :** सभापती महोदय, याठिकाणी प्रश्न विचारलेला आहे, त्या सन्माननीय सदस्यांना आधी प्रश्न विचारु द्यावा.

**श्री.हसन मुश्रीफ :** सभापती महोदय, माझे उत्तर संपलेले नाही. मी त्या विषयाकडेच येत आहे.

**श्री.प्रकाश शेंडगे :** सभापती महोदय, याठिकाणी ज्या सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे, त्यांनी अजून प्रश्न विचारलेलाच नाही. त्यापूर्वीच सन्माननीय सदस्यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित केलेला आहे.

**श्री.हसन मुश्रीफ :** सभापती महोदय, मला माननीय सभापतींनी उत्तर देण्यास सांगितलेले आहे.

**श्री.व्ही.यू.डायगव्हाणे :** सभापती महोदय, आपण फक्त यामध्ये त्यांना करेक्शन करावयास सांगितलेले आहे.

**श्री.हसन मुश्रीफ :** सभापती महोदय, तेच करीत आहे. आपण मला संरक्षण द्यावे की, मी काय करु.

**सभापती :** मी सांगितले त्यापध्दतीने यामध्ये काही करेक्शन असेल तर ती सांगावी.

**श्री.हसन मुश्रीफ :** सभापती महोदय, मी अशासाठी याची पार्श्वभूमी सांगत होतो की . . . . .

**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, ती सर्वांना माहिती आहे.

**श्री.हसन मुश्रीफ :** सभापती महोदय, खरोखरच मी सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.साहेबांच्या सर्व मुद्यांना उत्तरे देणार आहे.

**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय मूळ विषय टाळून वेळ घेणारे उत्तर देत आहेत.

**श्री.हसन मुश्रीफ :** सभापती महोदय, २० याचिकाकर्ते हायकोर्टामध्ये गेले. त्यांच्या बाबतीत २००० मध्ये निर्णय झाला. गेल्या अधिवेशनामध्ये सांगितल्याप्रमाणे आम्ही मंत्रिमंडळापुढे गेलो आणि त्यांनी कॉन्शसली, सद्सद्विवेक बुध्दीला स्मरुन निर्णय घेतला. तो असा की, . . . .

**श्री.व्ही.यू.डायगव्हाणे :** सभापती महोदय, आपण त्यांना करेक्शन करावयास सांगितलेले आहे.

**सभापती :** माननीय मंत्री महोदय, आपण जे उत्तर देत आहात, ते शासनाचे उत्तर असून ते सद्सद्विवेक बुध्दीला स्मरुनच तयार केलेले असते आणि निर्णय घेतला जातो. त्यामुळे ते पुन्हा म्हणण्याचे काही कारण नाही.

**श्री.हसन मुश्रीफ :** सभापती महोदय, परवाच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये असे ठरले की, **जे कोर्टामध्ये गेले त्यांना द्यावे आणि जे इतर आहेत, त्यांना देऊ नये.** असा निर्णय झालेला आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

**प्रा.बी.टी.देशमुख (खाली बसून) :** आपण कोर्टावर केवढी कृपा करीत आहात?

**श्री.रामनाथ मोते :** सभापती महोदय, सभागृहामध्ये हा विषय अनेक वेळा आलेला आहे. त्यावर अनेक वेळा चर्चा झाली आहे आणि प्रत्येक वेळेस त्यांनी पॉझिटीव्ह निर्णयाचे आश्वासन दिलेले आहे. परंतु आता माननीय मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर पूर्णपणे दिशाभूल करणारे आहे. या सदनाचा अवमान करणारे आहे. एवढेच नव्हेतर आपण जे निर्देश दिले होते, त्याचा सुध्दा अवमान करणारे आहे. खरे म्हणजे विना अनुदानित सेवा या प्रयोजनासाठी ग्राह्य धरल्या जातात. आमच्या पेन्शनसाठी ग्राह्य धरल्या जातात, आमच्या वेतन निश्चितीसाठी ग्राह्य धरल्या जातात, आमच्या ग्रॅच्युईटीसाठी ग्राह्य धरल्या जातात. सेवाशर्ती देखील दोन्ही ठिकाणी सारख्याच आहेत. असे असताना न्यायालयानेही म्हटलेले आहे की, विना अनुदानित सेवा वरिष्ठ वेतनश्रेणीसाठी ग्राह्य न धरणे, यासंबंधातील शासनाचे धोरण चुकीचे आहे. असे स्पष्ट आदेश असताना सुध्दा अनुदानित शाळांमधील सेवा ग्राह्य धरणार आहोत यासंबंधीचा जी.आर.काढण्याची आणि त्यासाठी मंत्रिमंडळासमोर जाण्याची गरज नव्हती. तेव्हा न्यायालयाच्या आदेशानुसार विना अनुदानित सेवा वरिष्ठ वेतन श्रेणीसाठी ग्राह्य धरणार आहात की नाही ? ते मान्य केले होते. पण याबाबतीत येथे चुकीचे उत्तर दिलेले आहे, आमची दिशाभूल केलेली आहे.

**श्री.हसन मुश्रीफ :** सभापती महोदय, मी मघाशी सांगितले की, आता मंत्रिमंडळाने निर्णय घेतलेला आहे. पुन्हा एकदा . . . . .

**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, मंत्रिमंडळाने निर्णय घेण्याच्या अगोदरपासून ते चालूच होते.

**श्री.व्ही.यू.डायगव्हाणे :** सभापती महोदय, हा निर्णय नवीन नाही. ज्या अनुदानित शाळा आहेत, त्यांना १२ वर्षानंतर वरिष्ठ श्रेणी दिलीच आहे. काय मोठा तीर मारला, कशाचा निर्णय घेतला? निर्णय असा असायला पाहिजे होता की, विना अनुदानित शाळेतील सेवाकाळ सर्व प्रयोजनासाठी लागू आहे. केवळ एक जीआरमध्ये वाक्य टाकलेले होते की, वरिष्ठ श्रेणीसाठी ग्राह्य धरु नका. या वाक्याची कोणातरी अधिकाऱ्यांनी खुंटी टाकली, ती काढून टाकता येत नाही काय? ज्याचा निर्णय झालेला आहे, त्याबाबत मंत्रिमंडळ पुन्हा निर्णय घेत असेल तर ती सभागृहाची दिशाभूल आहे. हा आपला अपमान आहे. यामध्ये स्पष्टपणे जोर देऊन कॅबीनेट मंत्रीमहोदयांनी उत्तर दिले की, "मी आश्वासन दिलेले होते, पण आता त्या आश्वासनासोबत शब्द आहे," आमच्या मराठवाड्यात, विदर्भात शब्दाला महत्व आहे. शब्दाला जागणारे आहोत. पण आपण शब्दाचा अपमान करणारे आहात, आपण जागणारे नाहीत. शब्द हा त्याचे वरचे वजन आहे. "माझा हा शब्द आहे, एक महिन्याच्या आत निर्णय घेतल्याशिवाय मी रहाणार नाही", असे सांगितले जाते. आता कॅबीनेटसमोर जाता, एक महिन्याच्या आत करतो असे आश्वासन दिलेले आहे त्या आश्वासनाचा भंग केलेला आहे, सभागृहाची दिशाभूल केलेली आहे. माननीय सभापतींचा हा अपमान आहे, या सार्वभौम सभागृहाचा अपमान आहे. काहीतरी सांगून मंत्रिमंडळाला सोबत घेऊन बुडू नका. कोर्टाच्या निर्णयाचा आधार घेऊन काही तरी चांगला निर्णय घ्या.

**श्री.हसन मुश्रीफ :** सभापती महोदय, हा निर्णय पुन्हा विधी व न्याय विभागाला दाखवून पुन्हा एकदा....

(अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलतात.)

...(अडथळा)...

**श्री.व्ही.यू.डायगव्हाणे :** सभापती महोदय, आपण रुलींग द्यावे.

**प्रा.बी.टी.देशमुख :** हा निर्णय मंत्रिमंडळाने घेतलेला आहे अशाप्रकारे सन्माननीय राज्यमंत्री महोदयांनी सांगितलेले आहे ते शब्द रेकॉर्डवरुन काढून टाकावेत. १२ वर्षे तो निर्णय अंमलात आहे. तो काल घेतलेला निर्णय नाही. अशाप्रकारचे सांगणे म्हणजे पोरकटपणाचे, हास्यास्पद आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलत असतात.)

**श्री.हसन मुश्रीफ :** सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन पुन्हा एकदा मंत्रिमंडळासमोर जाऊन याबाबतचा निर्णय तावडतोबीने करण्याचा प्रयत्न केला जाईल.

**श्री.रामनाथ मोते :** सभापती महोदय, आपण याबाबतीत आदेश दिलेले आहेत, त्याचेही उल्लंघन झालेले आहे. हा आमच्यावर अन्याय आहे.

...(घोषणा देण्यात येतात.)...

**सभापती** : मी हा प्रश्न राखून ठेवतो.

******

(१७)

# वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी विना अनुदानित शाळांतील सेवाकाळ ग्राह्य धरण्याबाबत

*महाराष्ट्र विधानपरिषद : बुधवार, दिनांक २० जुलै, २००५ : दुसरे अधिवेशन, २००५*

**राखून ठेवलेला ता.प्र.क्र.५५८४**
**( श्री.हसन मुश्रीफ, प्रा.वसंत पुरके यांच्याकरिता )**

**श्री.रामनाथ मोते** :सभापती महोदय,आज सुध्दा पुन्हा एकदा तेच उत्तर देण्यात आलेले आहे.या प्रश्नाच्या बाबतीत यापूर्वी भरपूर चर्चा झालेली आहे. या प्रश्नावर चर्चा होत असतांना सभापती महोदय आपण सुध्दा हस्तक्षेप केला होता. या प्रश्नाला दिलेले उत्तर बरोबर नसल्यामुळे व दिशाभूल करणारे असल्यामुळे याबावतीत पुन्हा उत्तर देण्याचे आपण निर्देश दिले होते व हा प्रश्न राखून ठेवण्यात आला होता.आता सुध्दा पुन्हा शासनाचे हेच उत्तर दिलेले आहे की, "या संदर्भात विधी व न्याय विभागाच्या सल्ल्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल." या संदर्भात उच्च न्यायालयाने स्पष्ट आदेश दिलेले आहेत, उच्च न्यायालयाने शासन निर्णयाचा अर्थ सुस्पष्ट केलेला आहे.तसेच त्याचे इंटरप्रिटेशन केलेले आहे की, विनाअनुदानित सेवा वरिष्ठ वेतनश्रेणीसाठी ग्राह्य न धरणे हा शासनाचा निर्णय चुकीचा आहे. असे असतांना आता पुन्हा विधी व न्याय विभागाचा सल्ला घेणे, त्यांच्याकडून माहिती घेणे किंवा त्यांच्या सल्ल्याने निर्णय घेणे हे दिशाभूल करणारे आहे आणि आम्हाला पुन्हा एकदा टांगत ठेवण्यातला हा प्रकार आहे, असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. या मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार महाराष्ट्रातील सर्व शिक्षकांची विनाअनुदानित सेवा वरिष्ठ वेतन श्रेणीसाठी ग्राह्य धरण्याचा विनाअट निर्णय तातडीने लागू करण्यात येईल काय ?

**श्री.नितीन गडकरी** :सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.आपण हे कसे काय स्वीकारले आहे याबाबत आपण न्याय द्यावा. प्रस्तुत प्रकरणामध्ये हायकोर्टाने निर्णय दिलेला आहे.हायकोर्टाने दिलेला निर्णय हा सरकारवर बंधनकारक आहे.हायकोर्टाने दिलेल्या निर्णयाच्या विरुध्द सरकारने सुप्रीम कोर्टात अपील करावयास पाहिजे किंवा सरकारने अपील करुन स्टे मिळवावयास पाहिजे होता. परंतु हा स्टे सरकारने मिळवलेला नाही.म्हणून प्रस्तुत प्रकरणी हायकोर्टाच्या निर्णयाची तपासणी पुन्हा विधी व न्याय विभागाकडून करणे हे कंटेम्प्ट ऑफ कोर्ट आहे. माझी आपल्याला अशी विनंती आहे की, याबाबतीत न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे पालन करणे हे सरकारचे वैधानिक व विधिवत कर्तव्य आहे.ते न केल्यामुळे या संदर्भात दुसरा प्रश्न उदभवत नाही.खरे म्हणजे हा कंटेम्प्ट ऑफ कोर्ट आहे. तेव्हा माझी अशी विनंती आहे की याबाबतीत सरकारने खुलासा करावा . हा कंटेम्प्ट ऑफ कोर्ट होणे बरोबर होणार नाही.

**प्रा.बी.टी.देशमुख** :सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित केलेला आहे त्याबाबतीत मला असे सांगावयाचे आहे की, त्याही दिवशी मी असे म्हणालो होतो की,या देशाच्या घटनेच्या विरोधात कोणालाही बोलता येत नाही हे जेवढे खरे आहे तेवढेच हे सुध्दा खरे आहे की त्याच्याविरोधात उत्तर देता येत नाही.दुर्देवाचा भाग असा आहे की, मंत्रिमंडळाच्या समोर ही बाब इफेक्टीव्हली, सत्य रीतीने आणि इमानेइतबारे नेण्यामध्ये विभागाला अपयश आलेले आहे.त्या दिवशी सुध्दा मी हे सांगितले होते की, दिनांक ११ जून २००४ रोजी तारांकित प्रश्न क्रमांक ३६७३९ विचारण्यात आला होता की, "वरिष्ठ श्रेणी किंवा निवड श्रेणी साठी विनाअनुदानित शाळेतील सेवाकाळ अनुज्ञेय न धरण्याची कृती ही नियमबाह्य आहे असा धोरणात्मक निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिनांक १४ सप्टेंबर २००० रोजी याचिका क्रमाक ४३४६मध्ये दिला हे खरे आहे काय?" तेव्हा त्या प्रश्नाला आपण 'होय' असे उत्तर दिले होते. दुर्देवाचा भाग असा आहे की, मंत्रिमंडळासमोर

**ALL INDIA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANIZATIONS**

*(Regd. Under Act XXI of 1860) 493 Urban Estate (Phase I) Jalandhar- 144 022] Punjab*

Ph. : 98154-89493, 0181-5063493, 0181-4610493, 0181-2481493 E-mail: tewari_vk@rediffmail.com,

## MEETING WITH CHAIRMAN, UGC ON FEBRUARY 8, 2007

Meeting with Chairman, UGC on February 8, 2007 : The meeting was chaired by Prof. S. Thorat, Chairman and attended by the Secretary and the Joint Secretaries. The AIFUCTO was represented by Profs. : Thomas Joseph, V.K. Tewari, V.P.Singh, A. James William, A.K.Barman and Vazir Nehra. The following issues were submitted :

(1) Constitution of UGC Pay-Review Committee consequent upon the formation of 6th CPC on December 5, 2006.

(2) Implementation of CABE Committee Report submitted by Professor B. Mungekar on "Financing of Higher & Technical Education". Including, allocation of 6 % of GDP for Education.

(3) Foreign Universities Bill.

(4) Implications of National Knowledge Commission.

(5) Deleterious impact of Private Universities on HE, request to stop the menace.

(6) Discussion on Deemed Universities.

(7) Regular Consultative Mechanism - finalization thereof.

(8) Implementation of the solutions to the pending anomalies like : (1) CAS from 1.1.96 (2) Professorship in all Colleges, (3) Third Promotion to End Stagnation of thousands of Teachers who have exhausted their pay scale, and the allied ones.

(9) Problems related to Refresher Courses.

(10) Massive erosion of standards due to lack of teachers.

(11) Menace of unrecognized Foreign Institutes.

(12) Resolutions of the AIFUCTO Conference and some individual /general issues for your consideration.

The Chairman assured to take up the pending anomalies with the joint Secretary, MHRD. The details of the meeting will be sent in the next circular, based on the Minutes.

Please make all the tasks successful.

With fraternal greetings,

Yours sincerely,
Dr.V.K.Tewari
General Secretary. AIFUCTO

*****

जात असतांना कोणत्या तरी अधिका-याने हे वाक्य घुसवले होते. ते वाक्य असे आहे की, **हा निर्णय केवळ याचिकाकर्त्या पुरता मर्यादित आहे. म्हणजे सभागृहामध्ये आपण उत्तर दिले होते की, हा धोरणात्मक निर्णय आहे म्हणून आणि तसा तो आहे देखील.** सभापती महोदय, तो निर्णय या ठिकाणी मी मागील वेळेस वाचून दाखविलेला असल्याने आता पुन्हा वाचून दाखवून सभागृहाचा मी वेळ घेऊ इच्छित नाही. परंतु उच्च न्यायालयाचा निर्णय हा केवळ याचिकाकर्त्यापुरता मर्यादित आहे असे म्हणून आम्ही तो अमान्य करीत आहोत असे आता शासन म्हणते आहे आणि हे मंत्रिमंडळापुढे देखील तशाच स्वरूपात ठेवले गेले. सभापती महोदय, २००० सालातील हा निर्णय आहे आणि २००४ मध्ये हे कौतुकास्पद उत्तर आपल्याकडून येत आहे. अगदी मिरवणूक काढण्याजोगे हे उत्तर आहे. सभापती महोदय, हायकोर्टाच्या निर्णयाची नोटीस देखील यांना दिलेली आहे. भाग १ मध्ये. मला आश्चर्य हे वाटते आहे की, शासनाचा शिक्षण विभाग हे सारे प्रकरण वाचत नाही काय ? न वाचताच सरळ उत्तर देत आहे की, **उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय आणि मंत्रिमंडळाने घेतेला निर्णय यामध्ये विसंगती राहू नये म्हणून आता विधी व न्याय विभागाकडे ही बाब तपासण्यसाठी दिलेली असून त्यांच्या सल्लाने पुढे कार्यवाही करण्यात येईल.** सभापती महोदय, म्हणून माझे त्या दिवशीही म्हणणे असे होते की, हा व्यवस्थेचा मुद्दा आहे. तेव्हा या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. गडकरी यांनी जो हरकतीचा मुद्दा मांडलेला आहे तो योग्य असाच आहे. हायकोर्टाच्या निर्णयावर अशा पध्दतीने कार्यवाही करणे बरोबर नाही, योग्य नाही. या ठिकाणी मंत्री महोदयांनी अत्यंत अयोग्य असेच काम केलेले आहे हे आपल्यालाही मान्य आहे तरी याबाबत सभापती महोदय, आपण निर्णय द्यावा हे उचित होईल.

**श्री. व्ही.यू.डायगव्हाणे :** सभापती महोदय, मला देखील या हरकतीच्या मुद्यावर बोलावयाचे आहे. ...

**सभापती :** मी आता कोणालाही हरकतीच्या मुद्यावर बोलण्यास परवानगी देऊ इच्छित नाही. एक अपवाद म्हणून मी सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांना बोलावयास परवानगी दिली. याचा अर्थ प्रत्येक सदस्याने यावर बोलावयास मागितले तर मी आपणास तशी परवानगी देणार नाही.

**श्री. नितीन गडकरी :** सभापती महोदय, आपण माझ्या हरकतीच्या मुद्यावर निर्णय द्यावा अशी माझी आपणास विनंती आहे. कारण या प्रश्नावर आता येथे चर्चा होऊच शकत नाही. आपण येथे ही चर्चा केली तर आपणही हायकोर्टाचा अवमान करतो आहोत असे होईल. सत्तारूढ पक्षाला हायकोर्टाबद्दल काय वाटते तो त्यांचा प्रश्न आहे. या प्रकरणी हायकोर्टाचा जो निर्णय आहे तो धोरणात्मक आहे असे आपण मान्य केले आहे. पण समजा तसे ते आपल्याला मान्य नसेल तर आपण त्याबाबत सुप्रीम कोर्टामध्ये जाऊन अपील करावयास पाहिजे होते. पण शासनाने अपील केले नाही आणि हायकोर्टाच्या निर्णयाची अंमलबजावणी देखील केलेली नाही. इतकेच नाही तर त्याबाबत मंत्रिमंडळामध्ये ती बाब निर्णयासाठी ठेवली गेली. हायकोर्टाचा निर्णय तपासण्याचा अधिकार मंत्रिमंडळाला आहे का? **पुढे आणखी मोठी गोष्ट अशी की, कॅबिनेटचा निर्णय आणि हायकोर्टाचा निर्णय यामध्ये विसंगती आहे काय हे तपासण्याकरिता आपण ही बाब विधी व न्याय विभागाकडे पाठवित आहात.** तेव्हा सभापती महोदय, या सभागृहामध्ये या प्रश्नावर चर्चा होणार असेल तर वैधानिकदृष्ट्या ते बरोबर नाही. तो हायकोर्टाचा अवमान ठरेल आणि आपण तसे करू नये असे मला वाटते. म्हणून आपण स्वतः हे मॅटर ताबडतोब तपासावे आणि सरकारला हायकोर्टाच्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्याचे आदेश द्यावेत.

**श्री. बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी एक गोष्ट मंत्रिमंडळाच्या तसेच सभागृहाच्याही लक्षात आणून दिलेली नाही. खरे तर हायकोर्टाच्या निर्णयावर अपील करण्याची वेळ देखील केव्हाच निघून गेलेली आहे ही ती गोष्ट. असे असतानाही मंत्री महोदय येथे सांगतात की, हायकोर्टाचा निर्णय असला तरी त्यावर आम्ही सुप्रीम कोर्टामध्ये अपील करू शकतो. म्हणून मग शेवटी या प्रश्नावर आपल्याला सभागृहामध्ये हा प्रश्न तहकूब करावा लागला. मी आपल्याला एवढेच सांगू इच्छितो की, हायकोर्टाने जो निर्णय या प्रकरणी दिलेला आहे त्यावर अपील करण्याची मुदत संपलेली आहे. तेव्हा हायकोर्टाच्या निर्णयाविरोधात आपण हे उत्तर देणार आहात काय ?

**सभापती :** सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, आपण जो हरकतीचा मुद्दा येथे उपस्थित केलेला आहे, त्यावर मी आपल्याला नेमके समर्पक उत्तर देणार आहे. पण तत्पूर्वी याबाबत शिक्षण राज्यमंत्र्यांचे काय म्हणणे आहे ते आपण ऐकून घेऊ या.

**श्री. हसन मुश्रीफ :** सभापती महोदय, मी शांतपणे आपल्याला सगळे काही सांगतो. पण एकदम असे अंगावर आल्यास मलाही गांगरल्यासारखे होते. तेव्हा आपण सर्वांनीच शांतपणे माझे म्हणणे ऐकून घ्यावे ही विनंती. सभापती महोदय, वरिष्ठ श्रेणी आणि निवड श्रेणीबाबत उच्च न्यायालयाचा निर्णय झालेला आहे हे खरे आहे. हा निर्णय २० याचिकाकर्त्यांपुरता अमलात आणावा असे मंत्रिमंडळाने ठरविले हेही खरे आहे. मंत्रिमंडळासमोर जे आले त्याचा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी केला ते खरे आहे. .... त्याबाबत परिणामकारकरित्या कॅबिनेटसमोर ही बाब मांडण्याचा प्रयत्न केला आहे. सारासार विचार करुन तसेच सद्सद्‌बुध्दीचा विचार करुन मंत्रिमंडळाने याबाबतचा निर्णय केला आहे.काल प्राथमिक शिक्षकांच्या वेतनश्रेणीबाबतचा प्रश्न आला होता. केंद्राच्या वेतनश्रेणीप्रमाणे राज्यातील प्राथमिक शिक्षकांची वेतनश्रेणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. याबाबत माननीय मुख्यमंत्री, अर्थमंत्री तसेच आमचे कॅबिनेट मंत्री आणि माननीय सभापती महोदय, आपल्या दालनात बोलावून या निर्णय करणार आहोत. त्यावेळी याही प्रश्नाचा आपण अंतर्भाव करावा आणि दोन्ही निर्णय एकत्रित करावेत, अशी माझी विनंती आहे.

**सभापती :** या ठिकाणी मी माझा निर्णय देत आहे. या ठिकाणी प्रश्न क्र. १ असा विचारण्यात आला आहे की, "वरिष्ठ श्रेणी व निवड श्रेणीसाठी विनाअनुदानित शाळेतील सेवाकाळ अनुज्ञेय न धरण्याची कृति ही नियमबाह्य आहे, असा जो धोरणात्मक निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिला आहे, त्याबाबत एक महिन्यात कॅबिनेटसमोर जाऊन निर्णय घेण्यात येईल काय?" याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी असे उत्तर दिले आहे की, याबाबत कोणतीही विसंगती राहू नये म्हणून आम्ही विधी व न्याय विभागाचा सल्ला घेत आहोत. मला माननीय मंत्रिमहोदयांना हे सांगावयाचे आहे की, कॅबिनेट सुरु असताना विधी व न्याय विभागाचे अधिकारी उपलब्ध असतात. दुसरी बाब अशी की, एखाद्या बाबीबाबतचा निर्णय उच्च न्यायालयाने दिला तर त्याची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. हा निर्णय योग्य नसेल तर त्याबाबत राज्य सरकारने रितसर न्यायालयात जाणे आवश्यक आहे. हा उचित आणि योग्य मार्ग आहे. आताच माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितल्याप्रमाणे प्राथमिक शिक्षकांच्या वेतनश्रेणीच्या प्रश्नाबाबत आपण सर्वजण माझ्या दालनात बसण्याचे ठरविले आहे. त्या वेळी या प्रश्नाबाबत विचार करणे शक्य आहे.

( गोंधळ )

मी माझे वक्तव्य संपविलेले नाही. या ठिकाणी उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाप्रमाणे आपणाला जावयाचे असेल तर........माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितल्याप्रमाणे शिक्षण विभाग आपल्याकडून सवतोपरी प्रयत्न करीत आहे. याबाबत कॅबिनेटने निर्णय घेणे आवश्यक होते, अशी माननीय सदस्यांची अपेक्षा आहे. परंतु तसा निर्णय झालेला नाही. याबाबत विधी व न्याय विभागाचा सल्ला घेणे गरजेचे आहे, असे माननीय मंत्रिमहोदयांचे म्हणणे आहे. आता उच्च न्यायालयाच्या निर्णयावर कॅबिनेटमध्ये चर्चा करावयाची की नाही, हे शासनाने ठरवावयाचे आहे. त्याबाबतीत मी कोणतीही सूचना करणार नाही. उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर अशा प्रकारचे उत्तर या ठिकाणी येणे अपेक्षित नाही, असे मला वाटते. **तेव्हा मी याबाबत असा निर्णय देत आहे की, या प्रश्नाची चर्चा करण्यासाठी मी सर्वांना माझ्या दालनात बोलावेन. त्याबाबत मी चर्चा करेन. त्यावेळी जे निष्कर्ष येतील, त्याबाबत पुन्हा सभागृहात चर्चा होईल.**

**श्री. नितीन गडकरी :** सभापती महोदय, न्यायालयाचा अवमान करण्याच्या बाबतीत आपण व आम्ही सहभागी होऊ नये, असे माझे मत आहे. आपल्या दालनात चर्चा करणे म्हणजे न्यायालयाच्या निर्णयावर चर्चा करणे असा अर्थ होईल. न्यायालयाने दिलेला निर्णय हा सरकारवर बंधनकारक आहे. भारतीय घटनेनुसार न्यायालयाने दिलेल्या निर्णयावर कॅबिनेटला, विधी व न्याय विभागाला चर्चा करण्याचा अधिकार नाही. न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करणे त्यांच्यावर बंधनकारक आहे. आता राज्य शासनाला हायकोर्टाचा निर्णय मान्य नव्हता तर वेळीच राज्यशासन त्याविरुध्द सुप्रिम कोर्टात अपील करु शकत होते. आता त्याची मुदत संपलेली आहे. त्यामुळे आता न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी केली नाही. परंतु आपण या लोकशाहीचे चौथे स्तंभ आहात. आणि म्हणून न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची चर्चा आपल्या चेंबरमध्ये करणे योग्य होणार नाही. माझी आपणास विनंती आहे. मी आपणास एक मार्ग सुचवितो, आपण हा प्रश्न आता स्थगित करावा. आणि त्यानंतर विधी विभागाच्या ॲडव्होकेट जनरलना बोलावून घेवून आपण त्यांचे मत जाणून घ्यावे. व त्यानंतर आपण आपले मत सभागृहामध्ये द्यावे. जेणेकरुन या सभागृहाने उच्च न्यायालयाचा अवमान केला असे पाप आपल्या माथी लागू नये अशी माझी आपणास विनंती आहे.

**सभापती :** माझ्या दालनामध्ये यासंबंधी जी काही चर्चा होईल ती या ठिकाणी सांगण्याची व्यवस्था होईल असे मी सांगितले. याचा अर्थ मी या ठिकाणी निर्णायक उत्तर दिले असा होत नाही. अशा परिस्थितीत अन्य कोणताही पर्याय मला योग्य वाटत नाही. फक्त हा एकच पर्याय योग्य असून त्यासंबंधी मी निर्णय घेतला आहे.

******

(१८)

# वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी विना अनुदानित शाळांतील सेवाकाळ ग्राह्य धरण्याबाबत

*महाराष्ट्र विधानपरिषद : शुक्रवार, दिनांक ९ डिसेंबर, २००५ : तिसरे अधिवेशन, २००५*

(१) * ९२६८ **श्री. व्हि. यू. डायगव्हाणे, प्रा. बी. टी. देशमुख, श्री. वसंतराव खोटरे, श्री. नानासाहेब बोरस्ते, श्री. वसंतराव काळे , श्री. नतिकोद्दीन खतिब : तारांकित प्रश्न क्रमांक ५५८४ ला दिनांक १२ जुलै, २००५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरिष्ठ श्रेणी व निवडश्रेणीसाठी विना अनुदानित शाळेतील सेवाकाळ अनुज्ञेय न धरण्याची कृति ही नियमबाह्य आहे असा जो धोरणात्मक निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिनांक १४ सप्टेंबर, २००० रोजी एका याचिकेमध्ये (सन २००० ची याचिका क्रमांक ४३४६) दिला त्याची धोरणात्मक अंमलबजावणी करण्याच्या प्रश्नाची सद्य:स्थिती काय आहे,

(२) निर्णय झाला असल्यास केव्हा व आदेशाचे स्वरुप काय आहे,

(३) अद्याप निर्णय झाला नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वसंत पुरके** : (१) प्रस्तुत प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दिलेला निकाल व मंत्रिमंडळाने घेतलेला निर्णय यामध्ये विसंगती होऊ नये म्हणून या प्रकरणी विधी व न्याय विभागाच्या सल्ल्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

**श्री.व्ही.यू.डायगव्हाणे** : सभापती महोदय, हा प्रश्न सभागृहामध्ये सातव्यांदा चर्चेला येत आहे. दुःखाने सांगावेसे वाटते की, १२ जुलै २००५ रोजी जे उत्तर दिले त्याही वेळी आणि आपल्या दालनामध्ये २८ सप्टेंबर २००५ रोजी चर्चा झाली, त्याहीवेळी हेच शेवटच्या पॅरेग्राफमधील उत्तर दिलेले आहे. आजही तेच उत्तर या प्रश्नाला दिलेले आहे. कोर्टामध्ये उच्च न्यायालयाने याचिका क्रमांक ४३४६,दिनांक १४ सप्टेंबर २००० ला २० शिक्षकांची विना अनुदानित सेवा ही वरिष्ठ श्रेणीसाठी ग्राह्य धरण्यात यावी अशाप्रकारचा निर्णय दिला. एवढेच नाही तर याशिवाय रिट पिटिशन क्रमांक ७०२६, ७०२७, ७०२८, ७०२९, ७०३०, ७०३२, ७०३६ याद्वारे अशा पाच शिक्षकांना पुन्हा हाच बेनिफीट कोर्टाने दिला. आता असे उत्तर दिलेले आहे की, या प्रकरणी विधी व न्याय विभागाच्या सल्ल्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल. यापूर्वी एक महिन्यात निर्णय घेऊ अशापध्दतीचे देखील उत्तर आलेले होते. सभापती महोदय, आमचे असे म्हणणे आहे की, आपल्या दालनामध्ये आपण निर्देश दिल्याप्रमाणे २८-९-२००५ ला चर्चा झाली,त्यावेळेस मा.मंत्री महोदय आणि त्यांचे सहकारी आणि आम्ही प्रतिनिधीही त्या ठिकाणी होतो. त्यावेळेस देखील चर्चा झाली. याला अडीचतीन महिने होऊन गेले. आता उत्तर असे आहे की, विधी व न्याय विभागाच्या सल्ल्यानुसार कार्यवाही करण्यात येईल. विधी व न्याय विभागाचा सल्ला घ्यायचा असेल तर आपल्या विभागाची आवश्यकता आहे काय, आपला विभाग काही निर्णय घेणार आहे की नाही ? की विधी व न्याय आणि वित्त विभागाकडेच हे काम ढकलणार आहात ? माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, केवळ वरिष्ठ श्रेणीसाठी नाही तर सर्व प्रयोजनासाठी, मग सिनियॉरिटी असेल, पेन्शन, गॅज्युएटी आणि इतर सर्वांसाठी असावी. यासाठी ४ कोटी रुपयाचा खर्च लागेल असे आपण म्हणता. सभापती महोदय, कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्याबाबतीत संबंधित ग्राम विकास विभागाने एक महिन्याच्या आत, यापेक्षा जास्त निधी उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भातील निर्णय घेतला.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

**श्री.व्ही.यू.डायगव्हाणे:** स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, आता आम्हाला विचारायला लावू नका, आमची फजिती करु नका, आपलीही फजिती करु नका. बाहेर आमच्याबद्दल आणि तुमच्याबद्दल जे काही वातावरण निर्माण झालेले आहे, हे थोडे सांभाळून एक महिन्याच्या आत हा निर्णय घेतला जाईल काय ? कोर्टाचा निर्णय आहे. कोर्टाचा अवमान करु नका. एक महिन्याच्या आत यासंबंधीचा निर्णय घेतला जाईल काय ?

**श्री.वसंत पुरके** : माननीय सभापती महोदय, एखादा प्रश्न सभागृहामध्ये कितीवेळा चर्चेला यावा, याला मर्यादा असणे स्वाभाविक आहे. म्हणून आपल्याला आणि सनमाननीय सदस्यांनाही विनंती केली होती की, हा प्रश्न त्वरित निकालात निघावा म्हणून आपण स्वतः मध्यस्थी करुन, माननीय मुख्यमंत्र्यांसोबत एक बैठक बोलवावी. परंतु ती बैठक आयोजित केली नाही. परंतु विधानभवनामध्ये जी बैठक झाली होती. मी पुन्हा विनंती करतो की, या संदर्भात खात्याची भूमिका अत्यंत सकारात्मक आहे. परंतु वित्त विभागाने आणि कॅबिनेटने स्वीकृत न केल्यामुळे हा प्रश्न प्रलंबित राहिला. पुन्हा विनंती करतो की, माननीय मुख्यमंत्र्यांसोबत बैठक बोलाविण्याचे निश्चित प्रयत्न केले जातील.

**प्रा.बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, आपल्या सौजन्याचा गैरफायदा घेतला जातो हे काही बरोबर नाही. एक गोष्ट अशी आहे की, मुळामध्ये हायकोर्टाने निर्णय दिला की, तुमचा शासन निर्णय बरोबर आहे, त्याप्रमाणे अंमलबजावणी करा. शासन निर्णय जो आहे, तो बीनचूक आहे. त्यामध्ये विना अनुदानाची सेवा धरु नका,असे कोठेही म्हटलेले नाही. त्यामुळे ती धरा व त्याची अंमलबजावणी करा असे मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयात म्हटलेले आहे. तो धोरणात्मक निर्णय आहे हे शासनाने अनेकदा मान्य केलेले आहे. हायकोर्टाच्या निर्णयावर याच सभागृहात शुक्रवार, दिनांक ११ जून, २००४ ला प्रश्न क्रमांक ३६७३९ ला आपण उत्तर दिले आहे. ते उत्तर मी आपल्याला वाचून दाखवितो. प्रश्न असा होता की, "वरिष्ठ श्रेणी व निवडश्रेणीसाठी विनाअनुदानीत शाळातील सेवाकाळ अनुज्ञेय न धरण्याची कृति ही नियमबाह्य आहे असा धोरणात्मक निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दि.२४ सप्टेंबर, २००० रोजी एका याचिकेमध्ये दिला (सन २००० ची याचिका क्रमांक ४३४६) हे खरे आहे काय?" त्याला शासनाने दिलेले उत्तर एका शब्दाचे आहे. 'होय'. आता येथे कौतुक काय चालू आहे? "उच्च न्यायालयाने दिलेल्या निकाल व मंत्रिमंडळाने घेतलेला निर्णय यामध्ये विसंगती होऊ नये म्हणून या प्रकरणी विधी व न्याय विभागाच्या सल्ल्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल." त्यानंतर आता पुन्हा हायकोर्टाने तसाच निर्णय दिला. विधी व न्याय विभागाची पंचाईत कशाला करित आहात? त्यांचा सल्ला तुम्हाला घ्यावा लागला. हायकोर्टाचा निर्णय तुम्हाला इतके दिवस समजला नाही. म्हणून हायकोर्टाचा दि.३-९-२००४ चा निर्णय पुन्हा झाला आहे. पुन्हा हायकोर्टाने म्हटले आहे की, एकदा आम्ही सांगितले आता पुन्हा सांगतो की, हे शासनाचे वागणे बरोबर नाही. सभापती महोदय, हे शासन कसे काय चालत आहे हेच मला कळत नाही. पुन्हा मंत्रिमहोदय, अध्यक्षांना विनंती करीत आहेत. अध्यक्षांना विनंती करण्यापेक्षा मुख्यमंत्र्यांना आणि मंत्रिमंडळाला सांगण्याची आपली कॉन्स्टिटयुशनल डयुटी आहे. हा हायकोर्टाचा निर्णय आहे. हे अत्यंत अशोभनीय आहे. दुर्दैवाने येथे एकदा त्यांच्यापैकी कोणी तरी उद्गार काढले होते की, मग आता हायकोर्टात जाऊन निर्णय घ्या. आम्ही त्या सात लोकांना सांगितले. त्यांनी हायकोर्टातून पुन्हा निर्णय आणला. तुम्ही काहीच करु नका! शासनाने नाही म्हणून सांगावे आम्ही त्या सर्व लोकांच्या सभा घेऊन हायकोर्टात चला असे सांगतो. मग तुमचा उपयोग काय राहीला ? जरा विचार करा, ही अशोभनीय गोष्ट आहे.

**सभापती** :प्रश्न विचारा.

**प्रा. बी. टी. देशमुख** : हायकोर्टाने दिलेला निर्णय धोरणात्मक आहे असे वारंवार सभागृहात सांगितल्यानंतर अंमलबजावणीचा आदेश शासनाने काढला नाही तो एक महिन्यात काढणार काय ? असा प्रश्न आहे.

**प्रा. वसंत पुरके** : सभापती महोदय, यापूर्वीही कॅबिनेटला सादर केलेल्या प्रस्तावानुसार पुन्हा आम्ही हा प्रस्ताव कॅबिनेटसमोर नेऊ आणि सकारात्मक निर्णय घेऊ.

**श्री. व्ही. यू. डायगव्हाणे** :सभापती महोदय, आपण आम्हाला संरक्षण द्यावे...

**श्री. नितीन गडकरी** : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, या विषयावर सभागृहात जेव्हा चर्चा झाली होती त्यावेळी मी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला होता. त्याला आपण उत्तर दिले होते आणि ॲडव्होकेट जनरलचे ओपिनियन घेण्याबद्दल देखील सभागृहात मांडले होते. यावेळी हायकोर्टाने या विषयाबद्दलचा निर्णय दिलेला आहे. हा निर्णय सरकारवर बंधनकारक आहे असे मंत्रिमहोदयांनी मान्य केले होते. हायकोर्टाने दिलेला निर्णय जेव्हा सरकारवर बंधनकारक आहे आणि ते सरकार पाळत नसेल तर कन्टेम्प्ट ऑफ कोर्ट होतो. **या ठिकाणी खऱ्या अर्थाने शिक्षण मंत्र्यांनी आणि शिक्षण सचिवांनी कन्टेम्प्ट ऑफ कोर्ट केलेला आहे. शासनाची अडचण काय आहे? वित्त विभाग ऐकत नाही. पण सरकार एकच असते. मंत्रिमहोदय सभागृहात सांगत आहेत की, सन्माननीय मुख्यमंत्र्यांना भेटा, अर्थमंत्री ऐकत नाही किंवा वित्त विभाग ऐकत नाही. हा आमचा प्रश्न नाही**.. आमच्या दृष्टीने शासन ही एकच एनटिटी आहे. आणि या विषयात हायकोर्टाने निर्णय दिल्या नंतर देखील त्याचे पालन केले नाही त्यावर ॲडव्होकेट जनरलचे ओपिनियन घेण्याचेही आम्ही मान्य केले होते.सभापती महोदय, माझी विनंती आहे की, आपण यामध्ये हस्तक्षेप केला पाहिजे. लोकशाहीच्या चार विंग आहेत. १) लेजिस्लेटिव्ह विंग आहे. २) न्यायालय ३) प्रेस ४) आपली एक्झिक्युटिव्ह विंग म्हणजे ब्युराक्रसी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या घटनेप्रमाणे प्रत्येकाच्या मर्यादा आणि हक्क ठरलेले आहेत. परंतु ज्यावेळी एखाद्या विंगमध्ये विशेषतः लेजिस्लेस्टिव्ह विंगमध्ये दुसऱ्या विंगचा अपमान होत असेल तर त्यावेळी या सभागृहाचे प्रमुख आपण आहात. अशा वैधानिक मुद्यावर

आपण अनेक वेळा या सभागृहामध्ये आपले मत दिलेले आहे. यासंदर्भात कन्टेम्प्ट ऑफ कोर्टची क्लिअरकट केस आहे. हायकोर्टाचा निर्णय सुस्पष्ट आहे. हायकोर्टाचा निर्णय सरकारवर बंधनकारक आहे. सरकारने बंधनकारक निर्णयाचे पालन केले नाही हे सिध्द होत आहे. त्यामुळे कन्टेम्प्ट ऑफ कोर्ट झालेले आहे. आता प्रा. बी. टी. देशमुख साहेब, श्री. डायगव्हाणे साहेब आम्ही सर्व आमदार मिळून आम्ही यांच्या विरुध्द कन्टेम्प्टमध्ये ॲप्लिकंट बनून आम्ही हायकोर्टात न्याय मागायला जायचे काय ? आणि मला असे वाटते की, तसा न्याय मागणे उचित होणार नाही. कारण आम्ही या सभागृहाचे सदस्य आहोत. या सभागृहामध्ये जेव्हा कायद्याची अवहेलना होत असेल, नियमाप्रमाणे कामकाज होत नसेल, हायकोर्टाचा अवमान सरकारकडून किंवा कोणाही व्यक्तीकडून होणार असेल तर अशा वेळी हस्तक्षेप करण्याचा अधिकार आपल्याला आहे. आणि म्हणून माझी आपणाला विनंती आहे. पाहिजे तर आपण आज हा प्रश्न रोखून धरा आणि उद्या उत्तर द्या. तेव्हा सभापती महोदय, आता आपण यावर रुलिंग दिले पाहिजे.आपला हा अधिकार आहे. आपण या सार्वभौम सभागृहाचे सभापती आहात, आपण बस म्हटल्यानंतर मंत्री तसेच सदस्य देखील खाली बसतात. म्हणून आमच्या अधिकाराचे संरक्षण करण्याची जबाबदारी लोकशाहीने आपल्यावर टाकलेली आहे, ती कृपया आपण करावी. कारण तीन तीन वेळा तेच नाणं घासणे हे बरोबर नाही. मा. मंत्री महोदयांची देखील काही तरी व्यक्तिगत अडचण आहे असे मला वाटते. परंतु असे चित्र सभागृहाच्या बाहेर उभे राहणे योग्य नाही. यामध्ये कोर्टाचा अवमान होत असल्याचे दिसून येते. म्हणून हे लोकशाहीच्या दृष्टीने योग्य होणार नाही. माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, वास्तविक यामध्ये लिगल ओपिनियन घेण्याची जरुरी नाही. कारण त्यांनी मान्य केले आहे की, हायकोर्टाचा निर्णय बंधनकारक आहे. म्हणून या निर्णयाची जशीच्या तशी अंमलबजावणी शासनाने हे अधिवेशन संपण्यापुर्वी करावी असे आदेश आपण द्यावेत, अशी आमची विनंती आहे.

**श्री. व्ही.यु.डायगव्हाणे :** सभापती महोदय, यापूर्वी जो निर्णय कोर्टाने दिला होता त्यावेळी २० शिक्षकांना त्या निर्णयाचा फायदा मिळाला, त्यानंतर चार वर्षांनी पुन्हा ७ शिक्षकांना न्याय मिळाला. परंतु आता विधि व न्याय विभागाच्या सल्ल्याची गरज शासनाला का भासली हे मला समजत नाही. म्हणून हा प्रश्न राखून ठेवावा, अशी आमची विनंती आहे. ज्याप्रमाणे जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या संदर्भातील प्रश्न मागील वेळी उपस्थित झाला असता सभापतींनी आदेश दिल्यानंतर एक महिन्याच्या आत सरकारने निर्णय घेतला होता त्याचप्रमाणे आज देखील आपण या प्रश्नामध्ये हस्तक्षेप करावा आणि हा प्रश्न राखून ठेवावा.

**प्रा. बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, या हरकतीच्या मुद्यांवर बोलतांना मी दोन मुद्यांसंबंधी माहिती देऊ इच्छितो. एक म्हणजे मा. उच्च न्यायालयाचा धोरणात्मक निर्णय आहे हे या सभागृहात मा. मंत्री महोदयांनी मान्य केलेले आहे आणि दुसरे म्हणजे **सभागृहात एकदा सहजपणे एक ज्येष्ठ मंत्री उभे राहिले आणि याच प्रश्नावर चर्चा चालु असतांना असे म्हणाले होते की, "हायकोर्टाने दिलेला निर्णय हा फायनल थोडाच आहे, शासन सुप्रिम कोर्टामध्ये जाऊ शकते"** ते आजही सभागृहाच्या रेकॉर्डवर आहे. यानंतर सभागृहात बराच वेळ या प्रश्नावर गोंधळ झाला होता एवढेच नव्हे तर त्यावेळी सभागृहाची बैठक देखील आपण स्थगित केली होती. आपण स्वतः यासंदर्भातील कागदपत्रे पाहिली. सभागृह सुरु झाल्यानंतर त्यावेळी आपण काय सांगितले ते मी वाचून दाखवितो. It is a statement on fact. आपण त्यावेळी असे म्हणाला होता की, "मी एवढेच सांगेन की, सन २००० सालामध्ये उच्च न्यायालयाने जो निर्णय दिला त्यानंतरच्या काळात अपिल झालेले नाही त्यामुळे अपिलाची मुदत सुध्दा संपलेली आहे." आता किती लाजिरवाणी गोष्ट आहे ही ? म्हणून मी या मताशी सहमत आहे की, हा प्रश्न राखून ठेवावा. त्यांना माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा करण्यासाठी वेळ द्यावा आणि त्यानंतरच हा प्रश्न चर्चेसाठी घेण्यात यावा. कारण माननीय मंत्री महोदय यामध्ये काहीही करु शकत नाही. ते दुर्बल आहेत.

**श्री. व्ही.यु.डायगव्हाणे :** माननीय मंत्री महोदयांची इच्छा सुध्दा नाही.

**प्रा. वसंत पुरके :** सभापती महोदय, हा माझ्यावर एक प्रकारे हेत्वारोप आहे. कारण काही करु शकत नाही अशी परिस्थिती असती तर २४३ कोटी रुपये दिले नसते.

**प्रा. बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, मी जे बोललो ते पुन्हा रिपीट करतो आणि त्यात जर तसे आढळून आले तर **आपणच ठरवावे की हा हेत्वारोप आहे की आरोप आहे. मी असा आरोप करतो की, हायकोर्टाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यास दुर्देवाने आपल्याला अपयश आलेले आहे, आणि हा हेत्वारोप नाही. हा आरोप आहे.** तरीही आपल्या म्हणण्यानुसार हा हेत्वारोप असेल तर मी माननीय सभापती तसा निर्णय देतील. आपण निर्णय देण्याचे कारण नाही. म्हणून हा प्रश्न राखून ठेवावा अशी मी विनंती करतो.

**प्रा. जोगेंद्र कवाडे :** सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी जो हरकतीचा मुद्दा उपस्थित केला त्या मुद्याशी मी सहमत आहे. आपले हे कायदेमंडळ आहे आणि जे कायदे या ठिकाणी केले जातात त्यांची अंमलबजावणी या कायदेमंडळातच होत नसेल तर ही वाईट गोष्ट आहे. यासंदर्भात शासनाचा निर्णय झालेला आहे, हायकोर्टाने सुध्दा तो उचित ठरविला. या निर्णयाला हायकोर्टाने मान्यता दिलेली आहे. आता याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी शासनाची आहे. परंतु इतर कारणे सांगून विलंब लावण्याचा प्रयत्न केला जात आहे. ही बाब कायदे मंडळाला शोभा देणारी आहे असे मला वाटत नाही. आपण या प्रश्नाच्या संदर्भात निर्णय दिलेला आहे, शासनाने देखील निर्णय घेतलेला आहे तसेच उच्च न्यायालयाने सुध्दा याला संमती दिलेली आहे. आता निर्णयाची अंमलबजावणी करावयाची असतांना मा. मुख्यमंत्र्यांबरोबर किंवा इतर मंत्र्यांबरोबर बैठक घेण्याचे काही कारणच नाही. त्यामुळे जो निर्णय दिलेला आहे त्याच्या संदर्भात त्वरीत अंमलबजावणी करुन निर्णय लागू करण्यात येईल अशी घोषणा मा. मंत्रीमहोदयांनी सभागृहात करावी अशी माझी विनंती आहे.

**श्री. रामनाथ मोते :** सभापती महोदय, मागील अधिवेशनामध्ये हा प्रश्न मीच उपस्थित केला होता व या प्रश्नावर त्यावेळी खूप चर्चा देखील झाली होती तसेच या प्रश्नावर प्रचंड गदारोळ होऊन सभागृहाचे कामकाज तहकूब देखील झाले होते. तसेच यासंदर्भातील मुद्दा सभापती महोदय आपल्याला देखील पटला होता. मा. मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, हा प्रश्न सभागृहात ६-७ वेळा आलेला आहे, प्रश्नाला देखील मर्यादा असतात. परंतु जोपर्यंत हा प्रश्न सुटत नाही तोपर्यंत हा प्रश्न या सभागृहात वारंवार येतच राहणार आहे. महाराष्ट्रातील शिक्षकांचा हा जिव्हाळयाचा प्रश्न आहे. या प्रश्नाच्या संदर्भात न्यायालयाने देखील निर्णय दिलेला आहे त्यामध्ये हायकोर्टाने म्हटले आहे की, शासनाने या प्रश्नाच्या संदर्भात जो आदेश काढलेला आहे तो चूकीचा आहे. विना अनुदानीत सेवा वरिष्ठ वेतनश्रेणीसाठी ग्राह्य धरावी असा हायकोर्टाने निर्णय दिलेला आहे. तसेच यासंदर्भात शासनाने अपील सुध्दा केलेले नाही. सभापती महोदय, आपण या प्रश्नाच्या संदर्भात हस्तक्षेप केल्याशिवाय हा प्रश्न सुटणार नाही अशी आमची सर्वांची भावना झालेली आहे. त्यामुळे माझी आपल्याला विनंती आहे की, आता हा प्रश्न आपण सोडवावा व आम्हाला न्याय मिळवून द्यावा. मध्यंतरी शासनाने सांगितले की, जे शिक्षक कोर्टात गेले त्यांच्यासाठी आम्ही हा निर्णय घेतलेला आहे व तो निर्णय मंत्रिमंडळाने मंजूर केलेला आहे. आता महाराष्ट्रातील हजारो शिक्षकांनी कोर्टात परत रिटपिटीशन दाखल करायचे का? अशा प्रकारचा गंभीर प्रश्न यामुळे निर्माण होईल. त्यामुळे यासंदर्भात आपण निर्णय द्यावा व हा जो अनेक वर्षापासून प्रलंबित प्रश्न आहे तो आपण सोडवावा अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**प्रा. वसंत पुरके :** सभापती महोदय, मला सभागृहाच्या भावनांची तसेच वस्तुस्थितीची जाणीव आहे. त्यामुळे मी आपल्याला ग्वाही देतो की, मार्च महिन्यापर्यंत हा प्रश्न निश्चितपणे सोडविला जाईल.

**प्रा. श्री. बी.टी.देशमुख :** माननीय सभापती महोदय, ज्यावेळेस एखादा प्रश्न राखून ठेवला जातो त्यावेळेस खरे म्हणजे ती संबंधित मंत्रीमहोदयांसाठी एक प्रकारे सवलत असते. या प्रश्नाच्या संदर्भात एक महिन्याच्या आत आदेश काढले जातील असे माननीय मंत्रीमहोदयांनी येथे सांगावे. ते तसे सांगत नसतील तर मा. सभापती महोदय, आपण माननीय मंत्रीमहोदयांना आदेश द्यावेत की, हायकोर्टाच्या निर्णयाप्रमाणे एक महिन्याच्या आत आदेश काढावे म्हणून यासंदर्भात मा. मंत्रीमहोदय, हो म्हणत नसतील तर या देशाच्या घटनेला, हायकोर्टाला आपण संरक्षण द्यावे. हायकोर्टाच्या निर्णयाच्या विरुद्ध बोलण्याचा कृति करण्याचा किंवा हायकोर्टाच्या आदेशाप्रमाणे कृति न करण्याचा त्यांना अधिकार नाही.

( अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. )

**प्रा. वसंत पुरके :** सभापती महोदय, हायकोर्टाचा अवमान झालेला नाही. विधी व न्याय विभागाचे आमच्याकडे ओपिनियन आहे. परंतु सभागृहाची भावना आहे आणि वस्तुस्थिती लक्षात घेऊन ३१ मार्च पर्यंत हा प्रश्न निश्चितपणे सोडविला जाईल. तसेच माननीय सभापती महोदय, आपण या प्रश्नाच्या संदर्भात पुढाकार घेऊन आम्हाला निर्देश द्यावेत. आम्ही ते मान्य करु. या प्रश्नाच्या संदर्भात आपण जो काही निर्णय द्याल तो आम्हाला मान्य राहील.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**प्रा.वसंत पुरके :** सभापती महोदय, ३१ मार्चच्या आता हा प्रश्न आम्ही सोडवू.

(गोंधळ)

**सभापती :** मी माझे रुलिंग देत आहे. सन्माननीय सदस्यांनी कृपा करून खाली बसावे. सन्माननीय सदस्यांच्या तीव्र भावना माझ्या लक्षात आल्या आहेत. यापूर्वी या विषयावर २-३ वेळा चर्चा होऊनसुध्दा दुर्देवाने प्रश्नाची उकल होऊ शकलेली नाही, अशी परिस्थिती आहे. सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, बी.टी.देशमुख, जोगेंद्र कवाडे, रामनाथ मोते यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला आहे. सन्माननीय सदस्यांचे असे मत आहे की, घटनेप्रमाणे उच्च न्यायालयाने, सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करणे हे राज्य सरकारवर बंधनकारक असते. उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर सरकारने सर्वोच्च न्यायालयात अपील केलेले नाही, हे मागच्या वेळी देखील सांगितले आहे. आजही तिच परिस्थिती आहे. **सरकारला या बाबतीत अन्य कोणता कायदेशीर सल्ला घ्यायचा असेल तो त्यांनी घ्यावा. परंतु, उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची पूर्णतः अंमलबजावणी येत्या एक महिन्यात करावी असा मी शासनाला निदेश देतो.**

******

(१९)

# वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी विना अनुदानित शाळांतील सेवाकाळ ग्राह्य धरण्याबाबत

*महाराष्ट्र विधानपरिषद मंगळवार, दिनांक ४ जुलै २००६ दुसरे अधिवेशन २००६*

(३) * १७३५३ **श्री. व्हि. यू. डायगव्हाणे, प्रा. बी. टी. देशमुख, श्री. वसंतराव खोटरे, श्री. जी. एल. अैनापूरे, डॉ. एन. पी. हिराणी** : तारांकित प्रश्न क्रमांक ९२७९ ला दिनांक ९ डिसेंबर, २००५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरिष्ठ श्रेणी व निवडश्रेणीसाठी विना अनुदानित शाळेतील सेवाकाळ अनुज्ञेय न धरण्याची कृति ही नियमबाह्य आहे असा जो धोरणात्मक निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिनांक १४ सप्टेंबर, २००० रोजी एका याचिकेमध्ये (सन २००० ची याचिका क्रमांक ४३४६) दिला त्याची धोरणात्मक अंमलबजावणी करण्याच्या प्रश्नाची सद्यःस्थिती काय आहे,

(२) निर्णय झाला असल्यास केव्हा व आदेशाचे स्वरुप काय आहे,

(३) अद्याप निर्णय झाला नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वसंत पुरके : (१) व (२)** सदर याचिकेच्या संदर्भात मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने संबंधित याचिकाकर्त्यांची विनाअनुदानित शाळेतील सेवा वरिष्ठ श्रेणीसाठी व निवड श्रेणीसाठी ग्राह्य धरण्याबाबतचा निर्णय दिनांक २७.४.२००५ रोजी मंत्रिमंडळाने घेतला आहे.

(३) सभागृहात दिलेल्या आश्वासनानुसार उक्त निर्णय संबंधित सर्व शिक्षकांना लागू करण्याच्या दृष्टीने प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर पुन्हा सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

**श्री.व्ही.यू.डायगव्हाणे :** सभापती महोदय, पहिल्याच प्रश्नासारखी याही प्रश्नाची पुनरावृत्ती झालेली आहे. याठिकाणी प्रश्न असा आहे की, राज्यातील वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी विना अनुदानित शाळांतील सेवाकाळ ग्राहय धरण्यात यावा. याबाबतीत हायकोर्टामध्ये जवळपास २०-२५ शिक्षक गेलेले असून याबाबतीत हायकोर्टाने निर्णयही दिलेला आहे. परंतु पाच वर्षे होऊनही याबाबतीत राज्य शासनाने अंमलबजावणी केलेली नाही. यासंदर्भात दिनांक २७.४.२००५ रोजी हायकोर्टाने दिलेल्या निर्णयानुसार त्यांनाही वरिष्ठ आणि निवडश्रेणीसाठी सेवाकाळ ग्राहय धरण्यात यावा. परंतु याठिकाणी पहिल्यासारखेच

(४)

## स्थाननिश्चितीबाबत सहसंचालक उच्च शिक्षण यांचे स्तरावर वेळेवर निर्णय होणेबाबत

*महाराष्ट्र विधानपरिषद :शुक्रवार, दिनांक १५ डिसेंबर २००६ : तिसरे अधिवेशन २००६*

(११) * २०९१९ **प्रा. बी. टी. देशमुख, श्री. व्हि. यू. डायगव्हाणे, श्री. वसंतराव खोटरे, श्री. जी. एल. अैनापूरे** : तारांकित प्रश्न क्रमांक ५९५८ ला दिनांक १५ जुलै, २००५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:

(१) संलग्न महाविद्यालये किंवा विद्यापीठातून काम करणाऱ्या अधिव्याख्यात्यांच्या वरिष्ठ किंवा निवडश्रेणीमध्ये स्थाननिश्चितीच्या संदर्भात काही अनियमितता झालेली असल्यास ती बाब १५ दिवसाच्या आत संचालकांच्या लक्षात आणून द्यावी व कोणत्याही परिस्थितीत याबाबतचा निर्णय १५ दिवसाच्या आत करावा असे जे आदेश उच्च शिक्षण सहसंचालकांना देण्यात आले आहेत त्या संदर्भात १ जुलै, २००५ ते ३० जून, २००६ या कालखंडात विभागवार उच्च शिक्षण सहसंचालकांनी एकूण किती प्रकरणी वेळेच्या आत निर्णय घेतले,

(२) किती प्रकरणी विलंबाने निर्णय घेण्यात आले,

(३) विलंबाने निर्णय होण्याची कारणे काय आहेत?

**श्री.दिलीप वळसे पाटील** : (१) राज्यातील ८ विभागीय कार्यालयाकडे दि. १ जुलै, २००५ ते ३० जून, २००६ या काळात विभागवार खालीलप्रमाणे एकूण २३४३ प्रकरणे प्राप्त झाली त्यापैकी २३२२ प्रकरणे निकाली काढण्यात आली व २१ प्रकरणांमध्ये त्रुटी असल्यामुळे ती प्रकरणे त्या महाविद्यालयांना परत करण्यात आलेली आहेत.

| अ.न. | विभागाचे नाव | प्राप्त प्रकरणे | निकाली प्रकरणे | त्रुटीची प्रकरणे |
|---|---|---|---|---|
| १. | पुणे | ७२ | ७२ | -- |
| २. | मुंबई | ७५२ | ७३१ | २१ |
| ३. | नागपूर | ५६० | ५६० | -- |
| ४. | अमरावती | ५०६ | ५०६ | -- |
| ५. | नांदेड | ५० | ५० | -- |
| ६. | जळगांव | १९४ | १९४ | -- |
| ७. | कोल्हापूर | १४९ | १४९ | -- |
| ८. | औरंगाबाद | ६० | ६० | -- |
| | एकूण | २३४३ | २३२२ | २१ |

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

*****

*PR :- (1) S.Q. 5958 Dt. 150705 P 76 of NB05 (2) U.S.Q. 10109 Dt. 190406 P 114 of NB06 (3) U.S.Q. 17998 Dt. 151206 P 114 of NB06*

**ALL INDIA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANIZATIONS**

## SIGNATURE CAMPAIGN

The enclosed sheet should be multiplied. Take lacs of signatures of Teachers. Non-Teaching Staff, Students, Trade Unions and all other people to whom ever you can approach. Let us submit thousands of these sheets with lacs of signatures to the PM on March 12 to convey to Government that policies must change for the better.

**- Dr.V.K.Tewari**

**GENERAL SECRETARY.** AIFUCTO

# स्वाक्षरीत निवेदनांची अखिल भारतीय मोहीम

(१) देशाच्या मा. पंतप्रधानांना शिक्षणविषयक समस्यांच्या संदर्भात हजारो लोकांच्या स्वाक्षरीने निवेदन सादर करण्याचा निर्णय अखिल भारतीय स्तरावर घेण्यात आला आहे.

(२) दिनांक १२ मार्च २००७ रोजी संसदेवरील मोर्चाच्या वेळी देशभरातून येणाऱ्या हजारो व्यक्तींच्या साक्षीने व स्वाक्षरीने मा. पंतप्रधानांना हे निवेदन सादर करण्याचे ठरले आहे.

(३) या मोर्चात प्रत्यक्ष सहभागी होवू न शकलेल्या व्यक्तींनी ही मोहीम त्यानंतरच्या १५ दिवसात राबवावयाची आहे.

(४) नुटाच्या सर्व जिल्हा, तालुका व स्थानिक कार्यकारी मंडळाच्या बैठकी घेण्यात याव्या व ही मोहीम यशस्वी करण्याच्या कामाला सुरुवात करावी.

(५) मा. पंतप्रधानांना सादर करावयाचे निवेदन या बुलेटीनमध्ये छापलेले आहे. त्या पृष्ठाच्या पुरेशा झेरॉक्स प्रती तयार करवून घ्याव्या.

(६) शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, स्वयंसेवी संस्था, जागरूक नागरिक अशा अनेक लोकांना त्यांनी हे निवेदन स्वाक्षरीत करावे अशी विनंती करण्यात यावी. अशा स्वाक्षरीत निवेदन पत्राच्या प्रती मा. पंतप्रधानांना पाठविण्यात याव्या. हे बुलेटीन मिळाल्यापासून पुढील १५ दिवसात ही कारवाई पूर्ण करावी, अशी विनंती आहे.

डॉ. एकनाथ कठाळे,

**सचिव, 'नुटा'**

या प्रश्नाच्या बाबतीत उत्तर येत आहे, हे योग्य नाही. हा प्रश्न पूर्वी १५-१६ वेळा आलेला आहे. पूर्वी ज्यावेळी हा प्रश्न सभागृहामध्ये आला होता त्यावेळी माननीय सभापती महोदय आपण जे निर्देश दिले होते ते मी आपल्याला वाचून दाखवतो. आपण दिनांक ९.१२.२००५ रोजी या प्रश्नासंबंधी असे निर्देश दिले होते की, "उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची पूर्णतः अंमलबजावणी येत्या एक महिन्यात करावी असा मी शासनाला निदेश देतो." परंतु या निदेशाचे काय झाले ? माननीय सभापती महोदय, आपण निर्देश देऊनही शासन ऐकत नसेल तर आम्ही याठिकाणी आणखी काय करावे ? हायकोर्टाने दिलेल्या निर्णयाचे पालनही होत नसेल तर कसे व्हायचे ? सभागृहात बोलताना हा धोरणात्मक निर्णय असल्याचे म्हटले जाते. मग, हा धोरणात्मक निर्णय असेल तर हायकोर्टाने दिलेल्या निर्णयाप्रमाणे या २५ लोकांना जो न्याय दिला त्याप्रमाणे राज्यातील सर्व शिक्षकांना समानतेच्या न्यायानुसार, न्याय देण्याच्या दृष्टीने येत्या आठवडयात किंवा हे अधिवेशन संपण्यापूर्वी याबाबतीतील निर्णय घेतला जाईल का ?

**श्री.हसन मुश्रीफ :** सभापती महोदय, आपल्या निर्देशानुसार आपल्या दालनात बैठक झाल्यानंतर एक ते दीड महिन्यात याबाबतीतील प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये घेण्याच्या दृष्टीने सध्या वित्त मंत्री व माननीय मुख्यमंत्री यांच्यापर्यंत हा प्रस्ताव गेलेला आहे. मला खात्री आहे की, मंत्रिमंडळाच्या पुढील एक दोन बैठकीमध्ये याबाबतीत निर्णय होईल.

**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, "हायकोर्टाने वरिष्ठ श्रेणी वा निवडश्रेणीसाठी विना अनुदानित शाळेतील सेवाकाळ अनुज्ञेय न धरण्याची कृती ही नियमबाहय आहे असा धोरणात्मक निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिनांक १४ सप्टेंबर,२००० रोजी एका याचिकेमध्ये (सन २००० ची याचिका क्रमांक ४३४६) दिला हे खरे आहे काय?" या आमच्या दिनांक ११ जून,२००४ रोजीच्या प्रश्न क्रमांक ३६७३९ ला 'होय' असे उत्तर शासनाने दिले आहे. माननीय सभापती महोदय, यासंदर्भात आपल्या दालनातही बैठक झाली. यापूर्वी एकदा आपण यासंदर्भातील सर्व कागदपत्रे पाहून सभागृहामध्ये जो निर्णय दिला तो मी वाचून दाखवतो. आपण असे निर्देश दिले की, "उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर सरकारने सर्वोच्च न्यायालयात अपील केलेले नाही, हे मागच्यावेळी देखील सांगितले आहे. आजही तिच परिस्थिती आहे. सरकारला याबाबतीत अन्य कोणता कायदेशीर सल्ला घ्यायचा असेल तो त्यांनी घ्यावा. परंतु, उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची पूर्णतः अंमलबजावणी येत्या एक महिन्यात करावी असा मी शासनाला निदेश देतो." आपल्या दालनात बैठक होण्यापूर्वी सभागृहात आपण असे निर्देश दिले. याठिकाणी आपण दिलेल्या निदेशाचे व हायकोर्टाने दिलेल्या निदेशाचेही पालन सरकार करत नसेल तर आम्ही आणखी कुठे जायचे ? त्यामुळे याबाबतीत माझी अशी मागणी आहे की, आपण हा प्रश्न राखून ठेवावा.

**श्री. हसन मुश्रीफ :** सभापती महोदय, हा प्रश्न सभागृहात बऱ्याचदा आला होता. आपल्या दालनामध्ये यासंबंधी चर्चा झाली होती. उच्च न्यायालयाचा निर्णय झाल्यानंतर मंत्रिमंडळाने याबाबतीत निर्णय घ्यावा असे ठरले. त्यावेळी माननीय देशमुख साहेबांनी असा मुद्दा मांडला होता की, आपणच मंत्रिमंडळापुढे सांगण्यास कमी पडलात, आपल्याला याबाबतीतील बाजू प्रभावीपणे मांडता आली नसेल. **हे सर्व मान्य करुन पुन्हा मी याठिकाणी सांगेन की, पुढच्या अधिवेशनामध्ये परत हा प्रश्नच न येण्याच्या दृष्टीने आम्ही काम करु व ही वेतनश्रेणी शिक्षकांना आम्ही मिळवून देऊ.**

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**सभापती :** या ठिकाणी सन्माननीय मंत्री, श्री.पतंगराव कदम, सन्माननीय मंत्री, प्रा.वसंत पुरके व शिक्षण राज्यमंत्री महोदय उपस्थित आहेत. त्यांच्या मी हे लक्षात आणून देऊ इच्छितो की, या प्रश्नाच्या अनुषंगाने ३/४ वेळा चर्चा या सभागृहात झालेली आहे. तसेच, माझ्या दालनात देखील चर्चा झालेली आहे. शासनाला यासंदर्भाने जी प्रक्रिया पूर्ण करावयाची असेल ती वस्तुस्थितीला धरुनही असेल. परंतु, ही संपूर्ण वस्तुस्थिती डोळयासमोर ठेवून मी सदनामध्ये यापूर्वीच सूचना दिल्या होत्या. ही संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करुन व मंत्रिमंडळाने निर्णय घेऊन याबाबतीत अंमलबजावणी किंवा कार्यवाही झाली पाहिजे. माननीय राज्यमंत्री यांनी या ठिकाणी असे सांगितले की, पुढच्या अधिवेशनामध्ये हा प्रश्नच येणार नाही. पण मी असे म्हणतो की, **या अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यन्त या प्रश्नाची सोडवणूक करण्यासंदर्भात तुम्ही प्रयत्न करा तोपर्यन्त मी हा प्रश्न राखून ठेवतो.**

******

**(२०)**

## विनाअनुदानित सेवा वरिष्ठ वेतनश्रेणीसाठी ग्राह्य धरण्याबाबत

*महाराष्ट्र विधानपरिषद दुसरे अधिवेशन २००६*
*शुक्रवार, दिनांक २१ जुलै २००६*
*रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या*
*अतारांकित प्रश्नोत्तराच्या चौदाव्या यादितील प्रश्न क्रमांक १२७७१*

**(२) १२७७१ (२१.४.२००६) श्री. रामनाथ मोते, श्री. प्रतापराव सोनवणे, श्री. व्हि. यू. डायगव्हाणे, प्रा. बी. टी. देशमुख, श्री. वसंतराव खोटरे, श्री. जी. एल. अैनापूरे, श्री. नितीन गडकरी :** तारांकित प्रश्न क्रमांक ९२६८ ला दिनांक ९ डिसेंबर, २००५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विनाअनुदानित सेवा वरिष्ठ वेतनश्रेणीसाठी ग्राह्य धरण्याबाबत सकारात्मक निर्णय घेऊन १ महिन्यात जी.आर.काढण्याचे आश्वासन नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात देण्यात आले होते हे खरे आहे काय;

(२) असल्यास, सदर शासन निर्णय काढण्यात आला आहे काय;

(३) अद्याप निर्णय काढला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा. वसंत पुरके : (११.७.२००६)** (१) होय

(२) व (३) वित्त विभागाच्या सहमतीने धोरणात्मक निर्णय घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

******

**(२१))**

## वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी विना अनुदानित शाळांतील सेवाकाळ ग्राह्य धरण्याबाबत

*महाराष्ट्र विधानपरिषद तिसरे अधिवेशन २००६*
*गुरुवार, दिनांक ७ डिसेंबर, २००६*

**(१) * २०३१७ श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , प्रा. बी. टी. देशमुख, श्री. वसंतराव खोटरे, श्री.जी.एल.अैनापूरे, श्री.रामनाथ मोते, श्री.श्रीकांत जोशी, श्री.संजय केळकर, श्री. प्रतापराव सोनवणे, श्री.केशवराव मानकर, श्री. सागर मेघे : तारांकीत प्रश्न क्रमांक १७३५३ ला दिनांक ४ जुलै,२००६ रोजी दिलेल्या उत्तरांच्या संदर्भात :** सन्माननीय शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरिष्ठ श्रेणी व निवडश्रेणीसाठी विना अनुदानित शाळेतील सेवाकाळ अनुज्ञेय न धरण्याची कृति हि नियमबाह्य आहे असा जो धोरणात्मक निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिनांक १४ सप्टेंबर,२००० रोजी एका याचिकेद्वारे (सन २००० ची याचीका क्रमांक ४३४६) दिला त्याची धोरणात्मक अंमलबजावणी करण्याबाबतचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे काय,

(२) असल्यास,केव्हा व निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) अद्यापही निर्णय झाला नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वसंत पुरके :** (१),(२) व (३) सदर याचिकेच्या संदर्भात मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने संबंधित याचिकाकर्त्यांची विनाअनुदानित शाळेतील सेवा वरिष्ठ श्रेणीसाठी व निवड श्रेणीसाठी ग्राह्य धरण्याबाबतचा निर्णय दिनांक २७.४.२००५ रोजी मंत्रिमंडळाने घेतला आहे. मंत्रीमंडळाच्या या निर्णयामुळे मा. न्यायालयाच्या निर्णयाचा अवमान होण्याची शक्यता गृहीत धरुन आदेश निर्गमित करण्यापूर्वी विधी व न्याय विभागाचा सल्ला घेण्यात आला. **त्यानुसार राज्यातील सर्व मान्यता प्राप्त विना अनुदानित शाळेत केलेली सेवा वरिष्ठ निवड श्रेणीसाठी ग्राह्य धरण्याबाबतच्या प्रस्तावास मंत्रिमंडळाने मान्यता दिलेली आहे.**

सदर निर्णयाच्या अनुषंगाने आवश्यक ती आर्थिक तरतूद उपलब्ध करुन घेण्यात येत आहे. त्यानंतर शासन निर्णय निर्गमित करण्यात येईल.

******

## ALL INDIA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANIZATIONS

*(Regd. Under Act XXI of 1860) 493 Urban Estate (Phase I) Jalandhar- 144 022] Punjab*

Ph. : 98154-89493, 0181-5063493, 0181-4610493, 0181-2481493 E-mail: tewari_vk@rediffmail.com,


Dr.Manmohan singh,
Hon'ble Prime Minister, New Delhi.

Esteemed Sir,

We, the Teachers, Non-Teaching Staff, Students, NGOs, Concerned Citizens and the General public voice strong concern at the absence of the required thrust for strengthening public-Funded Education System capable of removing total illiteracy decreasing dropout rate, ensuring full retention of students at the Primary, Secondary levels, minimum 20% intake of youth in Higher Education, So, we lodge our demand through this Signature Campaign throughout the country and March to parliament on March 12, 07 in New Delhi for the reversal of the anti-people policies with a clear perspective so that the following are taken care of urgently,

1) Allocate 6 % of GDP for Education from 2007-08 (Thus Accomplish Mandate of NPE-1968 to raise GDP Allocation to 6 % by 1985-86; Reiteration in NPE-1986 (Revised 1992) and UPA's NCMP)
2) Central Legislation to implement fundamental Right to Education upto age of 14 Through due improvements in "Model Right to Education Bill 2006"
3) Constitute National Commission for Education (on the pattern of Dr. Kothari Commission.)
4) Constitute National Commission for Teachers, Both for Schools and Universities.
5) Strengthen Public - Funded Education System from Primary to the University Level.
6) Stop entry of Foreign Universities under GATS : stop Privatization and Commercialization of Education & Bring all Un-aided Institutions under Aid System and Government Control.
7) Implement NPE-1968 Mandate on Neighbourhood Common School System.
8) Allocate 3% of GDP for Higher & Technical Education.
9) Constitute National School Grants Commission.
10) Provide Quality Infrastructure, Teaching Personnel & Education for All.
11) Stop Downsizing and Fill All Vacancies of Staff in all Schools Colleges, Universities.
12) Ensure Implementation of 6th CPC and UGC/AICTE pay-Review Committee Reports from 1.1.06 and sanction Due Interim Relief.
13) Democratize Educational Governance at Primary, Secondary, College, University Levels.
14) Promote Inclusive Education through more Socially Affirmative Actions.
15) Keep whole of Education Sector primary to University, within the reach of people.

Name of the State :.........................................

Name of the Institute :.....................................

| Sr.No. | Name | Signature |
|---|---|---|
| 1 | | |
| 2 | | |
| 3 | | |
| 4 | | |
| 5 | | |
| 6 | | |
| 7 | | |
| 8 | | |
| 9 | | |
| 10 | | |

Name of the State :.......................................

Name of the Institute :...................................

| Sr.No. | Name | Signature |
|---|---|---|
| 1 | | |
| 2 | | |
| 3 | | |
| 4 | | |
| 5 | | |
| 6 | | |
| 7 | | |
| 8 | | |
| 9 | | |
| 10 | | |

*राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित शाळेत केलेली सेवा वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी ग्राह्य धरणेबाबत*

# *महाराष्ट्र शासन : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,*

### *शासन निर्णय क्रमांक : एसएसएन १०९९/(३०८/९९)/माशि-२*

**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.**

**दिनांक २८ नोव्हेंबर, २००६**

**संदर्भ** :- (१) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. चवेआ १०८९/१११/माशि-२, दि. २.९.१९८९. (२) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग, क्र.चवेआ १०८९/१४७/माशि-२, दि. १३.९.१९९०.

**प्रस्तावना :- या विभागाच्या दिनांक २ सप्टेंबर, १९८९ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी शाळांतील कर्मचाऱ्यांना चतुर्थ वेतन आयोगाच्या शिफारसीनुसार सुधारित वेतनश्रेण्या मंजूर करण्यात आल्या आहेत.**

यासंदर्भात सुधारित वेतनश्रेणीनुसार वेतन निश्चिती करतांना शाळांना आलेल्या शंका व अडचणी विचारांत घेऊन दिनांक १३ सप्टेंबर, १९९० च्या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्टामध्ये स्पष्टीकरण करण्यात आले आहे. मात्र या स्पष्टीकरणानुसार फक्त अनुदानित शाळांतील सेवा वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी विचारात घेण्यात याव्यात असे नमूद करण्यात आले होते. सिडको माध्यमिक विद्यालय, सिडको, नाशिक या माध्यमिक शाळेतील शिक्षकांना विनाअनुदान तत्त्वावरील माध्यमिक शाळेत केलेली सेवा वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी ग्राह्य धरण्यात यावी. या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका दाखल केली होती. सदर याचिकेवर मा. उच्च न्यायालयाने दिनांक १४ सप्टेंबर, २००० रोजी निर्णय दिला. सदर निर्णयास अनुसरून याचिकाकर्त्यांनाच विनाअनुदान तत्त्वावरील सेवेचा लाभ देण्याबाबत प्रथमतः निर्णय घेण्यात आला.

तथापि, हा लाभ राज्यातील सर्व मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित तत्त्वावरील शाळांतील शिक्षकांनाही देण्यात यावा या संदर्भात विधिमंडळ अधिवेशनात चर्चा करण्यात आली होती.

उपरोक्त सर्व वस्तुस्थिती विचारात घेऊन प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या विचारार्थ सादर करण्यात याला होता. सदर प्रकरणी मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित माध्यमिक शाळांतील सेवा वरिष्ठ व निवड श्रेणीसाठी ग्राह्य धरण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय** : राज्यातील सर्व मान्यताप्राप्त विनाअनुदानित शाळांमध्ये केलेली सेवा खालील अटी व शर्ती यांच्या आधीन राहून वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी ग्राह्य धरण्यात यावी.

१) संबंधित माध्यमिक शाळेस शासनाकडून वा सक्षम प्राधिकाऱ्याकडून विनाअनुदान तत्त्वावर परवानगी आणि किंवा मान्यता मिळालेली असली पाहिजे.

२) संबंधित शिक्षकाने त्या पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता ज्या दिनांकाला धारण केली असेल त्या दिनांकापासूनची त्याची सेवा वरिष्ठ व निवड़ श्रेणीसाठी विचारात घेण्यात यावी मात्र अशा पदास व नियुक्तीस सक्षम प्राधिकाऱ्याने मान्यता दिलेली असणे आवश्यक आहे. ही मान्यता ज्या दिनांकापासून देण्यात आली असेल त्या दिनांकापासूनची सलग सेवा विचारात घेण्यात यावी.

३) संबंधित शिक्षकाची नियुक्ती आरक्षणाच्या धोरणास अनुसरून त्या त्या संवर्गात केलेली असणे आवश्यक आहे.

४) एखाद्या मागासवर्गीय उमेदवाराच्या नियुक्तीस एखाद्या विशिष्ट संवर्गाचा बिंदू पुढे घेऊन, अशा अन्य मागासवर्गीय उमेदवाराच्या नियुक्तीस सक्षम प्राधिकाऱ्यांने सलग ५ वर्षे मान्यता दिलेली असेल, अशा शिक्षकांच्याबाबतीत त्यांच्या प्रथम मान्यतेपासून म्हणजे मागील ५ वर्षाची सलग सेवा वरिष्ठ या निवडश्रेणीसाठी विचारात घेण्यात यावी. मात्र ही सर्व सेवा सलग पाच वर्षे आणि एकाच शाळेतील असणे आवश्यक आहे.

५) एखाद्या विशिष्ट संवर्गाचा विहित शैक्षणिक व प्रशिक्षित मागासवर्गीय उमेदवार प्रयत्न करूनही उपलब्ध होत नसेल, तर त्याच संवर्गाच्या अप्रशिक्षित उमेदवाराची शिक्षक म्हणून नियुक्ती करण्याची सवलत काही अटींवर देण्यात आलेली आहे. अशा शिक्षकांनी विहित शैक्षणिक अर्हता धारण केलेल्या दिनांकापासूनची सलग सेवा वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी विचारात घ्यावी.

६) कोणत्याही कारणास्तव शिक्षकांच्या सेवेत खंड पडल्यास वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी धरावयाच्या अर्हताकारी सेवा कालावधीत, हा सेवाखंड विचारात घेण्यात येवू नये. म्हणजेच, प्रत्यक्ष अध्यापनाचे काम केलेलाच कालावधी विचारात घेण्यात यावा.

७) सेवेत खंड न पडता एकापेक्षा जास्त विनाअनुदान शाळेतील सेवाकाळ वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी ग्राह्य धरावा.

८) उपरोक्त अटींव्यतिरिक्त शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग, क्रमांक चवेआ/१०८९/१११/माशि-२, दिनांक २ सप्टेंबर, १९८९ मधील अटी व शर्तीही जशाच्या तशा लागू राहतील.

९) कायम विनाअनुदान तत्वावरील शाळेत केलेली सेवा वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी ग्राह्य धरण्यात येणार नाही.

१०) कायम विनाअनुदान तत्त्वावरील माध्यमिक शाळेतील विहित शैक्षणिक अर्हता प्राप्त शिक्षकाने त्याच संस्थेच्या अन्य विनाअनुदान तत्त्वावरील शाळेत या अन्य विनाअनुदान तत्त्वावरील शाळेत नियुक्ती स्वीकारली, तर ती नवीन नियुक्ती ठरेल. या नियुक्तीस सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या मान्यतेच्या दिनांकापासूनची सेवा यासाठी विचारात घेण्यात यावी.

११) आर्थिक तरतूद खेरीज करुन अन्य कारणास्तव की ज्यास संबंधित माध्यमिक शाळा किंवा व्यवस्थापन जबाबदार आहे, अशा त्रुटी सक्षम प्राधिकाऱ्याने त्या शाळेच्या निरीक्षणाचेवेळी संबंधितांच्या निदर्शनास आणून दिल्यास आणि त्यामुळे त्यास अनुदानास अपात्र ठरविल्यास अशा संस्थेतील या शाळेतील शिक्षकांच्या अर्हताकारी सेवेच्या कालावधीची गणना करतांना, अशा त्रुटी दर्शविल्याच्या वा कळविल्याच्या दिनांकापासून ते अशा त्रुटी प्रत्यक्षात दूर केल्याच्या दिनांकापर्यंतचा कालावधी विचारात घेऊ नये. त्रुटी दूर करण्यात आल्याची सक्षम प्राधिकाऱ्याकडून खातरजमा करुन तसे प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे.

१२) वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी १२ वर्षाची अर्हताकारी सेवा विचारात घेतांना अन्य अटींची पूर्तता करीत असल्यास शिक्षण सेवक म्हणून व्यतित केलेला कालावधी विचारात घ्यावा.

१३) या प्रित्यर्थ येणारा वाढीव खर्च २००६-०७ या आर्थिक वर्षाच्या मंजूर तरतुदीतून करण्यात यावा. तसेच आवश्यकता भासल्यास त्याचा समावेश सन २००६-०७ आर्थिक वर्षाचे आठमाही सुधारित अंदाजपत्रकामध्ये करण्यात यावा.

हे आदेश वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक १८०३/०६/व्यय-५ दिनांक १५.११.२००६ अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

हा शासन निर्णय शासनाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २००६११२८१५३००३००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने

(अ.मा. भट्टलवार)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **CHIEF EDITOR :** Prof. A.G.Somvanshi,Shankar Nagar, AMRAVATI-444 606. **EDITOR :** Prof. S.S. Gawai 1,Abhinav State Bank Colony, Chaprashi Pura, Camp, AMRAVATI 444 602. **PUBLISHER :** Prof. S.R. Kalmegh, Lahari Apartment, Keshao Colony, Camp, AMRAVATI 444 602. Type Setting at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. ATI/RNP/78/2005-08 WPP Registration No. NR/ATI/WPP-01/2005-08
Name of the Posting office : **R.M.S. Amravati.**
Date of Posting : **15.03.2007**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 601**.

---------------------------------------------------

To,........................................................................

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

.................................................................................